


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार ६ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




# ‘मोहब्बत की दुकान’वाले मोदींची ‘कब्र’ खोदण्याची भाषा करतात

## पंतप्रधानांची राहुल गांधींवर टीका



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेससह विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. आम्ही विकसित भारताची पायाभरणी करत आहोत, तर काँग्रेस मोदी 'कब्र' खोदण्याची भाषा करत आहे. मोहब्बत की दुकान उघडल्याचा दावा करणारे लोक एखाद्या भारतीय नागरिकाची कब्र खोदण्याची भाषा करतात. ही कोणती मोहब्बत आहे? हे संविधान आणि मानवतेचा अपमान नाही का? असा सवाल पंतप्रधानांनी केला.

**विरोधकांचा उघड द्वेष** -पंतप्रधानांनी सांगितले की, कलम ३७० हटवणे, ईशान्येत शांतता प्रस्थापित करणे, दहशतवाद्यांना त्यांच्या घरात घुसून उत्तर देणे, माओवादविरोधी ठोस पावले...या निर्णयांमुळेच काहींना कब्र खोदण्याची भाषा सुचते. यातून विरोधकांच्या मनातील द्वेष उघड होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

**संविधान व संसदीय शिस्तीवर भाष्य-** काल लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चा होउ न शकल्याबद्दल पंतप्रधानांनी तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, हे संविधानाचा अपमान आहे; आदिवासी कुटुंबातून आलेल्या राष्ट्रपतींचाही अपमान आहे. सभागृहात खुर्चीकडे कागद फेकणे, अध्यक्षपदावर बसलेल्या सदस्यांचा अवमान, यावरून संसदीय शिस्तीचा प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

### राहुल गांधींच्या ‘गद्दार’ टिप्पणीवर टीका

पंतप्रधानांनी आरोप केला की, काँग्रेसच्या एका खासदाराने(राहुल गांधी) याच संसदेत शीख खासदाराला गद्दार म्हटले. हा शीखांचा आणि गुरूंचा अपमान आहे. देशासाठी बलिदान देणा-या कुटुंबातील सदस्याबाबत अशी भाषा वापरणे दुर्दैवी असल्याचे त्यांनी सांगितले.

### सरदार पटेल, नेहरू व इंदिरा यांचा संदर्भ

सरदार वल्लभभाई पटेल यांचा उल्लेख करत पंतप्रधान म्हणाले की, नर्मदा धरणाची संकल्पना पटेलांनी मांडली; नेहरूंनी शिलान्यास केला; मात्र उद्घाटन मी केले. यातून काँग्रेसच्या कार्यशैलीचा फरक दिसतो. अटकवणे,लटकवणे,भटकवणे ही काँग्रेसची पद्धत बदलून २०१४ नंतर नीति आयोग स्थापन केला. यावेळी पंतप्रधानांनी बस्तर, ईशान्य भारत, जम्मू-उधमपूर-बारामुल्ला रेल्वे मार्ग, बोगीबील पूल, सौरउर्जा उद्दिष्टे आदींचा उल्लेख करत लटकलेले प्रकल्प मार्गी लावल्याचा दावा केला.

### आमचा रिमोट जनतेच्या हाती-मोदी

पंतप्रधानांनी विरोधकांच्या दृष्टिकोनावर टीका करत म्हटले की, काही जण नागरिकांनाच समस्या मानतात. आमची भूमिका वेगळी आहे. १४० कोटी नागरिक म्हणजे १४० कोटी उपाय. आम्हाला असे वाटते की, १४० कोटी देशवासी आव्हानांवर उपाय देउ शकतात, कारण आम्हाला आमच्या देशवासीयांवर विश्वास आहे. त्यांचे सरकार रिमोट-कंट्रोल्ड होते. माझे सरकारदेखील रिमोट-कंट्रोल्ड आहे. पण, देशातील १४० कोटी लोक आमच्या सरकारचे रिमोट कंट्रोल करतात, असेही पीएम मोदींनी यावेळी म्हटले.

## काँग्रेसने संविधानासह शिखांचा अपमान केला

■ *युवराजांचा अहंकार* ■ *पंतप्रधानांची जोरदार टीका*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या



अभिभाषणावर उत्तर देत असताना भाषण केलं. आपल्या भाषणात नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली. काँग्रेसलाही लक्ष्य केलं. मल्लिकार्जुन खरगेंना पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषणाच्या सुरुवातीलाच म्हणाले तुमचं वय झालं आहे तुम्ही बसून घोषणा दिल्या तरीही चालतील. राष्ट्रपतींच्या संबोधनावर तुम्ही चर्चा होउ देत नाही. आदिवासी कुटुंबातून आलेल्या महिला राष्ट्रपतींचा काँग्रेसने आणि विरोधी पक्षांनी अपमान केला आहे, तसंच विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला संविधान हा शब्द उच्चारण्याचा अधिकार नाही असंही नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे. लोकसभेत बुधवारी एक लाजिरवाणी घटना घडली, सदनात अशा पद्धतीने वातावरण निर्माण करण्यात आलं आणि कागद अशा पद्धतीने फेकण्यात आले की ते निषेधार्ह आहे. त्यावेळी अध्यक्षस्थानी आसामचे एक सदस्य बसले होते. अशा पद्धतीने कागद भिरकावणं हा आसामचा अपमान नाही का असे ते म्हणाले.

## राज्यसभेतून विरोधक बाहेर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आता शिगेला पोहोचला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर उत्तर देण्यासाठी उभे राहिले असता, काँग्रेससह संपूर्ण विरोधी पक्षांनी सभात्याग केला. ‘सरकार विरोधकांचा आवाज दाबत असून देशाच्या महानायकांचा अपमान करणा-यांना अभय देत आहे,’ असा खळबळजनक आरोप काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे.

**लोकसभेत राहुल गांधींना बोलू देत नाहीत!**

राज्यसभेबाहेर पत्रकारांशी बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, ‘मोदी सरकारने जणू काही ठरवूनच टाकले आहे की दोन्ही सभागृहांच्या विरोधी पक्षनेत्यांना बोलू द्यायचे नाही. गेल्या चार दिवसांपासून लोकसभेत राहुल गांधींना बोलण्यापासून रोखले जात आहे. लोकशाहीत जर विरोधी पक्षनेत्यालाच बोलू दिले जात नसेल, तर हा संसदेचा अपमान आहे. असे यापूर्वी कधीही घडले नव्हते.‘

**महापुरुषांचा अपमान आणि सरकारचे मौन** -खरगे यांनी एका गंभीर मुद्द्याकडे सगळ्यांचे लक्ष वेधले. ‘ज्या नेत्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले, तुरुंगवास भोगला, त्यांच्याबद्दल सभागृहात अपशब्द वापरले जात आहेत. एखादी व्यक्ती माईकवर मनमानीपणे शिवीगाळ करते आणि सरकारचे लोक गप्प बसून राहतात. भाजपने कधीही अशा विधानांचा निषेध केला नाही. म्हणूनच आम्ही ठरवले की, जर आम्हाला बोलू दिले जात नसेल तर आम्ही निषेध नोंदवत सभात्याग करू,‘ असे खरगे यांनी स्पष्ट केले. परराष्ट्र धोरणावरूनही खरगे यांनी सरकारला घेरले. अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विधानांचा संदर्भ देत खरगे म्हणाले की, ‘पंतप्रधान मोदींनी अमेरिकेसोबत व्यापार करार करून देशाच्या शेतक-यांच्या हिताचा बळी दिला आहे. ट्रम्प जे सांगतात, मोदी तेच करत आहेत.

# पंतप्रधानांसोबत काहीही घडले असते-ओम बिर्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** संसदीय लोकशाहीमध्ये आमचा पूर्ण विश्वास आहे. माझ्या आयुष्यातील अर्धे आयुष्य संसदीय लोकशाहीमध्ये गेलं आहे. मी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची



अनुयायी आहे. आम्ही देशाच्या संविधानामध्ये संसदेमध्ये पूर्ण विश्वास ठेवतो त्याचा पूर्ण आदर ठेवतो. लोकसभा अध्यक्षांनी निष्पक्षपणे काम करावं, आम्हाला न्याय द्यावा. विरोधी पक्षातील आहेत म्हणून त्यांना बोलायला द्यायचं नाही आणि सत्ताधारी पक्षामधील अश्लील बोलतील तर त्यांना बोलायला द्यायचं ही भूमिका बरोबर नाही, अशा शब्दात खासदार वर्षा गायकवाड यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी केलेल्या आरोपांचे खंडन केले. ओम बिर्ला यांनी पंतप्रधानांसोबत काहीही घडलं असतं, अशी प्रतिक्रिया दिल्यानंतर महिला खासदारांनी जोरदार पलटवार केला.

**अध्यक्षांच्या पक्षपातीपणावर टीका-**दरम्यान, खासदार प्रतिभा धानोरकर म्हणाल्या की, अध्यक्ष हे जबाबदार खुर्चीवर बसले असताना मग असा दुजाभाव कसा करु शकतात? अध्यक्ष फक्त एका बाजूचं ऐकून घेतात, दुस-या बाजूचं अजिबात ऐकून घेत नाही. जबाबदार खुर्चीवर बसल्यानंतर त्यांनी सगळ्यांना समानतेचा न्याय हा दिला पाहिजे. जेव्हा जेव्हा वायफळ वक्तव्य करण्यासाठी निशिकांत दुबे उभे होतात तेव्हा त्यांचा माईक ठिकाणी सुरू होतो. खरं तर हे चुकीचं असल्याचे त्या म्हणाल्या. अख्ख्या सभागृहाला माहित होतं की पंतप्रधान जागेवर येणारच नाहीत. पंतप्रधान जर का त्या चेअरवरती बसून असते आणि महिला खासदार गेले असते तर आम्ही मान्य केलं असतं, असे त्या म्हणाल्या. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, निशिकांत दुबेला पंतप्रधानांचा सपोर्ट होता का? त्यांच्या वक्तव्याला अमित शाहांचा सपोर्ट होता का? अध्यक्षांचा समर्थन होतं का? अशी विचारणा केली. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिराजी आणि सोनिया गांधीजींबद्दल अश्लील बोललं जातंय. किती विष त्याच्या (निशिकांत दुबे) मनात आहे आणि किती खोटं बोलायचं भाजपने आणि किती खोटे नरेटिव्ह तयार करायचे याला पण काहीतरी सीमा ठेवा, अशा शब्दात त्यांनी फटकारले.

### आम्ही बॅनर घेउन उभे होतो, आमच्याकडे मारायला हत्यार होते का?



वर्षा गायकवाड, प्रतिभा धानोरकरांचा पलटवार

## फक्तप्रश्नांनी इतके घाबरलात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चेला उत्तर देताना काँग्रेसवर हल्ला चढवला. पंतप्रधान मोदींच्या राज्यसभेतील उत्तरानंतर विरोधी पक्षनेते



राहुल गांधी यांनी पुन्हा डिवचले. मोदीजींनी पुन्हा असत्याचा आसरा घेतला, असे म्हणत राहुल गांधींनी पलटवार केला. यावेळी अर्थसंकल्पीय अधिवेशन वादळी ठरताना दिसत आहे. माजी लष्करप्रमुख नरवणे यांचे पुस्तक आणि एपस्टिन फाईल्सच्या मुद्द्यावरून काँग्रेससह विरोधकांनी मोदी सरकारला पहिल्या दिवसांपासून घेरले आहे. बुधवारी (४ फेब्रुवारी) राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला पंतप्रधान मोदी उत्तर देणार होते. पण, विरोधकांच्या गोंधळामुळे पंतप्रधानांचे भाषण न होताच आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्यानंतर राज्यसभेत पंतप्रधान मोदींनी आज (५ फेब्रुवारी) उत्तर दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्यसभेतील भाषण झाल्यानंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक पोस्ट करत उलट सवाल केला. विरोधी पक्षनेते गांधी म्हणाले की, ‘फक्त प्रश्नांनीच इतके घाबरले? मोदीजी सत्यामुळे असे घाबरले की, असत्याच्या आश्रयाला गेले. असो, जो योग्य वाटले, तेच केलें‘, असे म्हणत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र डागले.

## *‘काँग्रेसने मला मंत्री बनवले नाही, हे एका अर्थाने चांगलेच झाले‘*


**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** संसदेत सध्या राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील 'धन्यवाद प्रस्तावा'वर चर्चा सुरू आहे. या चर्चेदरम्यान केंद्रीय मंत्री



आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी आपल्या खास शैलीत भाषण करत सभागृहात हास्यलहरी निर्माण केल्या. ‘काँग्रेसने मला मंत्री बनवले नाही, हे एका अर्थाने चांगलेच झाले,‘ असे विधान करत त्यांनी यूपीए सरकारच्या काळातील आठवणींना उजाळा दिला.आठवले यांनी सांगितले की, ते पूर्वी काँग्रेससोबत होते आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांसाठी वारंवार तत्कालीन मंत्र्यांना भेटायचे. ‘काँग्रेसने काहीच केले नाही असे नाही, पण जेवढे करायला हवे होते तेवढे केले नाही,‘ अशी खंत त्यांनी व्यक्त केली. पुढे मिश्किलपणे ते म्हणाले, ‘मी तेव्हा यूपीएसोबत होतो. जर त्यांनी मला तेव्हाच मंत्री बनवले असते, तर मी आज इकडे (NDA) आलो नसतो. त्यांनी मला मंत्री बनवले नाही, हे माझ्यासाठी चांगलेच ठरले. तिथे राहिलो असतो तर ५ वर्षे मंत्री राहिलो असतो, पण इकडे मी गेल्या १३ वर्षांपासून मंत्री आहे.‘

## 'विमानात नेमकं काय घडलं? ९ तारखेनंतर जनतेसमोर मांडणार

**मुंबई/प्रतिनिधी-** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत सुरू असलेल्या चर्चा दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. २८ जानेवारी रोजी झालेल्या या भीषण विमान अपघातात नेमकं काय घडलं, विमानात काय



परिस्थिती होती आणि अपघात कसा झाला, याबाबतची सविस्तर माहिती ९ तारखेनंतर जनतेसमोर मांडणार असल्याचं रोहित पवार यांनी स्पष्ट केलं आहे. रोहित पवार म्हणाले की, विमान अपघाताच्या दिवशी नेमकं काय घडलं, याबाबत आमच्यापर्यंत जी काही माहिती आली आहे, ती आम्ही तपासतो आहोत. अजूनही काही महत्त्वाची माहिती मागवली आहे. ९ तारखेनंतर या सर्व बाबींवर आम्ही स्पष्टपणे बोलणार आहोत.या अपघाताबाबत समाजात अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित केल्या जात आहेत. त्यामुळे सत्य लोकांसमोर येणं अत्यंत गरजेचं असल्याचं रोहित पवार यांनी सांगितलं. खरंच त्या दिवशी विमानात काय घडलं, हे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणं महत्त्वाचं आहे. त्यामुळे कोणतीही अर्धवट माहिती न देता, संपूर्ण आणि स्पष्ट चित्र मांडू, असंही त्यांनी नमूद केलं. रोहित पवारांच्या या वक्तव्यानंतर ९ तारखेला नेमकी कोणती माहिती समोर येते, याकडे राज्यातील राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## छत्तीसगड सीमेवर नक्षल्याचा खात्मा!

### नक्षलवाद्यांचे दोन तळ उद्ध्वस्त; एक जवान जखमी

**गडचिरोली/प्रतिनिधी-** : नक्षलवाद्यांच्या बालेकिल्ल्यात घुसून सी-६० च्या जवानांनी पुन्हा एकदा आपल्या शौर्याचा परिचय दिला. भामरागड उपविभागातील छत्तीसगड सीमेलगतच्या घनदाट जंगलात झालेल्या भीषण चकमकीत ५ फेब्रुवारी रोजी पोलिसांनी एका नक्षलवाद्याला कंठस्नान घातले. या कारवाईत



नक्षलवाद्यांचे दोन मोठे तळ उद्ध्वस्त करण्यात आले. दरम्यान, नक्षल्यांच्या भ्याड गोळीबारात सी-६० चा एक जवान जखमी झाला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ३ फेब्रुवारीच्या संध्याकाळी पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, नक्षलवाद्यांच्या 'कंपनी क्रमांक १०' आणि छत्तीसगडमधील एका दलमचे सदस्य फोदेवाडा जंगल परिसरात मोठ्या हल्ल्याच्या तयारीत आहेत. ही माहिती मिळताच विलंब न लावता भामरागडच्या उपविभागीय पोलिस अधिका-यांच्या नेतृत्वात सी-६० च्या १४ पथकांनी रात्रीच्या अंधारातच जंगलाला वेढा टाकला. ४ रोजी दिवसा (पान २ वर)

## कामगिरी सुधारण्यासाठी यूपीएससी उत्तीर्णांना आता एकच संधी




**नवी दिल्ली :** यूपीएससीने प्रयत्न आणि पात्रतेशी संबंधित नियमांमध्येही मोठा बदल करण्यात आला असून यानुसार, आता निवड झाल्यानंतर पुन्हा परीक्षा देण्याचे स्वातंत्र्य पूर्वीसारखे राहणार नाही. नवीन तरतुदींमध्ये सेवेत असताना वारंवार परीक्षा देण्याचा मार्ग बंद करण्यात आला आहे. दरम्यान नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) २०२६च्या नागरी सेवा परीक्षेची अधिसूचना जारी केली आहे. आयोगाने यावेळी ९३३ पदांसाठी भरती जाहिरात प्रसिद्ध केली आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २४ फेब्रुवारी आहे.आयएएस आणि आयएफएस संदर्भात जुने नियम तसेच ठेवण्यात आले आहेत. निवडलेल्या अधिका-याला एकदा कामगिरी सुधारण्याची संधी मिळेल. उदाहरणार्थ, जर एखाद्याची २०२६ मध्ये आयपीएसमध्ये निवड झाली, तर तो २०२७ मध्ये कामगिरी सुधारण्यासाठी परीक्षा देण्यास पात्र असेल. त्यानंतर जर त्याला परीक्षा द्यायची असेल, तर त्याला सेवेतून राजीनामा द्यावा लागेल.

## मुंबईत मूकबधिर मुलीवर बलात्कार

### 16 जणांच्या DNA टेस्ट

**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईत एक डोकं चक्रावून टाकणारी घटना घडल्याचे समोर आले आहे. २० वर्षांच्या एका मूकबधिर मुलीवर काही नराधमांनी बलात्कार केला होता. यानंतर सदर पीडिता गर्भवती राहिली. आरोपीची ओळख पटविण्यासाठी तब्बल १६ जणांची डीएनए चाचणी करण्यात आली.



त्यानंतर ज्याच्याशी डीएनए नमुने जुळले, ते पाहून तपास कर्त्यांनाही धक्का बसला. जन्मदात्या बापाशीच डीएनए जुळल्यामुळे सर्वांनाच धक्का बसला. ऑक्टोबर २०२५ मध्ये सदर पीडिता पोटात दुखत असल्याची तक्रार घेउन डॉक्टरांकडे आली होती, तेव्हा ती पाच महिन्यांची गर्भवती असल्याचे डॉक्टरांच्या लक्षात आले. यानंतर डॉक्टरांनी ही बाब पोलिसांच्या लक्षात आणून दिली. पीडिता मूकबधिर असल्यामुळे तिच्याशी संवाद साधण्यात आणि नेमके आरोपी कोण आहेत, तसेच तिच्याबरोबर नेमके काय झाले? याचा तपास करण्यात पोलिसांना अडचण येत होती. तपासादरम्यान पोलिसांच्या लक्षात आले की,पीडितेवर वारंवार लैंगिक अत्याचार करण्यात आले आहेत.

## कोळसा खाणीत मोठा स्फोट, 16 मजूर ठार

**शिलाँग /वृत्तसंस्था-** मेघालयाच्या ताशखाई परिसरात असलेल्या एका कोळसा खाणीत भीषण स्फोट झाला असून या दुर्घटनेत १६ मजुरांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने मदत आणि बचाव कार्य सुरु केले. ताशखाईतील कोळसा खाणीत अचानक मोठा स्फोट झाला. खाणीत काम करणा-या मजुरांना त्यांचा जीव वाचवण्याची संधीच मिळाली नाही. त्यांना खाणीतून बाहेर पडताच आले नाही. या दुर्घटनेत १६ मजुरांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. यातील बहुतांश मजूर आसामचे आहेत. पण प्रशासनाने अद्याप तरी यावर अधिकृतपणे शिक्कामोर्तब केलेलो नाही. स्थानिकांच्या माहितीनुसार, मृत मजुरांपैकी एक



जण आसामच्या कटिगारा परिसरातील बिहारा गावचा रहिवासी होता. दुर्घटनेची माहिती मिळताच मेघालय पोलिस आणि बचाव दल घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरु केले. खाणीत अडकलेल्या मजुरांच्या शोधासाठी सर्च ऑपरेशन सुरु आहे.




## सुनेत्रा पवारांना दुस-यांदा मंत्रिपदाची शपथ घ्यावी लागणार?

### राज्यपालांच्या भूमिकेकडे लक्ष

**नागपूर/प्रतिनिधी-** सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारीला उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. मात्र वर्धा येथील ॲड. हर्षवर्धन शोभा बाबाराव गोडघाटे यांनी राज्यपालांना एक पत्र दिले आहे. यामध्ये शपथविधी कसा बेकायदेशीर आहे हे सांगितले. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेता येणार नाही. त्यांना पुन्हा एकदा मंत्रिपदाची शपथ द्यावी असे मागणीची निवेदन राज्यपालांना देण्यात आले आहे. त्यामुळे आता राज्यपालांच्या भूमिकेकडे लक्ष असून पवार यांना पुन्हा एकदा शपथ घ्यावी लागणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.राज्यपालांना देण्यात आलेल्या पत्रानुसार, ०१/०२/२०२६ रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सुनेत्रा अजित पवार यांना दिलेल्या शपथविधीमध्ये सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची शपथ घेत असल्याचे दोनदा म्हटले आहे. जे की असंवैधानिक व भारतीय संविधांच्या विरोधात आहे. भारतीय संविधानात कुठेही उप-मुख्यमंत्री



पदाची तरतूद नाही. त्यामुळे सुनेत्रा अजित पवार यांनी उप-मुख्यमंत्री पदाची घेतलेली शपथ आपोआपच बेकायदेशीर आहे म्हणून सुनेत्रा अजित पवार यांना रीतसर भारतीय संविधानाच्या ३ अनुसूचित राज्याच्या मंर्त्याकरिता पदाच्या शपथेचा नमुना दिला आहे. त्यानुसार शपथ देउन त्यांच्याकडे मुख्यमंर्त्यांनी देलेल्या खात्याची जबाबदारी यावी. अन्यथा महाराष्ट्रासारख्या राज्यात ज्यांच्यावर भारतीय संविधानाच्या रक्षणाची जबाबदारी आहे. त्यांच्याकडूनच खुलेआम भारतीय संविधानाचे उल्लंघन होत आहे असा संदेश जाईल, अशी मागणी करण्यात आली आहे.

पत्रानुसार, सुनेत्रा अजित पवार यांचा राजभवन येथे उप-मुख्यमंत्री पदाचा शपथविधी झाला. तो सर्व शपथविधी सर्व प्रसार माध्यमांवर लाईव्ह प्रसारित केला होता. त्या संदर्भात राज्यपाल यांचे पत्र क्रमांक एल बी/ॲडमिन-२०२६/ओर्थ-डीसीएम/सीआर-०१३/१७२ सोशल मिडिया मधून मिळाले. त्यात सुद्धा उप-मुख्यमंत्री पदाचा उल्लेख आहे. राज्यपाल यांच्या कार्यालयातून सुद्धा ३१ जानेवारीला प्रसिद्धी पत्रक देण्यात आले. त्यातही उप-मुख्यमंत्री असा उल्लेख आहे. परंतु भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६४ नुसार मंर्त्यासंबधी अन्य तरतुदींमध्ये मुख्यमंत्री, राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इत्तर मंत्री मुख्यमंर्त्याच्या सल्यानुसार राज्यपालांकडून नियुक्त केले जातील अस उल्लेख आहे. राज्यपालाची मर्जीअसे पर्यंत ते मंत्री पद धारण करतील. मंर्त्याने आपले पद ग्रहण करण्यापूर्वी राज्यपाल त्या प्रयोजनार्थ तिस-या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यानुसार त्यास पदाची व गोपनियतेची शप्पथ देईल अशी तरतूद आहे.



# मुर्तिजापूर - कारंजा महामार्गावर होंडा कारचा भीषण अपघात
# दोघांचा जागीच मृत्यू, चार जण गंभीर जखमी

**मुर्तिजापूर/प्रतिनिधीः-** मुर्तिजापूर-कारंजा महामार्गावरील राष्ट्रीय महामार्ग ३६१-सी वर उमरी (अरब) गावाजवळील धोकादायक वळणावर अनियंत्रित होंडा कंपनीच्या डब्ल्यूआर-व्ही कारचा भीषण अपघात झाला. या थरारक अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना मंगळवार, दि. ५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास घडली.

मुर्तिजापूरकडून कारंजाकडे जाणारी एम.एच. ३६ झेड ०९०९ क्रमांकाची कार उमा नदीचा पूल ओलांडल्यानंतर लगेच असलेल्या वळणावर चालकाचे नियंत्रण सुटले. कार प्रथम डिव्हायडरला धडकली. त्यानंतर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करत असतानाच कार तब्बल ३० ते ३५ फूट उंच उडून रस्त्यालगत असलेल्या भटकर यांच्या शेतात कोसळली. अपघात इतका भीषण होता की कारचे पुढील चाके तुटून पडली असून वाहन पूर्णपणे चक्काचूर झाले.

या अपघातात कारमधील चार जण उडून शेतात फेकले गेले, तर दोघे कारखाली दबले. यात रोहित भगवानदास रील (वय



२५, रा. वाल्मीकनगर, कारंजा) आणि संकेत राजेश मेश्राम (वय २५, रा. गवळीपुरा, कारंजा) यांचा जागीच मृत्यू झाला. यशवंत घनश्याम राठोड (वय ३१), ओम दीपक मुंदे (वय १९), आर्यन अमोल अंभोरे (वय १९, सर्व रा. कारंजा) तसेच अक्षय संजय रोकडे (वय २७, रा. दादगाव, ता. कारंजा) हे गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच मुर्तिजापूर येथील श्रीमती लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयाच्या तीन रुग्णवाहिका आपत्कालीन पथकासह घटनास्थळी दाखल झाल्या. ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक चंदन वानखडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक कानडे यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. सर्व जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दोघांना मृत घोषित केले. गंभीर जखमींपैकी तिघांना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले, तर एक जखमी नातेवाइकांनी अमरावती येथे नेल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दरम्यान, उमरी (अरब) गावाजवळील हा परिसर दोन्ही बाजूंनी वळणाचा असून चालकांना वळणाचा अंदाज येत नसल्याने वारंवार अपघात होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. अपघातानंतर घटनास्थळी तसेच रुग्णालयात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## एमएसएमई राष्ट्रव्यापी क्रेडिट आउटरीच कार्यक्रम शनिवारी

### सवलतीच्या दरात कर्ज आणि स्पॉट सॅन्शनची संधी

**अमरावती/प्रतिनिधीः-** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांना (MSME) बळ देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावतीत विशेष 'राष्ट्रव्यापी क्रेडिट आउटरीच' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दस्तूर नगर येथील ओल्ड बायपास रोडवरील कमल प्लाझा येथे सकाळी ११ वाजता हा सोहळा पार पडणार असून, उद्योजकांना एकाच छताखाली बँकेच्या विविध योजना, सबसिडी आणि कर्ज सुविधांबाबत सविस्तर मार्गदर्शन मिळणार आहे. या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून सेंट्रल बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील उपमहाव्यवस्थापक हेमंत शर्मा उपस्थित राहणार असून, विशेष व्याख्याते सनदी लेखापाल पंकज अग्रवाल एमएसएमई कर्जातील सबसिडी योजनांवर प्रकाश टाकणार आहेत. तसेच बडनेरा एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर यांची उपस्थिती याप्रसंगी राहणार आहे.

या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सहभागी उद्योजकांना पात्रतेनुसार 'इनप्रिन्सिपल सॅन्शन लेटर' घटनास्थळीच उपलब्ध करून दिले जाणार आहे. सेंट्रल बँकेच्या एमएसएमई महोत्सवांतर्गत उद्योजकांना सर्वात कमी व्याजदर आणि प्रक्रिया शुल्कात विशेष सवलतींचा लाभ घेता येईल. यासोबतच उद्यम नोंदणी आणि जीएसटी अनुपालनाबाबतही तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. अमरावतीतील नवउद्योजक आणि प्रस्थापित व्यावसायिकांनी आपल्या व्यवसाय विस्तारासाठी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावतीचे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नरेश हेडाऊ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी उद्योजकांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

## १ व १० वरिल उर्वरित

### एमडी प्रकरण ः पोलीसांच्या

गुरुवार ५ फेब्रुवारी पत्रकारांशी संवाद साधताना दिली. पालकमंत्र्यांनी सांगितले की शहरात एवढ्या मोठ्या प्रमाणात अमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आलेला आहे हा विषय चिंतेचा आहे. विशेष म्हणजे शहर पोलिसांना याबाबत माहिती नव्हती.या प्रकरणाची संपूर्ण तपासणी करून संबंधितांवर कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रकरणात पोलीस कर्मचाऱ्यांचाही सहभाग आहे का याचा तपास केला जाणार आहे. त्यांनी स्पष्ट केले की अवैध धंदे खपवून घेतले जाणार नाही.

**संसदेत काँग्रेसचे वर्तन लोकशाहीला न शोभणारे-** संसदेत काँग्रेसच्या महिला सदस्यांनी थेट पंतप्रधानांच्या दिशेने धावून जाणं ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. काँग्रेस पक्षाची मानसिकता दर्शविणारी आहे. लोकशाहीच्या मंदिरात अशा प्रकारचं वर्तन करणं, अजिबात स्वीकारहार्ह नाही. हे वर्तन विक्षिप्तपणाचं लक्षण असून लोकशाही मूल्यांना धक्का देणारं आहे, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. जगभर आणि देशभर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मोठी मान्यता असताना संसदेच्या पवित्र सभागृहात अशा प्रकारचे प्रदर्शन करणं हे लोकशाहीला मान्य नाही. जनता काँग्रेसला धडा शिकवणार', असा इशारादेखील चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

### युतीधर्म नुसार महापौर-उपमहापौर नि

काँग्रेसने भाजपला निवडणुकीत सहकार्य करावे आणि महापालिकेत भाजपची सत्ता स्थापन व्हावी, अशीच त्यांची इच्छा होती. यासंदर्भात त्यांच्याशी चर्चाही झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यासोबत देखील चर्चा झाली होती. आमदार संजय खोडके आणि आमदार सुलभा खोडके यांनी महापौरपदाचा अर्ज भरतानाच आम्हाला पाठिंबा दिला होता. पुढेही आम्हाला त्यांचे सहकार्य राहणार आहे. असे पालकमंत्री म्हणाले.

### 'कॉपीमुक्त' अभियानावर भर,

काळात खंडित वीज पुरवठ्याची समस्या उद्भवू नये यासाठी महावितरणला सतर्क राहण्यास सांगितले आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर केंद्रावर पोहोचता यावे यासाठी परिवहन मंडळाने जादा बसचे नियोजन करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रत्येक परीक्षा केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त असणार असून महसूल विभागाची विशेष भरारी पथकेही कार्यरत राहतील. पंचायत समिती स्तरावरील वर्ग-१ आणि वर्ग-२ च्या अधिकाऱ्यांची नियुक्ती या पथकांमध्ये केली जाणार आहे. परीक्षेचे गांभीर्य राखण्यासाठी केवळ प्रशासकीय तयारीच नाही, तर विद्यार्थी आणि पालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शपथ देखील देण्यात आली आहे. 'कॉपीमुक्त' आणि 'भयमुक्त' वातावरणात प्रत्येक विद्यार्थ्याला आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळावी, हाच या नियोजनाचा मुख्य उद्देश असल्याचे येरेकर यांनी सांगितले.

सर्व शिक्षक, संस्थाचालक आणि पालकांनी या परीक्षा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे आणि विद्यार्थ्यांनी कोणत्याही दडपणाशिवाय अभ्यासावर लक्ष केंद्रित करून परीक्षेला सामोरे जावे, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

### जिमवरून परतणाऱ्या तरुणीचे

आला. त्याने तरुणीला धमकावून जबरदस्तीने कारमध्ये बसवले आणि तिचे अपहरण केले.आरोपीने पीडितेचे अपहरण करून तिला वलगाव मार्गावरील एका निर्जन जंगलात नेले. तिथे त्याने तिच्यासोबत अश्लील चाळे करून अत्याचाराचा प्रयत्न केला. पीडितेने प्रतिकार केला असता, आरोपीने तिला अमानुष मारहाण केली, तिच्या चेहऱ्यावर थुंकून तिचा अपमान केला. इतकेच नव्हे तर, या घटनेबाबत कोणाला सांगितल्यास तिच्या वडील आणि भावाला जीवे मारण्याची धमकीही दिली.

**तक्रारीनंतर पोलिसांची कारवाई-** घाबरलेल्या पीडितेने कसाबसा स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला आणि विनंती करून तिला शहरात सोडायला लावले. घरी पोहोचल्यावर तिने घडलेला सर्व प्रकार आपल्या नातेवाईकांना सांगितला. त्यानंतर कुटुंबियांनी तात्काळ गाडगे नगर पोलीस स्टेशन गाठून तक्रार नोंदवली. आरोपीचे किशोर शिवने याच्याविरूध्द पोलिसांनी कलम ७४, ७६, ७८, ७९, ११५(२), १४०(१), २९६, ३५१(३) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस सध्या आरोपीचा शोध घेत असून पुढील तपास सुरू आहे.

### रेल्वे पोलीस ठरले देवदूत

करत होते. त्यावेळी तेथे कर्तव्यावर हजर असलेले पोलीस हवालदार प्रदीप घोडकर यांनी त्यांना ट्रेनमध्ये न बसण्याच्या सूचना दिल्या. परंतु त्यांना वर्धा जाणे जरुरी असल्याने ते धावत्या ट्रेनमध्ये बसण्याकरिता कोच मध्ये चढत असताना त्यांचा तोल जाऊन खाली पडत होते. पोलीस हवालदार प्रदीप घोडकर यांनी प्रसंगावधान दाखवत स्वतःच्या जीवाची परवा न करता रत्नपारखे यांना पकडून प्लॅटफॉर्मवर ओढून घेतले. यामुळे त्यांच्या जीव वाचला. नंतर रत्नपारखे यांनी हवालदार घोडकर यांचे आभार मानले आणि बसने वर्धा येथे गेले. कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार घोडकर यांचा वरिष्ठांकडून पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

### मोर्शी पोलीसांची शेतशिवारातील

आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत,उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार यांचे नेतृत्वात पो.स्टे.मोर्शी येथील डी.बी.पथकाचे पोउपनि आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार छत्रपती करपते, स्वप्निल बायस्कर, अथर्व कोहळे यांनी केली.

### ५७ हजार शेतकऱ्यांच्या खिशात

आपल्या मातृभाषेतून संवाद साधू शकतात.विविध बाजार समित्यांमधील शेतीमालाचे भाव तात्काळ कळत असल्याने शेतकऱ्यांना विक्रीचे निर्णय घेणे सोपे जात आहे. तसेच दररोजचा अचूक हवामान अंदाज यावर उपलब्ध आहे. खतांचे नियोजन, कीड-रोग नियंत्रण आणि कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती या एकाच प्लॅटफॉर्मवर मिळते.या ॲपमुळे शेती व्यवस्थापन अधिक प्रभावी होणार असून, तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादन वाढवण्यास शेतकऱ्यांना मोठी मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी वेळ आणि पैशांची बचत करण्यासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. गुगल प्ले स्टोअरवरून 'महाविस्तार एआय' ॲप डाउनलोड करून डिजिटल क्रांतीचा भाग व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अर्चना निस्ताने यांनी केले आहे.

### चांदूर रेल्वे पोलीसांकडून अवैध

नावे आहेत. ही कारवाई पोलीस निरीक्षक, चांदूर रेल्वे पोलिस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस हवालदार रवि भुताडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने हेड कॉन्स्टेबल जगदीश राठोड , हेड कॉन्स्टेबल योगेश नेवारे आणि पोलीस कॉन्स्टेबल संदीप बदुकले यांच्या संयुक्त प्रयत्नांतून केली. पोलिस पथक पेट्रोलिंगवर असताना आरोपी संशयास्पद परिस्थितीत ६ जनावरांसह आढळून आले. चौकशीदरम्यान ही जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याचे समोर आले. याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली असून पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहेत.

### कविता वानखडे हत्याकांडाचा

महिन्या पासून इकडे तिकडे भटकत होता आणि पोलिसांना चकवत होता. शेवटी तो गुजरात राज्यातील अहमदाबाद येथे लपला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तेथे जाऊन त्याला पकडले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक आयुक्त कैलाश पुंडकर यांच्या मार्गदर्शनात फ्रेजरपुराचे पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, निलेश गावंडे यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक राहुल महाजन, सुभाष पाटील, शशिकांत गवई, सागर चव्हाण, जावेद पटेल, राहुल मेहकर व गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

### आरोग्य शिबिरात २२६ पत्रकारांनी

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या चमूने उपस्थित राहून सर्वांची सखोल आरोग्य तपासणी केली. यामध्ये प्रामुख्याने रक्तातील चरबीचे प्रमाण तपासण्यासाठी संपूर्ण 'लिपिड टेस्ट', तसेच 'फुल बॉडी चेकअप' करण्यात आले. वाढत्या डिजिटल कामामुळे डोळ्यांवर येणारा ताण लक्षात घेऊन विशेष 'नेत्र तपासणी' आणि 'दंत चिकित्सा' शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

शिबिरात रूग्ण तपासणीसाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार, मुख्यमंत्री सहायता निधीचे डॉ. श्याम गावंडे, ससंसर्गजन्य रोग विभागाचे डॉ. प्रज्ञा कडू, वैभव झुकरे, पल्लवी बोरकर, श्रद्धा कडू, टीबी हॉस्पीटलचे नितीन बेदरकर, शुभांगी उमरकर, दंत महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ. अपूर्वा रोडे, डॉ. जान्हवी अंबाडकर, डॉ. पूजा शिंदे, डॉ. वेदश्री भडवे, डॉ. प्रितीका काळे, डॉ. अमिषा जुनघरे, डॉ. इशान पाटील, प्रमोद बकाडे, सुभाष दिघेकर, वैद्यकीय चमूतील डॉ.रूपाली ठाकरे, डॉ. प्रज्ञा चौधरी, डॉ. वैभव देशमुख, धीरज राऊत, संजीवनी सोनवणे, डॉ. नायब शेख आदी यांनी सहकार्य केले. शिबिरासाठी पालकमंत्री जनसंपर्क कार्यालयाचे शशांक चौरे यांनी पुढाकार घेतला.

या आरोग्य शिबिरामध्ये पत्रकारांना 'आयुष्मान भारत कार्ड'ची सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली होती. यावेळी ४८ पत्रकारांना आयुष्मान भारत कार्ड तात्काळ उपलब्ध करून देण्यात आले. या कार्डमुळे पत्रकारांना भविष्यात विविध गंभीर आजारांवरील उपचारांसाठी शासकीय योजनेचा लाभ घेता येणार आहे.

आपत्कालीन परिस्थितीत हृदयविकाराचा झटका किंवा अन्य कारणांमुळे श्वास थांबल्यास व्यक्तीचे प्राण वाचवण्यासाठी 'सीपीआर' ही प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरते. या विषयावर यावेळी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञ डॉ. राधा सावदेकर यांनी प्रात्यक्षिक देऊन उपस्थितांना यावेळी मार्गदर्शन केले.

### अ.भा.आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला मोठया स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाची दीर्घ परंपरा लाभली आहे. संपूर्ण भारतात अमरावती विद्यापीठाची ओळख एक जबाबदार आणि शिस्तबध्द यजमान म्हणून आहे. या स्पर्धेसाठी संपूर्ण भारतातून विद्यापीठाचे संघ सहभागी झाले होते. सर्व सामने पारदर्शकपणे पार पडल्याबद्दल त्यांनी सर्व आयोजक आणि पंच समितीचे विशेष आभार मानले. येणा-या जागतिक सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड करताना या स्पर्धेतील पहिल्या चार क्रमांकावर राहिलेल्या संघांमधील गुणवान खेळाडूंचा प्राधान्याने विचार करावा. भविष्यात जागतिक स्तरावरील निवड चाचणी स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी अमरावती विद्यापीठ सदैव सज्ज असेल, असेही कुलगुरू म्हणाले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष डॉ. दिलीपबाबू इंगोले यांनी स्पर्धेत सहभागी खेळाडूंचे भरभरून कौतुक केले. श्री शिवाजी शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील दुस-या क्रमांकाची सर्वात मोठी संस्था असून विदर्भातील दहा जिल्ह्यांमध्ये ३४० हून अधिक महाविद्यालयांच्या माध्यमातून ही संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. स्पर्धेचे नियोजन अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने पार पाडल्याबद्दल समाधान व्यक्त करुन कालिकत विद्यापीठाचा उल्लेख करीत आपण पहिली आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा कालिकत येथे खेळल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. केवळ जिंकणे महत्त्वाचे नसून आपला सर्वोत्तम खेळ प्रदर्शित करुन निवड समितीचे लक्ष वेधून घेणारा असावा, असा मोलाचा सल्ला त्यांनी खेळाडूंना दिला. खेळात जयपराजय होतच असतो, परंतु आपला खेळ सर्वांच्या स्मरणात राहील व देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळेल असा असला पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी भरतपूर संघाचे कोच अभिषेक व कालिकत विद्यापीठाचे मोहम्मद अली यांनी मनोगत व्यक्त करतांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राहण्याची व प्रवासाची उत्तम सोय केल्याचे सांगितले. सर्व अम्पायरने सर्व सामन्यांचे अचूक परिक्षण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सर्व जजेसचा सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट टिचर पुरस्कार श्री जगदीश (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ कॅचर रोहित सहारे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ बेसमॅन सोनू गुजर (भरतपूर), लेखराज व राजपुत (माधव विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ शॉटअप जितेंद्र (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ राईट फिल्डर श्री अभिषेक (कालिकत विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ सेंटर फिल्डर रोहन पोटे (अमरावती विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ लेफ्ट फिल्डर जयपाल (भरतपूर विद्यापीठ), सर्वश्रेष्ठ ऑलराऊंडर कॅप्टन ऋतिक पुडवे (अमरावती विद्यापीठ) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. विद्यापीठ गीताने समारोप समारंभाची सुरूवात झाली. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. रुपाली इंगोले यांनी स्पर्धेचा अहवाल मांडला. संचालन डॉ. दिनेश खेडकर व डॉ. रेखा मग्गीरवार यांनी, तर आभार क्रीडा संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी मानले. स्पर्धेच्या आयोज़नाकरिता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील सर्व शिक्षक डॉ. कविता वाटाणे, सर्व शारीरिक शिक्षक तसेच विद्यापीठ शारीरिक शिक्षक विभागातील संतोष वानखडे, अरुण लोहे, अब्दुल तौसिफ आदिंनी परिश्रम घेतले. समारोप कार्यक्रमाला स्पर्धेचे मुख्य परिक्षक मुकुंद देशपांडे, महाविद्यालयातील शिक्षक व खेळाडू मोठया संख्येने उपस्थित होते.

### वाळू वाहतूक बंदमुळे ५००

महसूल व पोलीस अधिकाऱ्यांच्या केलेल्या कारवाईमुळे होत आहे. पर राज्यातून वाहतूक करणे पूर्णतः बंद असून महाराष्ट्रातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर येथील घाटावर रॉयल्टीसह वाहतूक करीत होतो. जनता दरबार मध्ये खोटी तक्रार करून दिशाभूल केली आहे. संबंधित व्यक्ती नावाचा गैरवापर करत आहे. ज्या वाहनाकडे वाळूची रॉयल्टी आहे त्यांना सोडून विना रॉयल्टी वाहतूक करणाऱ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. यावेळी सचिन भोपळे, मिलिंद जवंजाळ,पंकज देशमुख, करीम लालूवाले, निलेश सुरडकर, सचिन ढवळे, आशिष कदम, आकाश बिजवे, अभिजीत केशरवाणी, अभिषेक मोरे ,अजय ढवळे ,अजय शेळके, अनिकेत सातपुते, अंकुश चौधरी, अतुल मानतकर, अविनाश खत्री, भूषण गुप्ता, लक्ष्मण पाठक, सुनील मोहोड, गजानन धुमोने, गजानन काळबांडे, गौरव सायंडे, गोपाल धर्माले ,तौसीफ अब्दुल सलीम, शेख इमरान शेख हारून, लोकेश गोमकाळे, नयन कोष्टी, निखिल निंभोरकर, निकेश जवंजाळ सह इतर उपस्थित होते.

### स्वच्छ सर्वेक्षण २०२५ च्या अनुषंगाने

याची प्रत्यक्ष खातरजमा त्यांनी केली. अनुपस्थिती, कामातील दिरंगाई अथवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यानंतर त्यांनी प्रभागातील विविध महत्त्वाच्या ठिकाणांची पाहणी केली. यामध्ये GVP परिसर, आठवडी बाजार, माळीपुरा, दुर्गापूर रोड, झिरी रोड, नांना-नाणी पार्क परिसर, जयस्तंभ चौक तसेच बडनेरा बसस्थानकाच्या बाजूचा परिसर यांचा समावेश होता. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, रस्त्यांवरील कचरा उचल, नाल्यांची साफसफाई, तसेच बाजार परिसरातील स्वच्छतेची स्थिती याबाबत त्यांनी सविस्तर निरीक्षण केले. पाहणीदरम्यान नागरिकांची वर्दळ अधिक असलेल्या भागांमध्ये स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नसल्याचे सांगत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुधारात्मक उपाययोजना तात्काळ राबविण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपस्थित असलेले स्वास्थ निरीक्षक मेघराज डेंडवाल व सुमेध मेश्राम यांना स्वच्छतेच्या कामावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे, कामगारांची नियमित तपासणी करण्याचे तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याचे निर्देश देण्यात आले. स्वच्छ सर्वेक्षणाच्या दृष्टीने प्रत्येक प्रभागाने सर्वोत्तम कामगिरी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.स्वच्छ सर्वेक्षण २०२५ मध्ये अमरावती शहराचा दर्जा उंचावण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाकडून नियोजनबद्ध पद्धतीने उपाययोजना राबविण्यात येत असून, अशाच प्रकारे सर्व झोनमध्ये नियमित पाहणी, नियंत्रण व मार्गदर्शन सुरू राहणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सांगितले.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. **132/19/2025**
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री महादेव मंदिर, शिंगणवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री गजानन शालीकराम जाधव**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-०१ अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/ अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) **जंगम मिळकत (वर्णन) :-** निरंक
(ब) **स्थावर मिळकत (वर्णन) :-** १. मौजा रा.शिंगणवाडी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील मालमत्ता क्रमांक १८७ येथील एकुण क्षेत्रफळ २६४६ चौ.फुट (२४६ चौ.मी.) पैकी एकूण बांधकाम १३२० चौ.फुट (१२३ चौ.मी.) खुली जागा १३२६ बाय (१२३ चौ.मी.) चौ.फुट
संस्थानच्या जागेची चर्तुसिमा पुर्वेस :- सरकारी रस्ता, पश्चिमेस :- विश्वनाथ ठाकरे यांचे घर, उत्तरेस :- सरकारी रस्ता, दक्षिणेस :- सरकारी रस्ता
**किंमत अंदाजे अंकात २,६३,४२३/- (अक्षरात दोन लाख त्रेसष्ठ हजार चारशे तेवीस हजार रुपये फक्त)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०४.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक, (न्यायशाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**

**जाहीर नोटीस**
प्रोसेस नं.२०९/२०२६
दिवाणी न्यायालय व स्तर, दर्यापूर
दि.२२.०१.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**
किरकोळ अर्ज क्र.३३/२०२६ ने.ता. २७.०२.२०२६

**अर्जदार -**
१. आशा पुरुषोत्तम होले, वय ७४ वर्षे, धंदा -घरकाम
२. श्रीकांत पुरुषोत्तम होले, वय ४५ वर्षे, धंदा -शेती
३. प्रांजली पुरुषोत्तम होले, वय ५० वर्षे, धंदा -नोकरी
अ.क्र. १ ते ३ रा. सांगळूदकर नगर, बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
४. गितांजली सागर विधाते, वय ४८ वर्षे, धंदा -नोकरी
रा. बी-२०२, डॅफोडील एवेन्यू एस नं. १७/२/ए/१, मराठा मंदिर जवळ बावदान,पुणे सिटी, ता.जि.पुणे

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार-** निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **पुरुषोत्तम बाळकृष्णराव होले** हे **दिनांक २९.१२.२०१२** रोजी मरण पावल्या आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १९२७ चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
**सहा.अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर**
**विद्यमान श्री.के.ए.पटटेबहादुर अतिरिक्त सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२३८७/२०२५
**दिवाकर -वि- निरंक**
**जाहीरनामा/सायटेशन** पुढील ता.१२.०३.२०२६

**अर्जदार :** दिवाकर झाबुराव बांगडे, वय ६४ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
रा.एलआयसी कॉलनी, मुदलियार नगर, अमरावती

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत झायबुराव इस्तरजी बांगडे व उषाताई झाबुराव उर्फ बापुराव बांगडे** हे अनुकमे दि.**०२.११.१९९१ व २६.०३.२००२** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **अर्जदार दिवाकर झाबुराव बांगडे** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिवाकर झाबुराव बांगडे** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**जाहीर नोटीस**
प्रो.नं.२०८०/२०२५
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०६.१०.२०२५

वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
**किरकोळ अर्ज क्र.५०/२०२६** **दिनांक ०७.०३.२०२६**

**अर्जदार -**
१. **सुभाष गुलाबराव चव्हाण,** वय ४५ वर्षे, धंदा - मजुरी
२. **दुर्गा रमेश सोळंके,** वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
अ. क्र.१ व २ रा.सांगळूद, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **प्रभा सुभाष सोळंके,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.मधापुरी, ता.मुर्तिजापुर, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **गुलाब बाबूजी चव्हाण** हे दिनांक **१९.०३.२००५** रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन - गुलाब बाबूजी चव्हाण** यांचे नांवे मौजा सांगळूद, ता.दर्यापूर, जि.अमरावती ग्रा.प. सांगळूद अ.क्र.८२२,मालमत्ता क्र.५१७, ११७.०६चौ.मि. (१२६० चौ.फुट) यावर बांधलेले पडके घर येणे प्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजारभाव किंमत १०,००० रु.आहे.

आज दि.**२९.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
**सहा.अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर**

जनमाध्यम
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
एक प्रतिष्ठित सवय
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# बालाजी संकुल परिसरातील अवैध देहव्यापार व अवैध व्यवसायामुळे नागरीक त्रस्त

## कारवाईची एकमुखी मागणी : जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**शहरातील बालाजी संकुल परिसरात अवैधरित्या सुरु असलेला देहव्यापार, गुन्हेगारी व अनैतीक कृत्यामुळे परिसरातील नागरीक व व्यापारी त्रस्त झाले आहेत. या परिसरात होणाऱ्या देहविक्रीच्या कृत्यावर बंदी करुन नागरीक व व्यापाऱ्यांना दिलासा देण्याची एकमुखी मागणी व्यापारी व नागरीकांनी केली आहे. यासंदर्भात सोमवार, २ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी, नगर परिषद अध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.**



सदर निवेदनात नमुद आहे की, शहरातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणून पाटणी चौकाचा भाग ओळखला जातो. त्यातच नजीकच्या बालाजी संकुलात कापड इलेक्ट्रॉकल्स, हार्डवेअर, किराणा, फुटवेअर, सोनार, मोबाईल शॉपी यासारख्या दुकानांसोबत विविध राष्ट्रीयकृत बँका असून त्यामुळे या भागात नागरीकांची खुप वर्दळ असते. असे असले तरी या बालाजी संकुल परिसरात सुरु असलेल्या अवैध देहव्यापाऱ्याच्या धंदयामुळे नागरीक व व्यापारी बांधवांना विविध प्रकारचा त्रास सहन करावा लागतो. तसेच या देहव्यापाराच्या धंदयामुळे पुरुष व महिला ग्राहक या भागात येण्यास संकोच करतात. येथे येणाऱ्या नागरीकांना देहव्यापारातील महिला विनाकारण त्रास देतात. वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया रस्त्यावर उभ्या राहून अश्लिल हावभाव करतात. रात्रीच्या वेळेला व्यापाऱ्यांच्या दुकानासमोर झोपून घाण करणे, दुकानदारांना पैशाची मागणी करणे, नाही दिले तर अश्लिल शिवीगाळ करणे, कोणी हटकले तर अंगावर रॉकेल घेणे, शिवीगाळ करणे व जातीवाचक गुन्हे दाखल करण्याची धमकी देणे हे प्रकार नित्याचेच झाले आहेत. वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिला आपल्या जागेऐवजी इतर जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करुन देहव्यापार करत आहेत. या प्रकारामुळे सभ्य व्यक्ती व स्त्रिया या भागातील पार्कींगच्या जागेत गाड्या ठेवण्यास घाबरतात. बऱ्याच वेळ वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांनी व्यापाऱ्यांशी हुज्जत घालून विनाकारण गुन्हे दाखल केले आहेत. इतकेच नव्हे तर लहान मुले सुध्दा गुन्हेगारी व्यवसायाशी जोडली गेली असून येथे रोजच भानगडी, चोरीचपाटी व लुटमारीच्या घटना घडत आहेत. या सर्व कारणामुळे येथील व्यापारी, महिला व नागरीक त्रस्त झाले असून या देहव्यापाराला संरक्षण देणाऱ्या गुंड व्यक्तीकडून दादागिरी करुन व्यापाऱ्यांना धमकावले जात आहे. अशा परिस्थितीत व्यापार करणेही मुश्कील झाले आहे. व्यापारी व दुकानदारांना होत असलेला हा त्रास पाहता देहव्यापार करणाऱ्या महिलांवर कठोर कारवाई करावी व हे अवैध व्यवसाय त्वरीत बंद करण्यासंदर्भात योग्य ती कायदेशीर कारवाई करुन नागरीक व व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे. निवेदन देतांना वसंत परळकर, तेजस परळकर, राम लोहकरे, सौ. सविता कांबळे, सुरेश कांबळे, संतोष विश्वकर्मा, विजय शेळके, अमोल हेंद्रे, सैय्यद अतीक, उमेश मुंदडा आदी उपस्थित होते.

# सत्ताधारी नगरसेविकेच्या प्रभागात अस्वच्छतेचा कळस

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

नगर पंचायत मालेगावमधील प्रभाग क्रमांक २ मध्ये सध्या अस्वच्छतेचा प्रश्न चिघळला असून, सत्तेत असलेल्या शिवसेनेच्या नगरसेविका रज्जु काळे यांच्या प्रभागातच स्वच्छतेचा बोजवारा उडाल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे, या प्रभागातील मूलभूत कामांसाठी नगरसेविकेच्या पती गजानन काळे यांना थेट मुख्याधिकाऱ्यांना टोकाची भूमिका घेत लेखी अर्ज करावा लागत असेल, तर सर्वसामान्य नागरिकांची कामे कशी होत असतील, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

निवडणुका पार पडून नगरसेवक, नगराध्यक्ष पदभार स्वीकारून अनेक दिवस उलटले असताना प्रभाग क्रमांक २ मध्ये अद्याप नाली सफाई कर्मचारी पोहोचले नाहीत. कचरा रस्त्यावर साचलेला



दुर्गंधीमुळे नागरिक हैराण, आरोग्याचा धोका वाढलेला असतानाही नगर पंचायत प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष ठळकपणे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर गजानन काळे यांनी दिलेल्या अर्जात ४ ते ५ दिवसांत स्वच्छता न झाल्यास मी स्वतः नाल्या साफ करून साचलेला कचरा नगर पंचायत कार्यालयाच्या आवारात आणून टाकीन असा स्पष्ट इशारा दिला आहे. हा अर्ज म्हणजे केवळ एक तक्रार नसून सत्ताधाऱ्यांच्या अपयशाचे जिवंत प्रमाण असल्याचे बोलले जात आहे.

सत्ताधारी पक्षाची नगरसेविका असलेल्या प्रभागातच ही अवस्था असेल, तर विरोधकांच्या किंवा सामान्य नागरिकांच्या प्रभागातील परिस्थिती काय असेल, हा प्रश्न आता चर्चेचा विषय ठरला आहे. सत्ता असूनही कामे होत नसतील, तर ही सत्ता नेमकी कुणासाठी? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत आहेत.

नगर पंचायत आरोग्य विभागाने तात्काळ हालचाल न केल्यास हे प्रकरण अधिक चिघळण्याची शक्यता असून सत्ताधाऱ्यांची नाचक्की होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

सध्या तरी, प्रभाग क्रमांक २ मधील अस्वच्छतेवरून सत्तेची पोलखोल झाली आहे, एवढे मात्र नक्की.

# मालेगाव शहर वाहतूक कोंडीत गुदमरले



## म्बुलन्स अडकल्या, प्रशासन ढिम्म!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव शहरातील मुख्य रस्त्यांवर सध्या अराजक माजले असून, अतिक्रमण, बेकायदेशीर पार्किंग, हातगाड्या व अनधिकृत व्यवसायांच्या विळख्यात संपूर्ण वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे या गोंधळामुळे रुग्णवाहिका व आपत्कालीन सेवा देखील वेळेवर पोहोचू शकत नसून, प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचा संतापजनक आरोप सामाजिक कार्यकर्ता अजय उत्तमराव घुगे यांनी केला आहे. लहुजी वस्ताद पुतळा ते जोगदंड हॉस्पिटल, मेडिकल चौक ते डॉ. विवेक माने हॉस्पिटल, अग्निहोत्री दुकान ते जुना बस स्टॉप, तसेच पोलीस स्टेशन ते ना. ना. मुंदडा शाळेपर्यंतचे रस्ते अतिक्रमणांनी अक्षरशः गिळंकृत केले आहेत. ठिकठिकाणी उभ्या असलेल्या दुचाक्या, हातगाड्या आणि रस्त्यावरच थाटलेले व्यवसाय यामुळे वाहने तर दूरच, पण पादचाऱ्यांनाही मार्ग काढणे कठीण झाले आहे. एखादा गंभीर रुग्ण ॲम्बुलन्समधून या मार्गाने नेणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. जुना बस स्टॉप परिसरात नाल्यावरच रसवंती गाळे उभारून समोर कॅन्टिंग वाढवण्यात आली आहे. परिणामी दुचाकी थेट रस्त्यावर उभ्या राहत असून वाहतूक कोंडी नित्याचीच झाली आहे. नगरपंचायतने वाहन पार्किंगसाठी उपलब्ध करून दिलेल्या जागेवरही नियमबाह्य फलक लावून अतिक्रमण केले जात असल्याचे चित्र आहे.

अत्यंत गंभीर आणि संतापजनक बाब म्हणजे शहरातील मुख्य रस्त्यावरच मास विक्री सुरू असून, धारदार शस्त्रांनी रस्त्यावरच मास कापले जात आहे. त्याच रस्त्यावरून शाळकरी लहान मुले-मुली नाकावर रुमाल धरून ये-जा करत आहेत. याच मार्गाने पायदळ श्री संत गजानन महाराज शेगाव वारीही जाते. दुर्गंधी, घाण आणि अस्वच्छतेमुळे श्वास घेणेही कठीण झाले असून, आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'हे सर्व प्रकार नगरपंचायत आणि पोलीस प्रशासनाच्या नजरेसमोर घडत असताना कारवाई का होत नाही?' असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.

# वाढदिवसाचा केक कापण्यापेक्षा युवकांचे भविष्य घडवण्याला महत्त्व

## पोलीस भरतीतील विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप



**रिसोड :** सध्याच्या काळात वाढदिवस म्हणजे मोठमोठे बॅनर, डीजे आणि केक कापून होणारा जल्लोष असे समीकरण बनले आहे. मात्र, या सर्व दिखावेबाजीला फाटा देत ॲड. सागर (भारत) इरतकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या गरजू आणि कष्टाळू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या पुस्तकांचे वाटप करून त्यांनी आपला वाढदिवस खऱ्या अर्थाने सार्थकी लावला.

युवकांचे भविष्य घडवण्याला प्राधान्य 'वाढदिवसाचा केक कापण्यापेक्षा युवकांचे भविष्य घडवणे अधिक महत्त्वाचे आहे,' हा विचार समोर ठेवून हा उपक्रम राबवण्यात आला. पोलीस भरतीसाठी अहोरात्र सराव करणाऱ्या युवकांना मार्गदर्शक पुस्तकांचा अभाव भासू नये, या हेतूने ॲड. इरतकर यांनी हा स्तुत्य निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

शेकडो विद्यार्थी आणि मित्र परिवाराची उपस्थिती या कार्यक्रमाला शेकडो विद्यार्थी आणि मित्र मंडळाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी आणि युवकांनी ॲड. इरतकर यांच्या या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले. केवळ हार-तुरे स्वीकारण्यापेक्षा भविष्यातील खाकी वर्दीचे स्वप्न पाहणाऱ्या युवकांच्या हातात ज्ञानाची शिदोरी देणे, ही आजच्या काळाची गरज असल्याचे मत यावेळी उपस्थितांनी व्यक्त केले. या अनोख्या वाढदिवसाची चर्चा संपूर्ण

> 'राजकारणात आणि समाजकारणात काम करताना तरुणांच्या हाताला काम मिळणे आणि त्यांना योग्य दिशा मिळणे गरजेचे आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त या विद्यार्थ्यांना छोटीशी मदत करता आली, याचे मला समाधान आहे.'
> **- ॲड. सागर इरतकर**

परिसरात होत असून, ॲड. इरतकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. प्रमुख उपस्थिती मित्र परिवार विजय इंगळे, इरफान सय्यद, धनंजय माळेकर माऊली मेडिकल चे संचालक अनंत देशमुख, ज्ञानसागर ॲकॅडमीचे संचालक प्रमोद बाबळे सर, कोच हनुमान कोरडे, ॲड काळबांडे, ऋषी मगर, आकाश सरोदे, सुनील काळे, संतोष सोनुने, ऋषी घोडे, हनुमान इंगळे, व अनेक विद्यार्थी हजर होते.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

**अकोला :** आदिवासी विकास विभागातर्फे परदेशातील शैक्षणिक संस्थांत २०२६-२७ या वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएडी अशा अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. त्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.

परदेशातील संबंधित शैक्षणिक संस्था जागतिक क्रमवारीत २०० च्या आत असावी. उमेदवार व उमेदवाराचे आई,वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावे.

# आत्मशक्तीच्या जोरावर यशाची झेप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिमकरांचा लाडका बाल समुपदेशक व लेखक म्हणून ओळख असलेल्या अवघ्या १२ वर्षीय विराज शिंदे याची ५३ व्या राज्यस्तरीय बाल वैज्ञानिक विज्ञान प्रदर्शनासाठी (दिव्यांग श्रेणी) निवड झाली आहे. ही निवड वाशिम जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, कोंडाळा महाली येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात वाशिमचे बहुपरिचित विधानपरिषद सदस्य किरणराव सरनाईक तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धुपे यांच्या हस्ते विराजला पारितोषिक देऊन गौरविण्यात आले होते. विशेष म्हणजे, विराजची इन्स्पायर नॅशनल साठी यापूर्वीच निवड झाली आहे.

मेडिकल ट्रीटमेंट, सर्जरी अशा अनेक अडचणींवर मात करत आत्मविश्वास आणि इच्छाशक्तीच्या जोरावर पुढे जाता येते, हे विराजने आपल्या यशातून सिद्ध करून दाखवले आहे.

# महिलांच्या पुढाकाराने अखंड हरिनाम सप्ताह झाला साकार

**वाशिम :** श्री संत गजानन महाराजांच्या कृपाशिर्वादाने हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील गुगुळ पिंपरी येथे श्री संत गजानन महाराज महिला सेवा समिती द्वारा आयोजित कार्यक्रमाचा प्रथम दिवस अगदी उत्साहात पार पडला. विशेष गोष्ट म्हणजे सप्ताहातील श्री संत गजानन महाराज भावनेरूपण कथाकार ह.भ.प.पवनजी महाराज जाधव वृंदावन धाम . त्याचप्रमाणे सात दिवसातील सात कीर्तनकार , तसेच गायनाचार्य ,मृदंगाचार्य ,विणेकरी चोपदार मंडप डेकोरेशन, साऊंड सिस्टिम , सप्ताह मधील लागणाऱ्या सर्व गोष्टी निशुल्क असून समाजापुढे महिलांनी आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे. या कार्यक्रमासाठी सर्व कलाकार गावातीलच असून यांनी सप्ताह आजीवन साजरा करण्याचा संकल्प केला आहे.

# बकरी चोरी प्रकरणातील फरार तिघे अटकेत

## चारचाकी-दुचाकी जप्त; माना पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

माना पोलीस स्टेशन हद्दीत दाखल बकरी चोरी प्रकरणात फरार असलेल्या तीन आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली चारचाकी व दुचाकी वाहनेही जप्त करण्यात आली असून, बकरी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे.



या संदर्भात पोलीस स्टेशन माना येथे गुन्हा रजिस्टर क्र. ०१/२०२६ भा.न्या.सं. कलम ३०३ (२), ३१७ (२), ३ (५) बीएलएस अन्वये गुन्हा दाखल आहे. फिर्यादी सतीश रघुनाथ पाथरे (वय ३४, रा. गुर्जवाडा, ता. मुर्तिजापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ६ जानेवारी रोजी रात्री ८ ते ७ जानेवारी सकाळी ६ वाजेदरम्यान गुर्जवाडा शेतशिवारातील गट क्रमांक ७५ येथून अज्ञात चोरट्यांनी बकऱ्यांची चोरी केली होती. या गुन्ह्यात यापूर्वी चोरीस गेलेल्या बकऱ्या एका आरोपीकडून जप्त करण्यात आल्या होत्या; मात्र उर्वरित आरोपी फरार होते. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवून रोहन रामराव ढोके (वय २१, रा. उमरी बाजार, ता. दर्यापूर, जि. अमरावती), मोहन जीवन शिवरकर (वय ३२, रा. पाडी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती) आणि मयूर हिम्मतराव ढोके (वय २८, रा. उमरी ममदाबाद, ता. दर्यापूर) यांना अटक केली. आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेले चारचाकी वाहन (क्र. एम.एच. २७ एच ९४२२) अंदाजे किंमत ६० हजार तसेच दुचाकी वाहन (क्र. एम.एच. २७ एच.जी. ८३७२) अंदाजे किंमत २५ हजार जप्त करण्यात आली आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# कुतुहल विज्ञान प्रदर्शनी संदर्भात नियोजन बैठक उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विज्ञान भारती व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांच्या वतिने ६ ते ८ फेब्रुवारी आयोजीत कुतुहल विज्ञान प्रदर्शनी संदर्भात शनिवार ३१ जानेवारी रोजी आयोजीत नियोजन बैठकीला मोठा प्रतीसाद मीळाला.



सदर बैठकीला नगराध्यक्ष अनील केंदळे,विज्ञान भारती नागपूरचे नरेंद्र सातफळे डॉ हरीष बाहेती ,जिल्हा संघकार्यवाह शंकरराव ढोबळे,नगरसंघचालक जहागीरदार ,राष्ट्रीय स्वयमसेवक संघाचे विक्रम बावरे,ललीत भूरे,राजेष गोकूले,बाळासाहेब मेहकरकर,शेख मोबीन,नागपूर येथील विज्ञान भारतीचे रोहीत गनोरकर,मीलींद ठोकळ,आशिष जैन, अविनाश मारशेटवार, रेडीओ वत्सगुल्मचे इरफान सय्यद,ॲड सुरेश टेकाळे,निलेश सोमानी,सनदि लेखापाल ओझा,भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सौ.कविता खराट,अंजली पाठक, सौ.भारती सोमानी, वृषाली टेकाळे,शेख परवेज, समवेत मान्यवर उपस्थीत होते. सदर बैठकीत कुतुहल प्रदर्शनी करीता श्री संत गजानन सेवा समीती द्वारा स्वंयसेवा संघ स्थापन करण्यात आला असुन विविध मान्यवरांकडून वेगवेगळ्या सेवासूविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.सोबतच चेतन सेवांकुर श्रृपचा आरोग्य संगीत संध्या ,आरोग्य किर्तन आयोजीत करण्यात येणार आहे.समाजसेवक संघटना यांच्यावतीने विद्यार्थ्यांन करता नास्ता खीचडी वाटप,सोबतच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्राध्यापक व विद्यार्थी २४ तास सेवा देणार आहे. नर्सींग/फॉमसी कॉलजचे विद्यार्थी स्वयंमसेवक म्हणून सेवा देणार आहे.हृदयविकार आल्या नंतर त्यांचा जीव वाचवीन्यासाठी सीपीआर ट्रेनीग विद्यार्थ्यांना मीळनार असून वाशिम येथे राष्ट्रीय विक्रम होण्याची माहीती देण्यात आली. यामध्ये सहभागी होनाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमानपत्र देण्यात येणार आहे.

# सेवानिवृत्ती म्हणजे नवीन पर्वाची सुरुवात -ॲड.किरणराव सरनाईक

■ प्रतिनिधी | रिसोड ■

सेवानिवृत्ती हा सेवेचा शेवट नसून नवीन पर्वाची सुरुवात असल्याचे मत ॲड. किरणराव सरनाईक यांनी रिसोड येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया मध्ये आयोजित सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना व्यक्त केले.



येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सेवानिवृत्त झाल्याबद्दल ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक व सेवक गुणवंतराव सरनाईक यांना निरोप देण्यात आला. या निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ?ड.किरणराव सरनाईक हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ संचालक पंजाबराव देशमुख, जितेंद्रकुमार दलाल, वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे, रिसोड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष साहेबराव जाधव, प्राचार्य दिनकर सरकटे, प्राचार्य सज्जन बाजड, प्राचार्य सावसुंदर, रिठद येथील प्राचार्य विजय ढेंगळे, रिसोड चे प्राचार्य संजय देशमुख, उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, माजी प्राचार्य के.बी.देशमुख, शिवाजी मराठी प्राथमिकचे मुख्याध्यापक सचिन देशमुख, शिवाजी उर्दू प्राथमिकचे मुख्याध्यापक अनिस खान, सेवानिवृत्त ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक, सेवानिवृत्त सेवक गुणवंतराव सरनाईक व त्यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिमा पुजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मंचावरील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सेवानिवृत्त ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक व गुणवंतराव सरनाईक यांचा सपत्नीक शाल-श्रीफळ, साडीचोळी व भेटवस्तू देऊन शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला, तसेच अमरावती विभागीय शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष या नात्याने आमदार किरणराव सरनाईक यांनी या दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. पुढे बोलताना किरणराव सरनाईक म्हणाले की बऱ्याच जणांना असे वाटते की आता आपण सेवानिवृत्त झालो म्हणजे आपल्या जबाबदाऱ्या कमी झाल्या, मात्र सेवानिवृत्ती ही नवीन पर्वाची सुरुवात असल्यामुळे आपल्या सेवेच्या कालावधीत आपण सामाजिक व कौटुंबिक जबाबदारी पासून थोडे दुरावलेले असतो आता त्या जबाबदाऱ्या वाटून घेऊन समाजासाठी व कुटुंबासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेने कार्यरत राहावे असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. याप्रसंगी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे स्थानिक शाळा समिती संचालक पंजाबराव देशमुख, वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे यांची समायोचित भाषणे झाली.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ७२ ■ शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


आर्वीत सत्तेचाच स्फोट

## गृहराज्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात भाजप आमदारांनी गुन्हेगारीवर वाचला पाडा

‘एमडी ड्रग्ज, वेश्याव्यवसाय, पोलिसांची मेहेरबानी’

### - भूमिपूजन मंच ठरला आरोपांचे रणांगण



**आर्वी जनमाध्यम :** पोलिस स्टेशनच्या नव्या इमारतीच्या भूमिपूजनासाठी जमलेला कार्यक्रम क्षणार्धातच राजकीय आणि प्रशासकीय स्फोटाचा साक्षीदार ठरला. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांच्या समोरच भाजपाचे ज्येष्ठ नेते व विधान परिषदेचे आमदार दादाराव केचे यांनी पोलिस प्रशासनाची अक्षरशः धुलाई केली. विरोधक नव्हे, तर सत्ताधारी पक्षातीलच आमदार मंचावरून तक्रारींचा पाढा वाचत असल्याने, सत्तेतील विसंवाद उघडपणे चव्हाट्यावर आला.

आर्वी शहरात एमडी ड्रग्ज घराघरात पोहोचले आहेत. तरुण पिढी उद्ध्वस्त होते आहे. मुलींच्या अब्रू रस्त्यावर आणल्या जात आहेत, असे वक्तव्य आमदार केचेंनी करताच उपस्थितांमध्ये खळबळ उडाली. पोलिस फोन उचलत नाहीत, त्यामुळे लोकप्रतिनिधींना थेट मुंबईला फोन लावावा लागतो, असे सांगत त्यांनी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

इतकेच नव्हे तर, शहरातील हॉटेलांमध्ये उघडपणे वेश्याव्यवसाय सुरू असल्याचा आरोप करत, हे सर्व पोलिसांच्या आशीर्वादानेच चालते, असा धक्कादायक आरोपही त्यांनी केला. आर्वी शहरात अवैध धंद्यांना अक्षरशः उदाण आले असून, कायदा-सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र त्यांनी रंगवले.

या कार्यक्रमाला गृहराज्यमंत्री पंकज भोयर, आमदार सुमीत वानखेडे, जिल्हाधिकारी वान्मथी सी. आणि पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल उपस्थित होते. मात्र पोलिस स्टेशनच्या इमारतीच्या भूमिपूजनापेक्षा, पोलिसांच्या अपयशावरच अधिक प्रकाशझोत पडला.

राजकीय वर्तुळात चर्चेचा मुद्दा ठरलेला हा प्रकार विरोधकांनी केला असता तो नेहमीचा आरोप मानला गेला असता. मात्र भाजपचेच आमदार सत्ताधाऱ्यांविरोधात अशी भूमिका घेत असल्याने, गृहराज्यमंत्र्यांचा प्रशासनावरील दरारा कमी पडतो आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

भूमिपूजनाचा सोहळा आरोप-प्रत्यारोपांच्या रणांगणात बदलल्याने, भाजपमधील अंतर्गत संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

नवी पोलिस इमारत उभी राहील पण आर्वीतील कायदा-सुव्यवस्था सावरणार तरी कोण असा प्रश्न नागरिक करीत आहे,

# जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न- पालकमंत्री डॉ.भोयर

## आर्वी पोलिस स्टेशनच्या इमारत बांधकामाचे भूमिपूजन

### इमारत बांधकामावर ६ कोटी ६८ लाखांचा खर्च होणार

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी पोलिस स्टेशनच्या प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते करण्यात आले. नव्या इमारतीवर ६ कोटी ६८ लाख रुपयांचा खर्च होणार असून, यामुळे जिल्ह्यातील पोलिस प्रशासनाची कार्यक्षमता वाढीस लागेल, असे पालकमंत्री म्हणाले.

कार्यक्रमात आमदार दादाराव केचे, आ. सुमित वानखेडे, माजी आमदार सुधाकर कोहळे, नगराध्यक्ष स्वाती गुल्हाणे, जिल्हाधिकारी वान्मथी सी, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, उपवनसंरक्षक हरविर सिंह यांच्यासह अनेक उच्च अधिकारी उपस्थित होते.



पालकमंत्री डॉ. भोयर यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर पोलिस प्रशासनाच्या इमारती, निवासस्थाने आणि पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर उभारल्या जात आहेत. जिल्ह्यात पोलिसांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्यावर आमचा भर आहे, असे ते म्हणाले.

वर्धा हा दारूबंदी जिल्हा असून, अवैध दारु तपासणीसाठी नागपूरला नमुने पाठवावे लागतात. पालकमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार, वर्ध्यात लवकरच न्याय सहाय्य वैद्यकीय प्रयोगशाळा उभारली जाईल, ज्यामुळे तपासणी स्थानिक स्तरावर होईल. राज्यभरात २५५ मोबाईल व्हॅन पोलिसांना दिल्या आहेत, त्यात वर्ध्याचे उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय देखील समाविष्ट आहेत.

आर्वीतील नवीन पोलिस स्टेशनची इमारत इंग्रजकालीन होती आणि नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागण्यांनंतर या इमारतीचे बांधकाम सुरू होत आहे. आमदार वानखेडे यांनी स्पष्ट केले की, नव्या इमारतीतून नागरिकांना न्याय मिळावा आणि पोलिस प्रशासन अवैध धंदे, व्यवसायावर कटाक्ष ठेवेल.

यावेळी विद्युत वितरण विभागाच्या आर्वी येथील नवीन विभागीय कार्यालयाचे भूमिपूजनही पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या हस्ते करण्यात आले. नवीन इमारत ७० लाख ९५ हजार रुपयांच्या निधीत तयार होणार असून, विभागीय सेवा सुधारण्यात मोठा हातभार लागणार आहे.

पोलिस अधीक्षक श्री. अग्रवाल यांनी सांगितले की, नव्या इमारतीमुळे पोलिसांना चांगले वातावरण मिळेल आणि त्यांच्या कामाची कार्यक्षमता निश्चितच वाढेल. भूमिपूजन कार्यक्रमाचा प्रारंभ पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या हस्ते कुदळ मारून तसेच नामफलक अनावरण करून करण्यात आला.

## मडकं हातात, ‘राम नाम सत्य’चा गजर; स्मशानभूमीच्या अंधारावर विरोधकांचा पालिकेत हल्लाबोल

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** शहरातील पळसगाव रोडलगतच्या स्मशानभूमीत मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने चक्क स्वर्गरथाच्या लाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार करावे लागल्याच्या घटनेने सिंदी शहर हादरून गेले आहे. मंगळवारी कै. शकुंतलाबाई लोणारे यांच्या अंत्यविधीवेळी वीज नसल्याने निर्माण झालेल्या या विदारक प्रसंगाचे पडसाद समाजमाध्यमांवर उमटले. दिवसभर शहरभर संतप्त प्रतिक्रिया उमटत राहिल्या. अखेर या संतापाचे रूपांतर बुधवारी (ता. ४) थेट आंदोलनात झाले.

नगरपालिकेतील विरोधी गटाच्या नगरसेवकांनी मातीचे आक्ट (मडक) हातात घेऊन, ‘राम नाम सत्य’च्या घोषणांत शहरातून मोर्चा काढत पालिका कार्यालयावर धडक दिली. हा केवळ निषेध नव्हता, तर पालिका प्रशासनाच्या संवेदनशून्य कारभारावर केलेला थेट प्रहार होता. मुख्याधिकारी पौर्णिमा गावीत यांना निवेदन देत शहरातील सर्व



स्मशानभूमीतील व्यवस्था तातडीने सुधारण्याची ठाम मागणी करण्यात आली. अन्यथा पुढील काळात मृत नागरिकांचे अंत्यसंस्कार थेट पालिका कार्यालयासमोरच करण्यात येतील, असा खरमरीत इशाराही यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात विरोधी पक्षनेते अजय कलोडे यांच्यासह आशिष देवतळे, तुषार हिंगणेकर, गंगाधर कलोडे, जगदीश बोरकर, सुरज कोपरकर, वर्षा बोंबले, ज्योत्स्ना तडस, जयश्री मडावी, दुर्गा बेलखोडे आदी नगरसेवक व अनेक नागरिक सहभागी झाले होते. स्मशानभूमीतील अंधाराने आता राजकीय अंगण तापवले असून, पालिका प्रशासन काय भूमिका घेते याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

## रानडुकराच्या हल्ल्यात तरुण शेतकरी गंभीर जखमी

-बोरी (कोकाटे) शिवारातील थरारक घटना; वन्यप्राण्यांच्या उपद्रवाने शेतकरी भयभीत

**सेलू जनमाध्यम :** शेती वाचवायची तर जीव धोक्यात घालावा लागतो, अशीच भीषण प्रचिती बोरी (कोकाटे) शिवारात बुधवारी (४ फेब्रुवारी) रात्री आली. पिकांच्या रखवालीसाठी गेलेल्या शेतकऱ्यावर जंगली वराहाने अचानक हल्ला चढवून त्यास गंभीर जखमी केल्याची घटना रात्री साडेआठच्या सुमारास घडली. या हल्ल्यात विकास मारुती सरमाके (वय ४०, रा. बोरी कोकाटे) हे शेतकरी रक्तबंबाळ झाले.

विकास सरमाके यांची शेती जंगलालगत असल्याने जंगली प्राण्यांचा उपद्रव नेहमीच आहे. बुधवारी रात्रीही नेहमीप्रमाणे पिकांचे संरक्षण करण्यासाठी ते शेताकडे जात होते. मात्र, झुडपात दबा धरून बसलेल्या जंगली वराहाने अचानक त्यांच्यावर हल्ला चढविला. क्षणातच शांत शिवार रणांगणात बदलले.




जीवावर बेतलेल्या या प्रसंगात सरमाके यांनी धाडस दाखवत हल्ल्याचा प्रतिकार केला आणि कसाबसा आपला जीव वाचविला. मात्र या झटापटीत त्यांच्या डोक्याला, हाताला व पायाला गंभीर दुखापत झाली.

जखमी अवस्थेत ते गावात पोहोचताच ग्रामस्थांनी त्यांना तत्काळ रुग्णालयात दाखल केले. घटनेची माहिती पोलिस पाटील विकास कोकाटे यांनी हिंगणी येथील वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कळविली आहे.

बोरी व बोरधरण परिसरात जंगली प्राण्यांकडून वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतकरी अक्षरशः दहशतीखाली जीवन जगत आहेत. एकीकडे पिके वाचविण्याची चिंता, तर दुसरीकडे जीव धोक्यात घालण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. वनविभागाने तातडीने ठोस उपाययोजना करून जंगली प्राण्यांचा बंदोबस्त करावा, अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## सूर्यकुमार गांधी यांचे निधन



**वर्धा :** शिवाजी चौक केळकर वाडी येथील रहिवासी इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नामवंत व्यापारी व माहेश्वरी मंडळ, वर्धा येथील विश्वस्त सूर्यकुमार गांधी (वय ७९) यांचे गुरुवारी पहाटे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, स्नुषा, जावाई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## शशिकला देशपांडे यांचे निधन



वर्धा : स्थानिक गणेश कॉलनी येथील श्रीमती शशिकला वामन देशपांडे यांचे ५ फेब्रुवारी रोजी गुरुवारी सकाळी ८ वाजता वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले. त्या ८० वर्षाच्या होत्या .त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे बहीण आणि बराच मोठा परिवार आहे.

ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न अधिवेशनात गाजणार

## उपचार नाहीत, फक्त आश्वासने ६४ वर्षांपासून सिंदीकरांच्या आरोग्याशी खेळ

**ग्रामीण रुग्णालयाच्या मागणीने प्रशासन धारेवर**

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** लोकसंख्या वाढली, शहर विस्तारले, पण सिंदीच्या आरोग्य सुविधांचा दर्जा मात्र गेल्या ६४ वर्षांपासून जागेवरच ठप्प आहे. शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा द्यावा, या रास्त मागणीसाठी संतप्त सिंदीकर रस्त्यावर उतरले असून, प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात आवाज बुलंद केला जात आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २३ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या उन्हाळी विधानसभा अधिवेशनात तारांकित प्रश्नाद्वारे हा मुद्दा उपस्थित होणार असल्याने सरकारची कोंडी होण्याची शक्यता आहे.

सिंदी शहराची लोकसंख्या आज २२ ते २५ हजारांच्या घरात असून, शहरालगतच्या २५ ते ३० गावांतील नागरिकही आरोग्य सेवेसाठी याच केंद्रावर अवलंबून आहेत. मात्र या प्राथमिक आरोग्य केंद्रात केवळ प्राथमिक उपचारांची सोय असून, मध्यम व गंभीर आजारांवर उपचार करण्याची कोणतीही सुविधा नाही. परिणामी अपघात, प्रसूती किंवा आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वर्धा, सेवाग्राम किंवा नागपूर येथे हलवावे लागते.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे, तज्ज्ञ डॉक्टरांच्या कमतरतेमुळे व आवश्यक वैद्यकीय उपकरणांच्या अभावामुळे हे केंद्र अक्षरशः निष्प्रभ झाले आहे. वेळेवर उपचार न मिळाल्याने अनेकांचे जीव धोक्यात आले असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत.

आरोग्य हा मूलभूत हक्क असताना सरकार केवळ आश्वासनांवर वेळकाढूपणा करत आहे, असा संतप्त सवाल सिंदीकरांकडून केला जात आहे. आता हा प्रश्न विधानसभेत गाजणार असल्याने सरकार ठोस निर्णय घेते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## झुल्यावरून पडून रंगकामगाराचा मृत्यू

४० फूट उंचीवरून कोसळले, मिलिंद सोमकुवर ठार

**वर्धा जनमाध्यम :** सालोड हिरापूर येथील टीटीनगरमध्ये इमारतीचे रंगकाम करताना मिलिंद सोमकुवर (५६, गाडगेनगर) झुल्यावरून खाली कोसळले. ३० ते ४० फूट उंचीवरून पडल्यामुळे गंभीर जखमी अवस्थेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून कामाच्या ठिकाणी सुरक्षा उपायांचा अभाव असल्याची तक्रार स्थानिकांनी केली. परिसरात दुर्दैवी घटनेची हळहळ पसरली असून, कामगारांच्या जीव सुरक्षित ठेवण्याचे आवाहन होत आहे. सावंगी पोलिस घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा केला आहे.

## छतावरून पडून बांधकाम मजूर ठार

तोल गेला, नंदलाल प्रधान मृत्यूमुखी


**वर्धा जनमाध्यम :** आनंदसागर सिटी, उमरी मेघे येथे घराचे बांधकाम करताना नंदलाल प्रधान (४५, पेंदाराई) छतावरून खाली पडले. २०–२५ फूट उंचीवरून कोसळल्याने गंभीर दुखापतींमुळे त्यांचा मृत्यू झाला.

पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करत घटनेची छाननी सुरू केली आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नियमांचा अभाव असल्याचे लक्षात आले. परिसरातील लोकांनी बांधकाम क्षेत्रातील सुरक्षा उपायकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. मृत्यूच्या धक्क्यामुळे परिसरात हळहळ पसरली आहे.

## शेततळ्यात बुडून चिमुकल्याचा मृत्यू

-चार वर्षीय रोहित जुबेर खान

शेततळ्यात बुडून ठार



**वडनेर जनमाध्यम :** सोनेगाव धोटे शिवारात शेततळ्यात बुडून चार वर्षीय रोहित जुबेर खान (रा. ठेकठी, राजस्थान) याचा मृत्यू झाला. सोलम यांच्या शेतातील पाण्यात चिमुकला पडल्यामुळे काही वेळातच मृत्यू झाला.

वडनेर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. स्थानिकांनी शेततळ्यांची योग्य संरक्षण व्यवस्था करण्याचे आवाहन केले आहे. घटनेने परिसरात हळहळ पसरली असून पालक आणि शेतकऱ्यांमध्ये सावधगिरी बाळगण्याची शिदोरी निर्माण झाली आहे.

लादेन नगरवर अखेर हातोडा?

## ३० वर्षांचे अतिक्रमण हटविण्याचे आदेश धडकले !

**-१५ दिवसांत झोपड्या खाली नाहीत तर थेट बुलडोझर -प्रशासन जागे होणार की पुन्हा कागदी घोडे नाचणार?**

**सिंदी रेल्वे । मोहन सुरकार-** शहरालगतच्या वनजमिनीवर गेल्या तीन दशकांपासून बिनधास्तपणे उभे असलेले अतिक्रमणधारी ‘लादेन नगर’ अखेर प्रशासनाच्या रडारवर आले आहे. अनेक वर्षांच्या तक्रारी, निवेदने आणि जनआक्रोशानंतर बुधवारी (दि.४) वनविभागाकडून अतिक्रमण हटविण्याचे आदेश धडकताच सिंदीकरांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली आहे. मात्र १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर खरोखर कारवाई



होणार की पुन्हा प्रशासन माघार घेणार, हा सवाल आता ऐरणीवर आहे.

रेल्वे उड्डाणपुलालगत हिंगणी वनपरिक्षेत्राअंतर्गत परसोडी येथील झुडपी जंगलातील सर्वे क्रमांक २६, २७ व २८ मधील तब्बल ३.७१ हेक्टर वनजमिनीवर ३०-३५ वर्षांपासून बेकायदेशीर कब्जा करण्यात आला आहे. या ठिकाणी बांगलादेशी (रोहिंगे) तसेच वडार समाजातील मिळून ६७ कुटुंबांनी पक्की घरे बांधून वनजमीन गिळंकृत केल्याचा आरोप आहे. या अतिक्रमणाविरोधात विविध संघटनांनी वारंवार तक्रारी केल्या. प्राथमिक वनगुन्हाही दाखल झाला. मात्र ६-७ वर्षे उलटूनही अतिक्रमण ‘जैसे थे’च राहिले, यावरून प्रशासनाचा ढिसाळ कारभार उघड झाला. या निष्काळजीपणाविरोधात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भाजपचे स्थानिक पदाधिकारी व समाजसेवकांनी आक्रमक पाठपुरावा सुरू केला.

२८ जुलै २०२५ रोजी वर्ध्यात झालेल्या जनता दरबारात कॅबिनेट मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदन देत तात्काळ कारवाईची मागणी करण्यात आली. आदेश झाले, पण सहा महिने उलटूनही कारवाई शून्य राहिल्याने २६ जानेवारी २०२६ रोजी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची भेट घेऊन प्रशासनाच्या नाकावर टिच्चून हा विषय मांडण्यात आला. अखेर भोयर यांच्या आदेशानंतर वनविभाग हालचालीत आला. ३० जानेवारी रोजी वनविभागाकडून सर्व अतिक्रमणधारकांना अंतिम नोटीस बजावण्यात आली. नोटीसमध्ये स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले आहे की, १५ दिवसांत स्वखर्चाने अतिक्रमण हटवा, अन्यथा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ५४ अन्वये प्रशासन स्वतः अतिक्रमण काढून टाकेल. मुदतीनंतर कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.

या परिसरात वाढलेली अस्वच्छता, नशाखोरी, गैरवर्तन व गुन्हेगारी प्रकारांमुळे नागरिक त्रस्त झाल्याचे स्थानिकांचे आरोप आहेत. रेल्वेत विनातिकीट प्रवास, भीक न दिल्यास शिवीगाळ, मारहाण, चाकूहल्ल्याच्या घटना घडल्या असून शहरातील शांतता धोक्यात आली आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. जनभावना आता टोकाला पोहोचली आहे.

कायदा आहे, तक्रारी आहेत, मंत्र्यांचे आदेश आहेत; तरीही कारवाई होत नसेल तर ही शासन आणि प्रशासनाची सरळ नाकामी आहे.

**रितेश पालिवाल, प्रखंडमंत्री, विहिप, सिंदी रेल्वे**

नोटीस दिल्यानंतर १५ दिवसांत अतिक्रमण हटवावे. अन्यथा कलम ५४ अन्वये प्रशासन थेट कारवाई करेल.

**हरिलाल सरोदे, सहाय्यक वनसंरक्षक, वनविभाग, वर्धा**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांना झेड प्लस सुरक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

गृह विभागाने उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची वाय प्लस सुरक्षा व्यवस्था हटवून त्यांना झेड प्लस सुरक्षा व्यवस्था देण्याचा निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री आणि इतर महत्त्वाच्या जबाबदा-या त्यांच्याकडे असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारीला विमान दुर्घटनेत निधन झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी ३१ जानेवारीला उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. अजित पवार यांच्याकडे असलेल्या अर्थ खाते वगळता इतर तीन खात्यांची जबाबदारी देखील सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आली.उपमुख्यमंत्रिपद मिळाल्यानंतर अजित पवारांकडे असलेल्या पुणे आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्रिपद देखील सुनेत्रा पवार यांना देण्याचा



निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला होता. आता फडणवीस यांच्या गृह विभागाकडून सुनेत्रा पवार यांच्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत त्यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.झेड प्लस सुरक्षा व्यवस्था ही अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तींना पुरवली जाते. या सुरक्षा व्यवस्थेत १० कमांडोंची तुकडी, ५५ सुरक्षा कर्मचारी तसेच बुलेटप्रूफ वाहन पुरवले जाते. तसेच ही सुरक्षा व्यवस्था २४ तास संबंधित व्यक्तीसोबत असते.

**उपमुख्यमंत्रिपदाचा कार्यभार स्वीकारणार-** सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. मात्र, त्यांनी पदाचा कार्यभार अजून स्वीकारलेला नाही. अजित पवारांच्या निधनामुळे त्या सध्या बारामतीमध्ये आहेत. उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी सातारचा दौरा करत क-हाडमध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या समाधीचे दर्शन घेतले.



## लाडकी बहीणच्या कामावर महिला ■ बालविकास कर्मचा-यांचा बहिष्कार ■

**सांगली/ प्रतिनिधी**

महिला व बालविकास विभागातील प्रलंबित समस्या व प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अधिकारी, कर्मचा-यांनी आंदोलनाला सुरुवात केली आहे. जिल्ह्यात ६ हजार २००, तर राज्यभरात सहा लाखांहून अधिक अधिकारी आणि कर्मचारी आंदोलनात सहभागी झाले आहेत. बुधवारपासून ऑनलाईन बैठका, कामकाजाचे अहवाल देणे आणि लाडकी बहीण योजनेच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय संघटनेने जाहीर केला आहे.महिला व बालविकास विभाग राजपत्रित अधिकारी संघटना, अंगणवाडी पर्यवेक्षिका संघटना व इतर कर्मचारी संघटनांनी आंदोलन सुरू केले आहे. सांगलीत जिल्हाधिकारी अशोक काकडे व जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज जाधव यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) सोमनाथ रसाळ, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी वर्षा पाटील, तासगावचे बालविकास प्रकल्प अधिकारी सतीश नवले, सुहास बुधावले, अमोल पाटील,



रेखा रूपनर, राजकुमार ऐवळे यांच्यासह विविध तालुक्यांचे अधिकारी उपस्थित होते. विविध पदांचा आकृतिबंध सर्वसमावेशक करावा, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला व बालविकास विभाग यंत्रणा निर्माण करावी, विविध योजनांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे, विविध संवर्गाच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा करावी, जिल्हा परिविक्षा अधिकारी पद राजपत्रित घोषित करावे, पर्यवेक्षिका व मुख्य सेविका संवर्गाचे एकत्रीकरण करून वेतन तफावतीत सुधारणा करावी, विविध स्तरांवरील पदोन्नतीचे प्रस्ताव विहित कालमर्यादेत पूर्ण करावेत, अंगणवाडी कर्मचा-यांना नियमित कर्मचा-यांचा दर्जा मिळावा, त्यांचा स्वतंत्र सेवा प्रवर्ग तयार करावा, तोपर्यंत त्यांच्यासाठी नवीन कामगार संहितेनुसार सर्वसमावेशक धोरण निर्मिती करावी, धोरणांच्या निर्मिती प्रक्रियेत अधिकारी व कर्मचा-यांचा सहभाग वाढवावा आदी मागण्या संघटनेने केल्या आहेत. अधिकारी व कर्मचा-यांनी सोमवारी व मंगळवारी काळ्या फिती लावून काम केले. बुधवारपासून लाडकी बहीण योजनेसह विविध कामांवर बहिष्कार टाकण्यात येणार आहे. ९ ते ११ फेब्रुवारीस काम बंद आणि १२ फेब्रुवारीपासून सामूहिक रजा आंदोलन केले जाणार आहे.

## नमामि गंगेच्या धर्तीवर मुंबईतील नद्यांच्या प्रदूषण नियंत्रणासाठी विशेष निधी -वायकर

**मुंबई/प्रतिनिधी:** मुंबईतील प्रदूषित झालेल्या नद्यांमुळे या नद्यांच्या काठावर वास्तव्य करणा-या नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने या नद्यांना पुनरुज्जीवन करण्यासाठी नमामि गंगेप्रकल्पाच्या धर्तीवर मुंबईतील नद्यांच्या प्रदूषण नियंत्रण व पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी व योजना जाहीर करावी, अशी मागणी २७ मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी लोकसभेत नियम ३७७ अन्वये मागणी केली आहे. त्यांचा हा प्रस्ताव लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आला. लंडनच्या टेम्स नदीप्रमाणे या नद्यांचे वैज्ञानिक पद्धतीने पुनरुज्जीवन व सौंदर्यीकरण करण्यात आले, तर नुकत्याच विकसित झालेल्या कोस्टल रोडप्रमाणेच मुंबईच्या पर्यटनाला नवी दिशा व नवी उंची मिळेल, असे मत हि त्यांनी या प्रस्तावात नमूद केले आहे.मुंबई शहरातील मिठी, दहिसर, पोईसर आणि ओशिवरा या चार प्रमुख नद्या कधीकाळी शहराच्या जीवनरेखा होत्या व नैसर्गिक जलनिच-याचा मुख्य आधार होत्या. मात्र आज अनियंत्रित शहरीकरणामुळे या नद्या केवळ मोठ्या घातक उघड्या नाल्यांमध्ये रूपांतरित झाल्या आहेत, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. यामुळे या नद्यांच्या काठावर वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर धोका निर्माण झाला असून प्रदूषित पाणी थेट अरबी समुद्रात मिसळत असल्याने समुद्री परिसंस्थेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे प्रदूषणामुळे विद्रूप झालेला वर्सोवा समुद्रकिनारा असल्याचे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे.बृहन्मुंबई महानगरपालिका दरवर्षी या नद्यांच्या स्वच्छतेसाठी व पावसाळ्यापूर्वी गाळ काढण्यासाठी सुमारे ४०० ते ६०० कोटी रुपये खर्च करत असली, तरीही पुरेशा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांच्या (एसटीपी) अभावामुळे घाणेरडे पाणी थेट नद्यांमध्ये सोडले जात आहे.

## लोकसभेत पंतप्रधानांचे भाषण न झाल्याने तीव्र प्रतिक्रिया

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर चर्चा सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण होउ न शकल्याने बुधवारी संसदेत मोठा राजकीय वाद निर्माण झाला. या घटनेवर सत्ताधारी भाजपकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असून विरोधकांवर सभागृहाचे कामकाज जाणीवपूर्वक अडवण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या संदर्भात स्पष्टीकरण देताना सांगितले की, सभागृहातील परिस्थिती लक्षात घेता त्यांनी स्वत? पंतप्रधान मोदी यांना त्या वेळी सभागृहात न येण्याची विनंती केली होती. संपूर्ण देशाने काल



सभागृहातील परिस्थिती पाहिली. महिला खासदार त्या ठिकाणी जमा झाल्या होत्या जिथे पंतप्रधान बसतात. परिस्थिती अनिश्चित होती आणि पंतप्रधानांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होउ शकला असता असे त्यांनी स्पष्ट केले. ही घटना संसदेच्या प्रतिष्ठेला साजेशी नसल्याचे नमूद करत ओम बिर्ला यांनी पंतप्रधानांनी त्यांच्या विनंतीचा मान ठेवल्याबद्दल आभार व्यक्त केले. तसेच सभागृहात पोस्टर घेउन येत कामकाज अडवले गेले, तर संसद सुरळीत चालू शकत नाही, असा इशाराही त्यांनी विरोधकांना दिला. काही सदस्यांनी बुधवारी केलेले वर्तन अयोग्य असल्याची टीका ओम बिर्ला यांनी केली. तसेच अध्यक्षांच्या कार्यालयात घडलेली घटना ही संसदीय परंपरेवरील काळा डाग असल्याचे ते म्हणाले. सभागृह सुरळीत चालवण्यासाठी सर्व पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. दरम्यान, भाजप खासदार कंगना राणावत यांनी विरोधकांवर थेट आरोप केले. पंतप्रधान मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी सज्ज होते; मात्र त्याआधीच काँग्रेसच्या महिला खासदारांनी त्यांचा मार्ग पूर्णपणे अडवला, असा दावा त्यांनी केला. काही विरोधी खासदारांनी लोकसभा अध्यक्षांवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, असा गंभीर आरोपही त्यांनी केला. विरोधी पक्षातील महिला खासदार पंतप्रधानांच्या आसनाजवळ जमा झाल्या होत्या. अशा तणावपूर्ण वातावरणात पंतप्रधानांचे भाषण न होणे हा योग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक निर्णय असल्याचे राणावत म्हणाल्या.या घटनेमुळे संसदेतील कामकाज, लोकशाही मूल्ये आणि विरोधकांची भूमिका यावरून पुन्हा एकदा तीव्र राजकीय संघर्ष उफाळून आला आहे.

## 1,164 शाळांत मुलींसाठी प्रसाधनगृहेच नाहीत; हजारो शाळा अंधारात

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव समोर आले असून, तब्बल १,१६४ शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सोय नसल्याचे उघडकीस आले आहे. तर ३,३२८ शाळांमध्ये अद्याप वीज सुविधा उपलब्ध नसल्याचे भीषण वास्तव शिक्षण विभागाच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील सांख्यिकी अहवालातून उघडात आले आहे. मुंबई, गोंदिया, कोल्हापूर,



सातारा आणि ठाणे जिल्ह्यांमध्ये मात्र मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची शंभर टक्के सुविधा आहे.या अहवालामुळे राज्यातील शाळांमधील मूलभूत सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या शाळांमध्ये १,०४३ शासकीय, ६४ खासगी अनुदानित, २० खासगी विनाअनुदानित आणि ३७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वर्ष २०२४ ते २०२६ या दोन वर्षांतील शिक्षण विभागाचा सांख्यिकी अहवाल २९ जानेवारीला शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर केला गेला.मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसलेल्या सर्वाधिक ११२ शाळा बीड जिल्ह्यात आहेत. हिंगोली, नांदेड, परभणी, गडचिरोली, जळगाव, अमरावती, नाशिक आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये ५० ते १०० शाळांमध्ये ही सुविधा नाही. तर २० जिल्ह्यांमध्ये ५० पेक्षा कमी शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसल्याचे अहवालात म्हटले आहे. वीज नसलेल्या ३,३२८ शाळांमध्ये ३,१०२ शासकीय, १३१ खासगी अनुदानित, १९ विनाअनुदानित आणि ७६ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. वीज नसलेल्या शाळांचा तपशील : नंदुरबार- ४५५, गडचिरोली- ४३१, बीड- ३८६, नांदेड- २२९, परभणी- २००, हिंगोली- १७४, धुळे-१६३, नाशिक- १६३, संभाजीनगर- १५७, लातूर- १३६, जालना- ११८.

गोपनीयता धोरण- आमच्या उच्चस्तरीय बैठकीत शाळांमधील सुविधांच्या कमतरतेबाबतचा अहवाल सादर झाला. येत्या एक महिन्यात संबंधित शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहांची व्यवस्था केली जाईल, असे शिक्षण विभागाने या विषयी म्हटले आहे. मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह नसणे ही केवळ सोयीची नव्हे तर मुलींच्या शिक्षणावर थेट परिणाम करणारी बाब मानली जाते. किशोरवयीन मुलींसाठी सुरक्षित व स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा नसल्याने शाळा गळतीचे प्रमाण वाढण्याची शक्यता शिक्षणतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. राज्यातील २,४२८ शाळांमध्ये हँडवाश दिले जात नाही. अशा शाळांमध्ये १,५८७ शासकीय, ४५८ खासगी अनुदानित, ५६ विनाअनुदानित आणि ३२७ सेल्फ फायनान्स शाळांचा समावेश आहे. यामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.

## भारत आणि श्रीलंकेत रंगणार टी-20 विश्वचषकाचा थरार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** २०२६ टी२० विश्वचषक सुरू होण्यास फक्त दोन दिवस शिल्लक आहेत. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणारी ही स्पर्धा ८ मार्चपर्यंत चालेल. या काळात एकूण ५५ सामने खेळवले जाणार आहेत. ४० गट टप्प्यातील सामने, १२ सुपर-८ सामने, दोन उपांत्य फेरी आणि एक अंतिम सामना. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बांगलादेशला वगळले आणि स्क?टलंडला स्पर्धेत प्रवेश दिला आणि अद्यतनित वेळापत्रक जाहीर केले.

भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे आयोजित केलेल्या या क्रिकेट जल्लोषात अनेक हाय-व्होल्टेज सामने होतील. पण पाकिस्तानने १५ फेब्रुवारी रोजी स्पर्धेतील सर्वात मोठ्या सामन्यातून माघार घेण्याचा निर्णय घेतला. त्या दिवशी कोलंबोमध्ये भारत-पाकिस्तान सामना होणार होता. पण पीसीबीने सामन्यावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. चाहत्यांसाठी उत्साह काहीसा कमी होईल. जर ते ग्रुप अ मधील इतर संघांकडून पराभूत झाले तर सुपर एटमध्ये पोहोचण्याचा त्यांचा मार्ग कठीण होईल.

सुरुवातीच्या टप्प्यात, म्हणजेच ग्रुप स्टेजमध्ये, क्रिकेट चाहत्यांना जवळजवळ दररोज तीन सामन्यांचा थरार पाहायला मिळेल. १९ फेब्रुवारीपर्यंत ही स्पर्धा सर्वाधिक भरगच्च सामन्यांनी भरलेली असेल. दररोज तीन सामने खेळवले जातील. त्यानंतर, सुपर एट फेरी २१ फेब्रुवारी ते १ मार्च दरम्यान चालेल. ४ आणि ५ मार्च रोजी दोन उपांत्या फेरीचे सामने खेळवले जाणार आहेत. तर ८ मार्च रोजी अंतिम सामना होईल. पाकिस्तान त्यांचे सर्व सामने श्रीलंकेत खेळणार आहे. जर संघ अंतिम फेरीत पोहोचला तर अंतिम सामना देखील कोलंबोमध्ये खेळवण्यात येणार आहे. अन्यथा, अंतिम सामना अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये होणार आहे.

१९ फेब्रुवारीपर्यंत खेळल्या जाणा-या तीन सामन्यांपैकी पहिला सामना भारतीय वेळेनुसार सकाळी ११:०० वाजता, दुसरा दुपारी ३:०० वाजता आणि तिसरा सामना संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल. स्पर्धेची सुरुवात ७ फेब्रुवारी रोजी कोलंबोमध्ये पाकिस्तान आणि नेदरलँड्स यांच्यातील सामन्याने होईल. भारत ७ फेब्रुवारी रोजी वानखेडे स्टेडियमवर आपला पहिला सामना खेळेल. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल. तर ७ फेब्रुवारी रोजी वेस्ट इंडिज आणि स्क?टलंड यांच्यात ईडन गार्डन्सवर खेळला जाईल. गट टप्प्यातील सामने २० फेब्रुवारी रोजी ऑस्ट्रेलिया-ओमान सामन्याने संपतील.

यानंतर, सुपर ८ फेरीत २१, २३, २४, २५, २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी प्रत्येकी एक सामना खेळला जाईल. सुपर ८ फेरीत २२, २६ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी दोन सामने खेळले जातील. जर सुपर ८ मध्ये एक सामना असेल तर तो सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल. जर दोन सामने असतील तर पहिला




सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३:०० वाजता आणि दुसरा भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल. सर्व उपांत्य फेरी आणि अंतिम सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होतील.

गट टप्प्यात एकूण २० संघ सहभागी होतील. आयसीसीने यावेळीही तेच व्यापक आणि संतुलित स्वरूप स्वीकारले आहे, ज्यामुळे असोसिएट संघांना अधिक संधी मिळतील आणि सामने रोमांचक राहतील. २० संघांना चार गटांमध्ये (अ, ब, क आणि ड) विभागण्यात आले आहे, प्रत्येक गटात पाच संघ आहेत. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील उर्वरित चार संघांविरुद्ध चार सामने खेळेल. विजय मिळविल्यास संघाला दोन गुण मिळतात, निकाल न लागल्यास एक गुण मिळतो आणि पराभवाला शून्य गुण मिळतात. गट टप्प्यानंतर, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ सुपर ८ टप्प्यात प्रवेश करतील.गट टप्प्यातून पात्र ठरणारे आठ संघ सुपर ८ टप्प्यात खेळतील. येथे, या संघांना प्रत्येकी चार संघांच्या दोन गटात विभागले जाईल. प्रत्येक संघ त्यांच्या गटातील उर्वरित तीन संघांविरुद्ध तीन सामने खेळेल. आयसीसीने सुपर ८ साठी आधीच सीडिंग सिस्टम स्थापित केली आहे. पण जर एखाद्या उच्च क्रमांकाच्या किंवा सीडेड संघाला गट टप्प्यात बाहेर काढले गेले, तर ज्या संघाने त्यांना पराभूत करून पात्रता मिळवली ती सुपर ८ मध्ये त्याच स्थानावर खेळेल. याचा अर्थ असा की मागील संघाला दिलेला कोड अपरिवर्तित राहणार आहे.

यानंतर, जेव्हा संघ सुपर ८ साठी पात्र ठरतील तेव्हा त्यांना दोन गटांमध्ये विभागले जाईल जर हे संघ त्यांच्या संबंधित गटांमधून सुपर ८ साठी पात्र ठरले तर त्यांना त्यांचे सामने त्याच क्रमाने खेळावे लागतील. जर एखादा अपसेट झाला आणि दुस-या संघाने त्यांच्या गटातून सुपर ८ मध्ये स्थान मिळवले तर पूर्वनिर्धारित सीडेड संघाची जागा घेणारा संघ त्याची जागा घेईल. उदाहरणार्थ, जर भारत ग्रुप ए मधून सुपर ८ मध्ये पोहोचला आणि युनायटेड स्टेट्स ग्रुपमध्ये दुस-या क्रमांकावर राहिला तर सुपर ८ मध्ये अमेरिका पाकिस्तानची जागा दुस-या क्रमांकावर घेईल. सुपर ८ नंतर, प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. उपांत्य फेरीत, एका गटातील अव्वल संघ दुस-या गटातील उपविजेत्या संघाशी सामना करेल. दोन उपांत्य फेरीतील विजेते विजेतेपदाच्या लढतीत आमनेसामने येतील.

टी२० विश्वचषकातील प्रत्येक सामना निश्चित निकाल असतो. जर सामना बरोबरीत राहिला तर सुपर ओव्हरद्वारे विजेता ठरवला जाईल. आयसीसीचा असा विश्वास आहे की या स्वरूपामुळे केवळ मोठ्या सामन्यांचा उत्साह वाढेलच, शिवाय लहान संघांना स्वतःला सिद्ध करण्याची सुवर्ण संधी देखील मिळेल. एकूणच, २०२६ च्या टी२० विश्वचषकाचा प्रत्येक टप्पा, गट टप्प्यापासून अंतिम फेरीपर्यंत, रोमांचकारी असेल. २० संघांच्या या लढाईत, प्रत्येक सामना महत्त्वाचा असेल आणि चाहते संपूर्ण स्पर्धेत हाय-व्होल्टेज क्रिकेट पाहतील.

२०२६ चा पुरुषांचा टी२० विश्वचषक भारत आणि श्रीलंका संयुक्तपणे आयोजित करतील. आयसीसीने या मेगा स्पर्धेसाठी एकूण आठ ठिकाणे अंतिम केली आहेत, ज्यात भारतातील पाच आणि श्रीलंकेतील तीन ठिकाणे समाविष्ट आहेत. स्पर्धेचे नियम २०२४ च्या आवृत्तीसारखेच ठेवण्यात आले आहेत, ज्यामुळे सामने जलद, रोमांचक आणि निष्पक्ष होतील.

## संक्षिप्त

### २४ फेब्रुवारीला राज्य निवडणूक आयुक्तांची नवी दिल्लीत 'राष्ट्रीय परिषद'

**मुंबई/प्रतिनिधी:**भारत निवडणूक आयोगाच्या वतीने राज्य निवडणूक आयुक्तांची राष्ट्रीय परिषद २४ फेब्रुवारी २०२६ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित करण्यात आली आहे. देशातील सर्व राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील




राज्य निवडणूक आयुक्त या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. विशेष म्हणजे, ही राष्ट्रीय परिषद २५ वर्षांहून अधिक कालावधीनंतर होत असून, यापूर्वी अशी परिषद १९९९ साली आयोजित करण्यात आली होती. या परिषदेचो अध्यक्षस्थान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार भूषवणार असून, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती राहणार आहे परिषदेत राज्य निवडणूक आयुक्तांसह त्यांचे कायदेशीर व तांत्रिक तज्ज्ञ सहभागी होणार असून, निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. याशिवाय भारत निवडणूक आयोगाचे सर्व ३६ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य निवडणूक अधिकारी देखील या राष्ट्रीय परिषदेला उपस्थित राहणार आहेत. या परिषदेचा मुख्य उद्देश भारत निवडणूक आयोग आणि राज्य निवडणूक आयोगांमध्ये त्यांच्या-त्यांच्या कायदेशीर चौकटीत राहून निवडणूक प्रक्रिया व व्यवस्थापनाबाबत समन्वय अधिक मजबूत करणे हा आहे. परिषदेदरम्यान राज्ये व केंद्रशासित प्रदेशांतील मतदार पात्रतेसंबंधी निवडणूक कायदे, भारत निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या या डिजिटल प्लॅटफार्मसह तांत्रिक नवकल्पना, तसेच ईव्हीएम यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. भारत निवडणूक आयोग संविधान व देशातील कायदेशीर तरतुदींनुसार मतदार यादी तयार करणे व निवडणुका पार पाडण्याचा आपला व्यापक अनुभव या परिषदेत राज्य निवडणूक आयोगांशी सामायिक करणार आहे. राज्य निवडणूक आयोगांची स्थापना ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्ती तरतुदींनुसार संबंधित राज्यांच्या कायद्यांद्वारे करण्यात आली असून, पंचायत व नगरपालिका संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करणे तसेच निवडणुकांचे संचालन, दिशा व नियंत्रण ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगांवर सोपवण्यात आली आहे, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

### भाजप उमेदवाराचे पैसे वाटप करताना कर्मचा-याला पकडले

**सेलू :** जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक रणधुमाळी आता अंतीम टप्प्यात आली आहे. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध क्लृपत्या वापरण्यात येत आहेत.



सेलू तालुक्यातील देउळगाव गात गटात भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराचे पैसे वाटप करताना सेलू येथील बोर्डीकर कृषी महाविद्यालयाच्या कर्मचा-यास पकडण्यात आले आहे. या कर्मचा-याचे नाव श्रीनिवास गाडेकर असे आहे. या कर्मचा-यास पकडून आचारसंहिता पथकाने पंचनामा केला असल्याची माहिती सुत्रांकडून समजते. या संदर्भातील पैसे वाटपाचा व्हीडीओ देखील समाज माध्यमांवर चांगलाच व्हायरल झाला असून याची सर्वत्र चर्चा होताना दिसून येत आहे. पैसे वाटप करताना पकडलेल्या गाडेकर नामक कर्मचा-याने दिलेल्या माहिती व्हीडीओ समाज माध्यमांवर सर्वत्र फिरत आहे. या व्हीडीओत प्रत्येकी १००० रुपयाप्रमाणे १५ ते २० घरामध्ये पैसे वाटप केल्याचे संबंधित कर्मचारी सांगत असतानाचे पहावयास मिळते. तसेच गाडेकर यांना अधिक माहिती विचारली असता बोर्डीकर साहेब तसेच पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या महाविद्यालयात शिक्षक असून मला त्यांनी पैसे वाटप करण्याकरिता पाठवले असल्याचे व्हीडीओमध्ये पहावयास मिळत आहे. आपल्यासह इतर चौघे जण होतो मी केवळ कुणाला किती पैसे दिले याचा हिशोब लिहिण्याकरिता आलेलो आहे असे गाडेकर व्हीडीओमध्ये सांगताना दिसत आहे. यासंदर्भात आचारसंहिता पथकातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पथकाने पंचनामा केला असल्याचे समजते. या व्हायरल झालेल्या पैसे वाटपाच्या व्हीडीओमुळे सेलू तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या सर्वच उमेदवारांकडून मतदारांना मोठ्या प्रमाणात पैसे वाटप होत असल्याची चर्चा सुरू आहे. यासंदर्भात सेलू तालुक्यातील निवडणूक निर्णय अधिकारी तथा आचारसंहिता पथकाने अशा घटनांवर लक्ष केंद्रीत करून ताबडतोब कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

### 'पार्थ पवारना क्लिनचीट मिळालेलीच नाही, चौकशी अजून सुरू!'

अंजली दमानियांचा खळबळजनक दावा

**मुंबई:** पार्थ पवार यांना पुण्यातील जमीन घोटाळ्यात क्लिनचीट मिळाल्याच्या बातम्या माध्यमांमध्ये झळकल्या आहेत. यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी या दाव्यांचे जोरदार खंडन केले आहे. 'पार्थ पवारना कोणतीही क्लिनचीट मिळालेली नाही, उलट त्यांची चौकशी अजूनही सुरूच आहे,' असे स्पष्ट करत



दमानिया यांनी या प्रकरणाला पुन्हा एकदा वाचा फोडली आहे. दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, 'हा अहवाल माध्यमांपर्यंत पोहोचलाच कसा? कारण अहवाल अद्याप पूर्ण झालेला नाही आणि तो रिलीजही झालेला नाही. या संदर्भातील शेवटची बैठक अद्याप होणे बाकी आहे.' दमानिया यांनी पुराव्यादाखल काही कागदपत्रांच्या प्रिंट आउट सादर केल्या आहेत. शीतल तेजवानी आणि पार्थ पवार यांच्यात झालेल्या करारावर पार्थ पवार यांचे नाव, सही आणि शिक्का असल्याचा दावा त्यांनी केला आहे. खारगे समिती पार्थ पवारला या प्रकरणातून बाहेर काढू शकत नाही. जर तसा प्रयत्न झाला, तर मी समितीला धारेवर धरीन,' असा इशाराही दमानिया यांनी दिला आहे. कोणत्याही परिस्थितीत पार्थ पवार या घोटाळ्यातून बाहेर येउ शकत नाहीत, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला असून, प्रसंगी उच्च न्यायालयात धाव घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### सर्वोच्च न्यायालयाचे आमदार रोहित पवारांवर ताशेरे!

**नवी दिल्ली:** महाराष्ट्र क्रिकेट संघटनेत सत्ता राखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आपल्याच पक्षातील ४०० जणांची बेकायदा घुसखोरी घडवून आणल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानेरोहित पवारांना मंगळवारी फटकारले. एवढी बेकायदा कामे करण्याची हिंमत होतेच कशी असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने रोहित पवारांना केला आहे. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जोयमाल्य बागची व न्या. विपुल एम. पांचोली यांच्या खंडपीठाने एमसीएच्या कार्यपद्धतीवर अत्यंत कडक शब्दांत टिप्पणी केली.



अचानक १५४ वरून ५७१ सदस्य वाढतातच कसे आणि एवढे सदस्य वाढवण्याची हिंमत होतेच कशी, असे प्रश्नही न्यायमूर्तींनी उपस्थित केले. सरन्यायाधीश सूर्य कांत म्हणाले की, भारतात अनेक उत्कृष्ट क्रिकेटपटू आहेत; जे निवृत्त झाले आहेत. तुम्ही ही ४०० सदस्यपदे त्या क्रिकेटपटूंसाठी खुली केली असती तर सर्वांनी तुमचा आदर केला असता. पण तुम्ही कोणाला घेउन येत आहात? ज्यांना बॅट कशी पकडायची हेसुद्धा माहीत नाही. सध्या जे काही सुरू आहे, त्यावर आम्हाला अधिक कडक शब्दांत भाष्य करायला लावू नका.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# चोरीचा मार्ग

भारतीय दंड संहितेच्या कलम ३७८ नुसार चोरी म्हणजेच, वस्तू पळविण्याचा एक गंभीर गुन्हा आहे. एखाद्याच्या संमतीशिवाय त्याची वस्तू किंवा जंगम मालमत्ता गैरमार्गाने काढून घेण्याची केलेली कृती हे चोरीच्या गुन्ह्यांचे स्वरूप मानले जाते. चोरीसाठी ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा असल्याने आजही समाजात चोरीच्या गुन्ह्यांतील आरोपीपासून सावध राहण्याचा सल्ला दिला जातो. इंटरनेटच्या जमान्यात आता चोरीच्या व्याख्येत थोडी भर पडली आहे ती, माहिती चोराची! माहिती चोरीचे गुन्हे संबंधित कंपन्या करत असतील, तर लोकांनी विश्वास कोणावर ठेवायचा? एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान 'डेटा शेअरिंग'च्या नांवाखाली वापरकर्त्यांच्या गोपनीयतेचे उल्लंघन करण्यावरून व्हॉट्सॲप आणि मेटा या कंपनीला सर्वोच्च न्यायालयाने कडक शब्दांत फटकारल्याने माहिती चोरीच्या गुन्ह्याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष गेले आहे. नागरिकांच्या मूलभूत गोपनीयतेत अधिकाराशी खेळू नका, असा सज्जड दम न्यायालयाने दिला. असे गुन्हे पुन्हा घडणार नाहीत अशी लेखी हमी संबंधित कंपनीने द्यावी, असे निर्देशही खंडपीठाने दिले. अलीकडच्या काळात एआयच्या माध्यमातून आणखी एक माहिती चोरीचा प्रकार उजेडात आला होता. जगभरात एआयचा वापर जसा झपाट्याने वाढतो आहे, तसे त्यातील धोकेही समोर येत आहेत. त्यामुळे एलन मस्क यांच्या एआय कंपनीचा चॅटबॉट ग्रोक वादात सापडला होता. यापूर्वी ग्रोक एआयने काही यूजरसोबत चुकीची भाषा वापरल्याच्या तक्रारी आल्यानंतर मस्क यांनी माफी मागितली होती. आता हा चॅटबॉट सामान्य लोकांच्या घराचे पत्ते, संपर्क क्रमांक आणि कुटुंबांची माहिती शेअर करत असल्याचे उघड झाले आहे. कोणत्याही व्यक्तीचा डेटा त्याच्या संमतीशिवाय सहज उपलब्ध केला जात असेल, तर ते अतिशय गंभीर आहे. त्यातून यूजरसोबत अनेक गैरव्यवहार झाल्याचे प्रकार होत असल्याचे उघडकीस येत आहे.सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात नेमके काय झाले? मेटा आणि व्हॉट्सॲपवर त्यांच्या गोपनीयता धोरणांसाठी अपिलीय न्यायाधिकरणाने २०२१ मध्ये ठोठावलेला २१३ कोटी रुपयांचा दंड सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवत या कंपन्यांची कानउघाडणी केली. 'डेटा शेअरिंगच्या नावाखाली तुम्ही लोकांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन करू शकत नाही. जर तुम्ही नियम आणि कायदे पाळू शकत नसाल, तर देश सोडून जा' अशा शब्दांत न्यायालयाने ताशेरे ओढले. सर्वसामान्यांच्या आयुष्याशी खेळणाऱ्या कंपन्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने केलेला हा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद आहे. व्हॉट्सॲपच्या डेटा शेअरिंगच्या अटींवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. गोपनीयतेच्या अटी इतक्या हुशारीने तयार केल्या आहेत, की सामान्य माणसाला त्या समजू शकत नाहीत. लोकांची वैयक्तिक माहिती चोरण्याचा हा चांगला मार्ग कंपन्यांनी शोधला असला, तरी न्यायालय हे होऊ देणार नाही, असे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या खंडपीठाने बजावले. सामान्य वापरकर्त्यांना समजणार नाही, असे क्लिष्ट गोपनीयता धोरण तयार करून कंपन्या माहिती गोळा करतात.'डेटा शेअरिंग' हा खासगी माहितीची चोरी करण्याचा एक मार्ग आहे. डिजिटल युगात हे प्रकरण वापरकर्त्यांचा डेटा किती असुरक्षित आहे, हे दर्शवते याकडे न्यायालयाने लक्ष वेधले. व्यक्तीच्या वैयक्तिक माहितीबरोबरच उद्योगधंद्यांसाठी 'डेटा' ही सर्वात मौल्यवान संपत्तीपैकी एक आहे. म्हणून, तो चोरण्याचे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. डेटा चोरी म्हणजे काय? तर, डिजिटल स्वरूपात संग्रहित केलेली संवेदनशील माहिती अनधिकृतपणे मिळवणे, कॉपी करणे किंवा बाहेर काढणे. ती मिळविण्यासाठी, अपप्रवृत्तीच्या व्यक्ती त्यांच्याकडे असलेल्या विशेषाधिकारांचा गैरवापर करतात किंवा संगणकप्रणाली, नेटवर्क किंवा डिजिटल स्टोरेज उपकरणांमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी इतर मार्गांचा वापर करतात, हे सर्वोच्च न्यायालयातील ताज्या प्रकरणावरून पुन्हा एकदा जनतेच्या लक्षात आले आहे. पूर्वी मुलाला समजायला-उमजायला लागल्यानंतर सातव्या वर्षी शाळेत प्रवेश दिला जात असे. आताची पिढीही प्रगत पाहायला मिळते. मोबाइल फोन हाताळणे हा तीन वर्षांच्या मुलाला नुसते जमत नाही, तर सोशल मीडियावरील अनेक ॲपची नावेही त्याला ठाऊक आहेत. नोकरी-धंद्यांच्या ठिकाणी व्हॉट्सॲपचा वापर सर्रास केला जातो. सोशल मीडियाशी संबंध नसलेली व्यक्ती म्हणजे तिला जगाशी त्याचे काही देणे-घेणे नाही, असा समज करून दिला जातो. सोशल मीडिया, मोबाइल, इंटरनेट हे शब्द आपल्या आयुष्याशी अभिन्न जोडले गेले आहेत. त्यामुळे या सोशल मीडियाच्या माध्यमातून आपली वैयक्तिक गोपनीय माहितीही जर चोरी होत असेल, तर विश्वास कोणावर ठेवायचा? असा प्रश्न प्रत्येकाच्या मनात येऊ शकतो. चोरी केलेला डेटा, बँक खात्याची माहिती, ऑनलाइन पासवर्ड, पासपोर्ट क्रमांक, ड्रायव्हिंग लायसन क्रमांक, सामाजिक सुरक्षा क्रमांक, ऑनलाइन सदस्यता इत्यादीपैकी काहीही असू शकतो. जर एखाद्या अनधिकृत व्यक्तीला वैयक्तिक किंवा आर्थिक माहितीमध्ये प्रवेश मिळाला, की मालकाच्या परवानगीशिवाय ती हटवू शकतात, बदलू शकतात, याला माहिती 'चोरी' असे आपण म्हणतो. ग्राहकांच्या नोंदीतून चोरीचे प्रकार घडू शकतात.क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड माहितीसारखा आर्थिक डेटा, सोर्स कोड, मालकी प्रक्रियेचे वर्णन आणि ऑपरेटिंग पद्धती, एचआर रेकॉर्ड आणि कर्मचारी डेटा, संगणकावर साठवलेल्या खासगी कागदपत्रांचा वापर केला जाऊ शकतो. जेव्हा संवेदनशील डेटा चुकून इंटरनेटवर किंवा हरवलेल्या हार्ड ड्राइव्ह किंवा उपकरणांद्वारे उघड होतो, तेव्हा डेटा लीक होतो. यामुळे सायबर गुन्हेगारांना त्यांच्याकडून कोणत्याही प्रयत्नांशिवाय संवेदनशील डेटावर अनधिकृत प्रवेश मिळतो. एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने साठवलेली कोणतीही माहिती/डेटा चोरांसाठी संभाव्य लक्ष्य असू शकते. ॲपच्या कंपन्यांनी यापुढे पापाचे वाटेकरी होऊ नये, एवढीच अपेक्षा सर्वसामान्य वापरकर्ता करतो आहे.

**प्रत्येक देशाचे भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम व जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. ज्या देशांनी प्रगती केली आहे ती त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर केली आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.**

# दर्जेदार शिक्षण हीच प्रगतीची गुरुकिल्ली

शिक्षण ही माणसासाठी एक अमूल्य संधी आहे. शिक्षणच एखाद्या व्यक्तीला इच्छित ध्येय साध्य करण्यास सक्षम करते. यासोबतच शिक्षणावर मानवाच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारीदेखील आहे. शिक्षणामुळे माणसाला चांगले जीवन जगण्याची आणि जीवनात येणाऱ्या समस्या सोडवण्याची ताकद मिळते. शिक्षण केवळ मानवी मूल्यांना परिष्कृत करत नाही, तर आपल्या कलात्मक कौशल्यांनादेखील वाढवते. आजच्या स्पर्धात्मक युगात ते आपल्याला अधिक कार्यक्षम बनण्यास मदत करते. ते आपल्याला प्रगतीसाठी प्रेरणा देते आणि सतत प्रगतीच्या मार्गावर जाण्यास मार्गदर्शन करते. जगातील ज्या देशांना शिक्षणाची गुणवत्ता आणि महत्त्व समजले आहे, ते देश आज समृद्ध राष्ट्रांमध्ये गणले जातात, लहान देशही शिक्षणाच्या गुणवत्तेच्या बळावर विकसित होऊन उन्नत झाले आहेत. तरुणांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यास मदत करण्यासाठी आपल्या देशात नवीन शिक्षण प्रणाली आणि कौशल्य विकासावर भर दिला जात आहे.

फ्यूचर ऑफ जॉब्स रिपोर्ट २०२५ नुसार, २०३० पर्यंत सध्याच्या कामगारांपैकी सुमारे ३९ टक्के लोकांची कौशल्ये कालबाह्य होण्याची शक्यता आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०२५ नुसार, फक्त ५४.८ टक्के भारतीय तरुणांना रोजगारयोग्य मानले जाते आणि अनेकांमध्ये कामाच्या ठिकाणी यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली डिजिटल प्रवीणता, अनुकूलता आणि सॉफ्ट स्किल्सचा अभाव आहे.

नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, २०२२ मध्ये भारतात अटक केलेल्या सर्व अल्पवयीन मुलांपैकी जवळ जवळ निम्मे (४९.५ टक्के) हिंसक गुन्ह्यांमध्ये सहभागी होते, जी २०१६ मध्ये ३२.५ टक्क्यांपेक्षा लक्षणीय वाढ आहे. २०२२ मध्ये प्रति लाख मुलांमागे ६.९ वरून २०२३ मध्ये राष्ट्रीय बाल गुन्हेगारी दर किंचित वाढून ७.१ झाला. दिल्लीत मुलांमध्ये सर्वाधिक गुन्हेगारीचा दर ४१.१ प्रति लाख मुलांमागे नोंदवला गेला, जो राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच जास्त आहे. मानसिक ताणाची समस्या झपाट्याने वाढली आहे आणि देशातील तरुणांमध्ये ती सतत वाढत आहे. वाढता ताण, चिंता आणि नैराश्य, मानसिक आधाराचा नितांत अभाव व सततचा सोशल स्टिग्मा यामुळे तरुणांना मानसिक आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. २०२०-२२ मध्ये, भारतात १५-२९ वयोगटातील लोकांमध्ये आत्महत्येमुळे ६०,७०० हून अधिक मृत्यू झाले, जे जगात सर्वाधिक आहे. सुशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारी वाढत आहे. कारण शिक्षण आणि कौशल्ये नोकरी बाजाराच्या गरजांनुसार जुळत नाहीत, तर अनेकांना मजबुरीमुळे कमी पगाराच्या, किरकोळ किंवा धोकादायक नोकऱ्यांमध्ये काम करावे लागते.

'कॅग'च्या २०२५ च्या अहवालानुसार, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आली आहे. ज्याअंतर्गत ५६.१४ लाख तरुणांना प्रशिक्षण देण्यात आले होते, त्यापैकी फक्त २३.१८ लाख तरुणांना रोजगार मिळाला, तर ३२.९६ लाख तरुण म्हणजेच ५८.७१ टक्के तरुण कौशल्य विकास योजनेचा लाभ घेत



असूनही बेरोजगार राहिले. यामध्ये १३.३३ टक्के तरुण उमेदवारांना कौशल्यासाठी आवश्यक असलेली किमान पात्रतादेखील पूर्ण करता आली नाही. ९४.५३ टक्के प्रकरणांमध्ये बँक खात्यांचे तपशील रिकामे होते. ९४ टक्क्यांहून अधिक बँक खात्यांमध्ये वैध माहिती नव्हती, त्यामुळे ३४ लाख तरुणांना ५०० रुपयांचे रिवॉर्डदेखील मिळाले नाही. या योजनेंतर्गत एकाच ठिकाणी घेतलेल्या प्रशिक्षणाचे फोटो अनेक राज्यांमध्ये वापरले जात होते. अनेक प्रशिक्षण केंद्रे प्रत्यक्षात बंद होती, पण ती कागदावर कार्यरत होती. बहुतेक तरुण उमेदवारांचे ई-मेल आयडी आणि मोबाईल नंबरदेखील बनावट होते. २०१५ ते २०२४ दरम्यान या योजनेंतर्गत एकूण ९,२६१ कोटी खर्च करण्यात आले आहेत. १३.२ दशलक्ष तरुणांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते आणि १.१ कोटी तरुणांना कागदावर प्रशिक्षण प्रमाणपत्रे मिळाली, परंतु 'कॅग'ने याला आकडयांचा फेरफार म्हटले.

देशातील वाढती आर्थिक असमानता समाजात मोठी दरी निर्माण करत आहे, विकासकामांना अडथळा आणत आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा वार्षिक सर्वेक्षण अहवाल, 'युथ पल्स २०२६: नेक्स्ट जनरेशन व्हिजन फॉर अ चेंजिंग वर्ल्ड'च्या निष्कर्षांनुसार, ४८.२ टक्के प्रतिसादकर्त्यांनी वाढती आर्थिक असमानता हे सर्वात मोठे संकट म्हणून ओळखले. या सर्वेक्षणात १४४ देशांनी भाग घेतला. ५७ टक्के तरुणांनी आर्थिक चिंता हे तणावाचे मुख्य कारण असल्याचे सांगितले. ५७.२ टक्के तरुणांनी रोजगार निर्मिती किंवा उपलब्धतेला गरज म्हणून प्राधान्य दिले, तर ४६.१ टक्के तरुणांनी परवडणाऱ्या आणि दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता ही एक गरज मानली. देशातील बेरोजगारीची व्याप्ती आपल्या सर्वांना माहिती आहे, परंतु दशकांपासून रिक्त पदे न भरल्याने व्यवस्था आणि कार्यपद्धती कमकुवत होते. अनेक राज्यांमधील शिक्षण विभागाची स्थिती खूपच भयानक आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये शिक्षण विभागातील घोटाळे वारंवार समोर येतात. भ्रष्टाचार, परीक्षेचे पेपर फुटणे, बनावट कागदपत्रे, बनावट भरती, परीक्षेसाठी बनावट उमेदवार आणि बनावट पदव्या खरेदी हे सर्व उघड होत आहे. मध्यंतरी महाराष्ट्रात शालार्थ आयडी घोटाळा चर्चेत होता. हे सर्व शिक्षणाच्या पवित्र व्यवसायाला कलंकित करते आणि देशाच्या सध्याच्या व भावी पिढ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतात.

देशातील अनेक राज्यांमधील खासगी शैक्षणिक संस्था आणि सरकारी शाळांमध्ये मोठी तफावत आहे. पुन्हा ही तफावत झपाट्याने वाढत आहे. गेल्या दशकात (सुमारे २०१४-२०२४), भारतात अंदाजे ९० हजार सरकारी शाळा बंद झाल्या आणि सरकारी आकडेवारी व युनेस्कोच्या अहवालाच्या मते भारतात खासगी शाळांची संख्या अंदाजे ४२ हजार ९४४ ने लक्षणीयरीत्या वाढली आहे. दर्जेदार शिक्षण, चांगल्या आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार नोकरी किंवा व्यवसायाची उपलब्धता या तीन गोष्टी माणसाला सहज उपलब्ध व्हायला हव्या. भेदभाव किंवा आर्थिक असमानता कधीही यासाठी अडथळा ठरू नये.

प्रत्येक देशाचे भविष्य तिथल्या शिक्षण धोरणावर आणि त्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. चांगले शिक्षण समाज आणि देशाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम आणि जबाबदार कार्यशैलीसह प्रभावी युवा शक्ती निर्माण करते. ज्या देशांनी प्रगती केली आहे ती त्यांनी त्यांच्या मजबूत आणि कार्यक्षम शिक्षण प्रणालीच्या बळावर केली आहे. भविष्य फक्त त्या देशांचेच उज्ज्वल असेल, ज्यांना शिक्षणाची गुणवत्ता समजते.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**

## 'प्रसंग पाहोन चालावे'

### संवाद

लोकशाहीत विरोधी पक्षाला प्रश्न विचारणे, सरकारला खडसावणे आणि राष्ट्रीय सुरक्षे सारख्या संवेदनशील विषयांवर स्पष्टीकरण मागण्याचा पूर्ण अधिकार आहे पण हे स्पष्टीकरण मागताना वेळ, पद्धत आणि संदर्भ हे संसदीय नियमांच्या चौकटीतच असायला हवे. राहुल गांधी स्वतःला हुशार समजतात पण प्रत्येक वेळी त्यांचे बेताल, बालिश आणि नियमबाह्य वर्तन यामुळे त्यांचे पितळ उघडे पडत आहे.राहुल गांधी ह्यांनी अप्रकाशित पुस्तकातील संदर्भ जोडून सूत्रे मांडली जी संसदेच्या नियमबाह्य असल्याची जाणीव लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना करून द्यावी लागली आणि त्यांनी सदनाची मर्यादा ओलांडू नका असे सांगत राहुल गांधी यांना खाली बसवावे लागले पण राहून गांधी तीच सूत्रे मांडत होते.संसद हे संघर्ष, मतभेद किंवा वादविवादाचे ठिकाण नव्हे तर ते संवादाचे व्यासपीठ असायला हवे.राष्ट्रहित,राष्ट्रीय सुरक्षा,संसदीय शिस्त आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यांचे संतुलन राखायलाच हवे.लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरात शिस्त पाळायलाच हवी. लोकप्रतिनिधींनी संयम आणि संवाद यांचे महत्त्व लक्षात घेऊन वर्तन करावे.संसदेचे कामकाज स्थगित झाल्याने देश आणि जनतेची हानी झाली. भारत चीन संबंध आधीच तणावपूर्ण असताना त्याविषयीचा उल्लेख संसदेत केल्याने वैश्विक स्तरावर भारताविषयी चुकीचा संदेश जाऊ शकतो हा विचार राहुल गांधी यांनी का केला नाही.राष्ट्रीय सुरक्षेवर चर्चा निश्चितच हवी पण ती नियमबाह्य झाल्यास देशासाठी धोकादायक ठरू शकते.

**लीना गाडगीळ**

## स्क्रीनच्या अतिवापराने दृष्टी धोक्यात

हल्ली मुले खेळाच्या मैदानावर दिसत नाहीत.साहजिकच ती मोकळ्या हवेपासून सतत दूर राहतात.आता मुलांना मोबाईल व लॅपटॉप चे वेड प्रचंड प्रमाणात लागले आहे.साहजिकच त्यांच्या दृष्टीवर याचा गंभीर परिणाम होत आहे.दूरचे पाहण्यात अडचणी येत आहेत असे निदर्शनास आले आहे.गेल्या वर्षी कर्नाटकात नॅशनल वाईल्ड हेल्थ प्रोग्रॅम अंतर्गत सुमारे सव्वा कोटी मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.विशेष म्हणजे सुमारे.१.७२ लाख मुलामध्ये दृष्टी दोष आढळून आले आहेत.आरोग्य तज्ञाच्या मते मुलांनी किमान दोन तास तरी सूर्यप्रकाशात मनमोकळे पणाने खेळले पाहिजे.सतत मोबाईल वर असण्याने डोळे कोरडे होण्याची समस्या सुद्धा मोठ्या प्रमाणात उद्भवते. पालकांनी या बाबतीत सतर्क राहून मुलांना मोबाइलपासून सतर्क केले पाहिजे

**शांताराम वाघ**

# नरवणे यांच्या पुस्तकावर विवाद का?

माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांचे आत्मचरित्र, 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी', सध्या राजकीय आणि लष्करी वर्तुळात चर्चेचा विषय आहे. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अप्रकाशित पुस्तकातील काही उतारे संसदेत वाचल्यानंतर,निवृत्त लष्करी अधिकाऱ्यांसाठी गोपनीयता आणि नियमांवरील प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत.त्यामुळे माजी लष्करप्रमुख जनरल एमएम नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी'या पुस्तकाभोवतीचा वाद आणखी वाढला आहे.संरक्षण मंत्रालयाने त्याच्या प्रकाशनावर सध्या बंदी घातली आहे.

जनरल एम.एम. नरवणे यांनी डिसेंबर २०१९ ते एप्रिल २०२२ पर्यंत लष्करप्रमुख म्हणून काम पाहिले. निवृत्तीनंतर त्यांनी एक पुस्तक लिहिले आहेत. या पुस्तकात २०२० च्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील (एलएसी) संघर्ष आणि अग्निपथ योजना यासारख्या संवेदनशील विषयांवर महत्त्वाच्या तपशीलांची चर्चा केली आहे.हे पुस्तक जानेवारी २०२४ मध्ये प्रकाशित होणार होते, परंतु संरक्षण मंत्रालय आणि भारतीय लष्कराने प्रकाशकाला त्याचा आढावा पूर्ण होईपर्यंत प्रकाशन रोखण्याचे निर्देश दिले. मंत्रालयाकडून अद्याप मंजुरी न मिळाल्याने पुस्तकाचे भविष्य सध्या अनिश्चित आहे.

नरवणे यांनी ३१ डिसेंबर २०१९ ते ३० एप्रिल २०२२ पर्यंत भारतीय लष्कराचे प्रमुख म्हणून काम पाहिले.४४८ पानांच्या या पुस्तकात जनरल नरवणे यांच्या ४० वर्षांच्या लष्करी कारकिर्दीची संपूर्ण कहाणी आहे,सिक्कीममध्ये चीनशी झालेल्या पहिल्या झाला भेटीपासून ते गलवान खोऱ्यात चिनी सैन्याशी झालेल्या संघर्षापर्यंत,नियंत्रण रेषेवर गोळीबार,पाकिस्तानसोबत युद्धबंदी लागू करणे आणि आधुनिक युद्धासाठी सैन्याची तयारी करणे.आदी गोष्टींचा उल्लेख सदर पुस्तकात करण्यात आला आहे.

**पुस्तकात कोणते मोठे खुलासे करण्यात आले?**


द फेडरलमधील एका वृत्तानुसार, पुस्तकात दोन मोठे खुलासे आहेत...

**१)लडाख संघर्ष (चीनसोबत)**- ३१ ऑगस्ट २०२० च्या रात्री,चिनी पीएलएने पँगोंग त्सोच्या दक्षिण तीरावर असलेल्या रेचिन ला खिंडीत रणगाडे आणि सैन्य तैनात केले. रणगाडे भारतीय लष्कराच्या ठिकाणांपासून काहीशे मीटर अंतरावर होते.परिस्थिती 'तणावपूर्ण आणि अगदी जवळच्या टप्प्यावर' होती. नॉर्दर्न कमांडचे प्रमुख लेफ्टनंट जनरल योगेश जोशी यांनी रात्री ८:१५ वाजता जनरल नरवणे यांना फोन केला. नरवणे यांनी ताबडतोब संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, एनएसए अजित डोभाल, सीडीएस बिपिन रावत आणि परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्याशी संपर्क साधला.

पुस्तकात जून २०२० मध्ये झालेल्या गलवान संघर्षाचाही उल्लेख आहे, जिथे २० वर्षांत पहिल्यांदाच पीएलएला जीवघेणे नुकसान सहन करावे लागले. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग हे विसरणार नाहीत.

**२) अग्निपथ योजना:**- जून २०२२ मध्ये सुरू झालेल्या या योजनेने लष्कराला आश्चर्यचकित केले. नौदल आणि हवाई दलासाठी हा 'निळ्या रंगाचा बोल्ट' होता. या योजनेसाठी लष्कराचा मूळ प्रस्ताव एक छोटा पायलट प्रकल्प होता, ज्यामध्ये ७५% भरतींना कायम ठेवण्यात आले आणि २५% सोडण्यात आले. तथापि, अंतिम योजनेत, फक्त २५% राखण्यात आले, तर उर्वरित ७५% चार वर्षांनी सोडण्यात आले. नरवणे यांनी २०,००० रुपयांच्या सुरुवातीच्या पगाराला 'अस्वीकार्य' म्हटले. त्यांनी लिहिले, 'प्रशिक्षित सैनिक, जो स्वतःचे जीवन बलिदान देण्यास सक्षम आहे, त्याची तुलना रोजंदारीच्या कामाशी कशी करता येईल?' नंतर किंमत ३० हजार रुपये करण्यात आली.

लष्कर कायदा १९५० आणि लष्कर कायदा १९५४ (कलम २१) मध्ये सेवारत अधिकाऱ्यांनी पुस्तके लिहिण्याबाबत अतिशय कडक नियम आहेत. अधिकारी केंद्र सरकारच्या परवानगीशिवाय लष्करी बाबी, लष्करी कारवाया,




राजकीय मुद्दे किंवा सेवा माहितीवरील पुस्तके किंवा लेख प्रकाशित करू शकत नाहीत. परवानगीशिवाय ते व्याख्याने देखील देऊ शकत नाहीत. असे न केल्यास शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते.वरिष्ठ लष्करी अधिकारी, विशेषतः संवेदनशील पदांवर असलेले, कठोर नियमांनी बांधील आहेत.

अधिकृत गुपिते (OSA):- या कायद्यानुसार, कोणताही अधिकारी निवृत्तीनंतरही राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणारी माहिती उघड करू शकत नाही.गोपनीय किंवा संवेदनशील माहिती असलेले कोणतेही पुस्तक किंवा लेख प्रकाशित करण्यापूर्वी सरकारची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे.

खाजगी किंवा व्यावसायिक क्षेत्रात नोकरी स्वीकारण्यासाठी निवृत्तीनंतर एक वर्षाचा कूलिंग-ऑफ कालावधी स्थापित केला जातो.जर एखाद्या लष्करी अधिकाऱ्याने या नियमांचे उल्लंघन केले तर सरकार कठोर कारवाई करू शकते. त्याच्यावर अधिकृत गुपिते कायद्यांतर्गत खटला चालवला जाऊ शकतो. सीसीएस (पेन्शन) नियमांनुसार, उल्लंघनामुळे अधिकाऱ्याच्या पेन्शनचा काही भाग किंवा संपूर्ण भाग रोखला जाऊ शकतो.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांना लक्ष्य केले. एका माजी लष्करप्रमुखाच्या आत्मचरित्रातील काही उतारे उद्धृत करत, सरकारला भीती आहे की, जर पुस्तकातील मजकूर उघड झाला तर देशाला भाजपच्या दोन वरिष्ठ नेत्यांचे खरे स्वरूप कळेल आणि चीनसमोर असलेल्या '५६ इंचाच्या छातीचे' काय झाले हे कळेल असा आरोप केला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि भारतीय जनता पक्षाने (भाजप) माजी काँग्रेस अध्यक्षांवर प्रत्युत्तर देत म्हटले की ते 'काल्पनिक विधाने' करून आणि लष्कराला प्रश्न विचारून सभागृहाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**एलएसीवरील चीनसोबतच्या तणाव**

अप्रकाशित पुस्तकाच्या भागावर संसदेत चर्चा करता येत नसताना राहुल गांधी यांनी नरवणे यांच्या पुस्तकाचा हवाला देत त्या पुस्तकातील काही भाग वाचून दाखवत होते,ही माहिती संवेदनशील असल्याने त्यांना संसदेत भारत चीन सीमावादावर बोलू दिल्या जात नव्हते.तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की, या पुस्तकात २०२० च्या संघर्षाशी संबंधित धोरणात्मक माहिती उघड झाली तर ते एलएसीवरील चीनसोबतची परिस्थिती आणखी वाढवू शकते. मे-जून २०२० मध्ये, गलवान खोऱ्यात भारतीय आणि चिनी सैन्यात हिंसक चकमक झाली.ज्यामध्ये २० भारतीय सैनिक शहीद झाले. जनरल नरवणे यांच्या नेतृत्वाखाली भारताने प्रत्युत्तरात्मक कारवाई आणि त्यानंतर लष्करी स्तरावरील चर्चेद्वारे अनेक भागातून सैन्य मागे घेण्याची प्रक्रिया सुरू केली.

सध्या, एलएसीवरील परिस्थिती काहीशी शांत आहे, परंतु दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणात लष्करी तैनाती कायम आहे. कोणत्याही परिस्थितीत राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित संवेदनशील माहिती उघड केली जाऊ नये, असे सरकारचे मत स्पष्ट आहे, म्हणूनच जनरल नरवणे यांच्या पुस्तकाला अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल**

वर्धा-९५६१५९४३०६

# यवतमाळ जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न

## 2026-27 साठी 692.74 कोटींचा प्रारूप आराखडा सादर, 2025-26 खर्च 77.18 टक्के पुनर्विनियोजन प्रस्तावास मान्यता

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - जिल्हा नियोजन समितीची बैठक दि. 05 फेब्रुवारी 2026 रोजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस ना. डॉ. प्रा. अशोक ऊईके, राज्यमंत्री ॲड. इंद्रनिल नाईक, आमदार बाळासाहेब मांगुळकर, राजू तोडसाम,किसन वानखेडे,किशोर मानकर, तसेच जिल्ह्यातील सर्व आमदार,जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्यकाधिकारी मंदार पत्की,कुमार चिंता,पोलिस अधीक्षक पदाधिकारी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्हा नियोजन समितीच्या वतीने जिल्हा वार्षिक योजनांबाबत सविस्तर माहिती दिली.

जिल्हा वार्षिक योजना सन 2026-27 साठी शासनाकडून प्राप्त झालेल्या कमाल आर्थिक मर्यादेनुसार सर्वसाधारण योजनेसाठी 471.58 कोटी, आदिवासी उपयोजने साठी 137.16 कोटी, तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 84.00 कोटी अशी तरतूद निश्चित करण्यात आली आहे. या तिन्ही योजनांसाठी एकूण रु. 692.74 कोटींचा प्रारूप आराखडा तयार करून तो बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला. याच बैठकीत जिल्हा वार्षिक योजना सन 2025-26 अंतर्गत माहे डिसेंबर 2025 अखेरच्या खर्चाच्या आधारे विविध विभागांकडून प्राप्त झालेल्या बचत व नवीन मागण्यांच्या अनुषंगाने पुनर्विनियोजन प्रस्ताव मांडण्यात आला. सर्वसाधारण योजनेत महसूली व भांडवली तसेच गाभा व बिगर गाभा बाबींमधून रु. 8.11 कोटींची बचत, तर रु. 313.18 कोटींची मागणी आहे. आदिवासी उपयोजनेत रु. 4.43 कोटी बचत असून रु. 38.21 कोटींची मागणी, तर अनुसूचित जाती जमातीतील उपयोजनेत 0.21 कोटी बचत असून रु. 5.22 कोटींची मागणी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. या पुनर्नियोजन प्रस्तावास बैठकीत मान्यता देण्यात आली. दरम्यान, सन 2025-26 साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण, आदिवासी उपयोजना व अनुसूचित जाती उपयोजना) या तिन्ही योजनांसाठी एकूण 754.38 कोटींची तरतूद मंजूर असून, आजपर्यंत 538.45 कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी 277.86 कोटी निधी वितरित करण्यात आला असून 214.46 कोटी इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. वितरित निधीच्या तुलनेत खर्चाची टक्केवारी 77.18 टक्के असल्याची माहिती देण्यात आली. योजना निहाय खर्चाचा विचार करता, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत 528 कोटींपैकी 149.92 कोटी, आदिवासी उपयोजनेत 142.38 कोटींपैकी 31.39 कोटी, तर अनुसूचित जाती उपयोजनेत 84 कोटींपैकी 33.15 कोटी खर्च झालेला आहे. बैठकीच्या समारोपप्रसंगी पालकमंत्री संजय राठोड यांनी जिल्ह्यातील सर्व विभागांनी मंजूर निधीचा प्रभावी, पारदर्शक व वेळेत वापर करून विकासकामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणीला प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी शासनाच्या घोषणा

जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना हाती घेतल्याची माहिती पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी दिली. शेतकऱ्यांना आत्महत्येची वेळच येऊ नये, यासाठी "मिशन उभारणी" या नावाने विशेष अभियान सुरू करण्यात आले असून, या माध्यमातून आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनाही मदत देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांच्या मनातील नैराश्य व नकारात्मक विचार दूर करण्यासाठी समुपदेशन व मार्गदर्शनावर भर दिला जाणार आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अत्याधुनिक शेतीसह पशुसंवर्धन, मत्स्य पालन, रेशीम व्यवसाय व रेशीम आधारित जोडधंद्यांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. चिपळ जमिनीचा जलस्तर वाढवण्यासाठी ५ हजार ठिकाणी जलस्तर योजना प्रायोजित तत्त्वावर मंजूर करण्यात आल्या आहेत. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेअंतर्गत ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, पादन रस्त्यांसाठी २५ कोटी रुपयांहून अधिक निधी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून मंजूर करण्यात आला आहे.

# अज्ञात मृतदेह प्रकरणाचा उलगडा

## मुलगा व पत्नीनेच केली हत्या स्थानिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

जनमाध्यम प्रतिनिधी





यवतमाळ - बिटरगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत सुमारे एक महिन्यापूर्वी आढळलेल्या अज्ञात पुरुषाच्या निर्घृण हत्येचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणात मृतकाचा मुलगा आणि पत्नी यांनीच त्याची हत्या केल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, दोघांना अटक करण्यात आली आहे.

९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.४५ वाजता, मौजे मुरली गाव शिवारातील पैनगंगा नदी पात्रात सहस्त्रकुंड धबधब्याजवळ कोल्हापुरी बंधाऱ्यात एक ३० ते ४० वयोगटातील अज्ञात पुरुषाचा मृतदेह अत्यंत कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता. मृतदेहाच्या पायांना दोरीने बांधून नदीत टाकल्याचे स्पष्ट झाले होते. या प्रकरणी बिटरगाव पोलीस ठाण्यात अप.क्र. ०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३, २३८ अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. मृतदेहाची ओळख पटवणे मोठे आव्हान होते. कोणताही ठोस पुरावा उपलब्ध नसल्याने, यवतमाळचे पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष तपासाचे आदेश दिले. त्यानुसार चार स्वतंत्र तपास पथके तयार करून सखोल चौकशी सुरू करण्यात आली. तपासादरम्यान घटनास्थळ परिसरापासून सुमारे ५० किलोमीटरपर्यंत बेपत्ता व्यक्तींची माहिती संकलित करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे मौजे जलधरा, पो. इस्लापूर, ता. किनवट, जि. नांदेड येथील मारोती गंगाराम डुकरे हा व्यक्ती बेपत्ता असल्याची माहिती मिळाली. त्याच्या कुटुंबीयांकडे चौकशी केली असता संशयास्पद बाबी आढळून आल्या. सखोल विचारपूस केल्यानंतर मृतकाचा मुलगा प्रदीप मारोती डुकरे (वय २५) व पत्नी पार्वतीबाई मारोती डुकरे (वय ५५) यांनी गुन्ह्याची कबुली दिली. मृतक मारोती डुकरे हे दारूचे व्यसन करत असून, सतत घरच्यांना व परिसरातील लोकांना त्रास देत होते. या त्रासाला कंटाळून मुलगा व पत्नी यांनी त्याची गळा आवळून हत्या केली. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह पांढऱ्या कापडात गुंडाळून पाय बांधले व सहस्त्रकुंड धबधब्याजवळील बंधाऱ्यात नदीत टाकल्याची कबुली त्यांनी दिली. या प्रकरणातील दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन पुढील तपासासाठी बिटरगाव पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंताळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.


## • वेचक

### विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त वातावरणात निर्भयपणे परीक्षा द्यावी : मोहम्मद मुसद्दीक, केंद्र संचालक



महागाव - फुलसांवगी इयत्ता १० वी व १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांना सुरुवात होत असून विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त, शांत व सुरक्षित वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी शिक्षण विभागाकडून सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर प्रशासन पूर्णतः सज्ज झाले आहे. परीक्षेदरम्यान कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार टाळण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून प्रत्येक केंद्रावर CCTV यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्रांच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले असून अनावश्यक गर्दीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. परीक्षा प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व विश्वासार्ह पार पाडण्यासाठी शिक्षण विभाग, महसूल विभाग व पोलीस प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधण्यात आला आहे. यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक तसेच पर्यवेक्षक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा काळात कॉपीमुक्त वातावरण राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या असून विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण येऊ नये, याची विशेष काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी केंद्र संचालक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, त्यांनी कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब न करता नियमांचे पालन करून शांत, निर्भय व आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी.

### अरुणोदय कनिष्ठ महाविद्यालयात निरोप समारंभ संपन्न



दिग्रस - अरुणोदय कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुधीर काळबोंडे होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ श्री. योगेशजी डाफ साहेब उपस्थित होते. यावेळी प्रा. मेश्राम सर, प्रा. शिल्पा राऊत मॅडम, प्रा. घिनमिने सर, शेख सर, गावंडे सर, पाटील सर, श्रीकांत सर, समीर सर तसेच प्रदीप राठोड व महेश मडावी यांची उपस्थिती होती. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत परिश्रम, शिस्त व सातत्याचे महत्त्व सांगून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक श्री. सुधीर काळबोंडे यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गावंडे सर यांनी केले. कार्यक्रम उत्साही व प्रसन्न वातावरणात पार पडला.

# सांस्कृतिक कार्यक्रमावरून झालेला वाद हा राजकीय हेतूने प्रेरित ; शिक्षण सभापती रसूल पटेल

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - येथील अब्दुल गफूर शहा नगर परिषद उर्दू उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमातील एका गीतावरून निर्माण झालेला वाद हा निव्वळ गैरसमजातून पसरवला जात आहे. यामागे कोणताही धार्मिक किंवा राजकीय हेतू नसून, केवळ बदनामी करण्याचे हे षड्यंत्र असल्याचे स्पष्टीकरण शिक्षण सभापती रसूल पटेल यांनी पत्रकार परिषदेत दिले.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, राज्यातील शोकदिवसामुळे काही कार्यक्रम पुढे ढकलून ते ३१ जानेवारी रोजी पार पडले. या कार्यक्रमात सादर करण्यात आलेले गीत हे १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील ऐतिहासिक संदर्भांवर आधारित होते. विद्यार्थ्यांना देशभक्ती, त्याग आणि स्वातंत्र्य संग्रामाची प्रेरणा मिळावी, हाच त्यामागील मुख्य उद्देश होता, असे पटेल यांनी सांगितले. यावेळी पटेल यांनी स्पष्ट केले की, संबंधित गीताच्या ओळींमधून अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि देशासाठी योगदान देण्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न केला गेला. याद्वारे कोणत्याही धर्माचा प्रचार किंवा राष्ट्रीय अखंडतेला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न झालेला नाही. शाळेत सर्व धर्मांचा समान सन्मान राखला जातो. हेडमास्तरांनी दिलेल्या खुलाशानुसार, ही तक्रार केवळ राजकीय हेतूने प्रेरित होऊन करण्यात आली असून यात काहीही तथ्य नाही. केवळ अल्पसंख्याक समाजाला बदनाम करण्यासाठी हा वाद उकरून काढला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले. समाजातील गैरसमज दूर करून शैक्षणिक वातावरण अबाधित ठेवावे, असे आवाहन पटेल यांनी यावेळी केले. सदर गीत 1965 भारत-पाक युद्धाचा नसून 1857 च्या स्वातंत्र्य चा जो लढा उभा राहिला त्यात मुस्लिम उलमा - पंडितांनी ब्रिटिशाविरुद्ध जेहाद पुकारला आणि आता हे फक्त देशाची लढाई नसून ती आमच्या धार्मिकतेची लढाई झालेली आहे म्हणून आपल्याला ब्रिटिशाविरुद्ध तलवार उचलून जेहाद करावा लागेल फक्त तसबीह (माळजाप) ने हे होणार नाही. देशासमोरची संकट उभे राहिले आहे. त्यासाठी लढावे लागेल . परकीय राजवटीतून देशाला मुक्त करावे लागेल . असा या गीताचा अर्थ असून स्वातंत्र्यलढ्यात मुस्लिमांनी कशाप्रकारे लढा दिला हेच यातून स्पष्ट होते. सदर गीत हे प्रतिबंध यादीत देखील नाही.

# वनोजा ग्रामपंचायतचा कारभार चव्हाट्यावर

## तहकुब ग्रामसभेत विषय सुचीत विषय नसतांना उपसरपंच आणि सचिवाची मनमानी

जनमाध्यम प्रतिनिधी



राळेगाव - तालुक्यातील वनोजा ग्रामपंचायत मध्ये २६ जानेवारी रोजी ग्रामसभा आयोजित केली होती तरी ग्रामस्थांची उपस्थिती कमी असल्याने सभा रद्द करण्यात आली तरी तहकुब सभा सदर आठव्या दिवशी दि.०३-०२-२५ रोजी घेण्यात आली तरी शिपाई पदाचा विषय सुचीत विषय नसताना सचिवाच्या मनमानी कारभारामुळे काही दिवसांपूर्वी आलेल्या अर्जाचे वाचन करून तहकुब ग्रामसभेत गोंधळ उडाला सरपंचावर दबाव आणून प्रश्नावर प्रश्न विचारून सरपंचाला गोंधळून टाकले आणि नंतर सरपंचा तहकुब ग्रामसभेतून थेट घरी गेल्या त्यात सचिव आणि उपसरपंच यांच्या मनमानी कारभारामुळे शिपायाला अस्थायी करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला यात काही अर्जदारांच्या तक्रारीना उपसरपंच व सचिवाच्या मनमानीमुळे पाठ दाखविण्यात यश आले.

सरपंचांनी दि.११-१०-२०२५ रोजी शिपाई पदाकरीता काही निवडक अर्जामधुन रोजंदारी तत्वावर शिपाई पदाची नियुक्त करण्यात आली होती. नियुक्ती ही अपारदर्शक पद्धतीने केली यात गावातील १२ ग्रामस्थांनी अर्ज प्राप्त केले यात निवड ही ईश्वर चिठ्ठीद्वारे करण्यात आली पण १२ अर्जदाराला नोटीस दिल्या नाही आणि फोन करून सुद्धा कळविण्यात आले नाही,नेमकं यात एका अर्जदाराला बोलावून त्यात त्यांच अर्जदाराची निवड होते यात कारण काय? ग्रामपंचायतने विडीओ वायरल केला त्यात विडीओ पण अपूर्ण व्हायरल केला त्यात प्रक्रिया अशी आहे की त्या विडीओमध्ये ज्या अर्जदाराचे नाव निघते तोच अर्जदार अचानक त्याच वेळी ग्रामपंचायत गेटमधून आत प्रवेश करतो आणि त्याच वेळी अर्जदाराचे स्वागत करतो यात समस्त ग्रामस्थाच्या मनात पूर्ण चिट्यांमध्ये त्याच अर्जदाराचे नांव लिहिले असेल तर कोणाला माहीत? कारण चिठ्ठी काढतांनाचा विडीओ वायरल केला आणि कोणती नावे लिहली तो विडीओ आणि त्या सभेत कोण हजर होते तो विडीओ वायरल नाही केला यात कारण काय? असा प्रश्न ग्रामस्थांच्या मनात होतांना दिसून येत आहे नेमकं काळाबाजार तर नाही असा गावातील जनतेच्या मनात विविध प्रश्न येताना दिसून येत आहे की चिठ्ठी निघायच्या आधी कुठेतरी पाणी मुरल्या सारखे झाले असे ग्रामवासीयांच्या मनात विविध प्रश्न निर्माण होत आहे,यात असे सिद्ध होत आहे की काहीतरी साटेलोटे असल्यासारखे दिसून येत आहे त्या पदाचा कार्यकाळ पुर्ण झाला असुन अद्यापही ११ महिण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या शिपायास ८ दिवसांचा खंड देऊन शिपायाला आणखी कामावर रूजू केले यात काही ग्रामस्थांनी तक्रारी करून अद्यापही सरपंच सचिव यांनी कार्यवाही केली नाही,तात्पुरत्या रोजंदारी शिपायाला खारीज करून ते पद रिक्त करून पुन्हा नविन भरती घ्यावी आणि पात्र अर्जामधुन लाभार्थ्याची शिपाई पदाकरीता अस्थायी निवड करण्यात यावी असे गावातील ग्रामस्थांचे चर्चेतून समोर येत आहे.

# पवन नगरमधील अतिक्रमण केलेला गोडाऊन ठरतो अपघातास कारणीभूत

## रस्त्यावरील केलेले अतिक्रमण त्वरित काढावे परिसरातील नागरिकांची मागणी !

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथील प्रभाग क्रमांक १५ मध्ये महावीर नगर जैन मंदिर समोरील पवन नगर येथील रोड मध्ये अतिक्रमण केलेला गोडाऊन हा ठरतो अपघातास कारणीभूत. हा अतिक्रमीत गोडाऊन काढण्यासाठी परिसरातील नागरिकांची ओरड सुरू आहे. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी उमरखेड रोड महावीर नगर जैन मंदिर समोरील वळणावर रोडमधील खड्डा चुकवितांना ऑटो पलटी होऊन दिपाली सुरोशे वय१० वर्ष या चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला आहे. तसेच गेल्या वर्षी मस्के लाईन मेन यांचा सुद्धा याच ठिकाणी गाडीवरून पडून जागीच मृत्यू झालेला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक या अपघातामुळे भयभीत झालेले आहेत.

सदर रस्ता मंगलमूर्ती कडून पवन नगर वळणावर उमरखेड रोड कडे जातांना व तसेच उमरखेड वरून पवननगर कडे येतांना छोटे-मोठे व जड वाहनांना या रस्त्यामध्ये असलेल्या गोडाऊन मुळे समोरुन आलेले वाहन दिसत नाही. सदर गोडाऊन हा बेंद्रे यांच्या मालकीचा असल्याचे माहिती समोर आली आहे. हा गोडाऊन बगडे यांच्या लेआउट मधील हमरस्त्यामध्ये अनेक महिन्यापासून लोखंडी यंगल व टीन शेडने मजबूतपणे तयार करून यामध्ये त्यांचे व्यवसायिक सामान,माल ठेवलेला आहे. या गोडाऊन मुळे दोन्ही मार्गाने जाणाऱ्या-येणाऱ्या वाहन चालकांना समोरून येणारे वाहन दिसत नाही त्यामुळे या ठिकाणी पुन्हा पुन्हा अपघात होण्याची शक्यता दाट आहे. या अगोदर याच ठिकाणी अपघातात दोन जीवितहानी झालेली आहे सदर गोडाऊन हा नगरपरिषद यांच्या अधिकारातील हम रस्त्यात अतिक्रमण केलेले असल्यामुळे ही नगरपरिषदेची काढण्याची जबाबदारी आहे असा नागरिकांतून सूर निघत आहे. या गोडाऊन मुळे वाहन चालकांना समोरून भरदार वेगाने येणारे वाहने दिसत नसल्यामुळे हा रस्त्यामध्ये उभारलेला गोडाऊन त्वरित काढण्यात यावा अशी महावीर नगर मधील व परिसरातील नागरिकांची मागणी आहे.

# यवतमाळ शहरात लोकनेता स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या अस्थिकलशाचे दर्शन

## कोटेश्वर येथे विधिवत अस्थी विसर्जन करण्यात आले

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थी कलश दर्शनाचा कार्यक्रम आज यवतमाळ शहरात भावपूर्ण वातावरणात पार पडला. गुरुवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी शहरातील विविध प्रमुख चौकांमधून अस्थी कलश मिरवणूक काढण्यात आली. सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली.

या अस्थी कलश दर्शन कार्यक्रमास माजी मंत्री माणिकराव ठाकरे, राज्याचे मंत्री अशोक उइके, आमदार इंद्रनील नाईक,बाळासाहेब घुईखेडकर,प्रवीण देशमुख, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व नेत्यांनी स्व. अजितदादा पवार यांच्या सामाजिक, राजकीय व जनहितकारी कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.सकाळी सव्वा आठ वाजता हौसिंग फायनान्स कार्यालय, दारव्हा रोड येथून अस्थी कलश यात्रेला सुरुवात झाली. दर्डा नगर चौक, वंचित बहुजन आघाडी कार्यालय, पाचकदिल चौक, नेताजी चौक, संविधान चौक, महात्मा फुले चौक, तिरंगा चौक, एल.सी.बी. चौक आदी मार्गाने ही यात्रा पुढे सरकली. सकाळी दहा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन येथे श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी स्व. अजितदादांना श्रद्धांजली अर्पण केली. श्रद्धांजली सभेनंतर अस्थी कलश यात्रा पुन्हा शहरातून मार्गस्थ झाली. दुपारी कोटेश्वर येथे विधिवत अस्थी विसर्जन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमात शहरात शोकमय आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. स्व.अजितदादा पवार यांच्या जाण्याने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी असल्याची भावना उपस्थित नेत्यांनी व्यक्त केली.

क्रमांक/म/सहा.प्रस्तु-4/कावि/२२/२०२६
तहसिलदार उमरखेड याचे कार्यालय, उमरखेड
दिनांक:- ०२/०२/२०२६

## जाहीरनामा

उपरोक्त विषयाचे संदर्भीय शासन निर्णय व पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार **सय्यद आबिद अली सय्यद मोहम्मद अली रा. उमरखेड** ता. उमरखेड जि. यवतमाळ यांनी त्यांची त्यांचे स्वत:चे नामे **सय्यद आबिद अली सय्यद मोहम्मद अली यांचा जन्म मौजा** उमरखेड **ता. उमरखेड येथे दिनांक** ०७.१२.१९८८ रोजी झालेला आहे. जन्म अनुउपलब्धता उपलब्ध नसल्याबाबत प्रमाणपत्र व अर्ज या कार्यालयास सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रकरणी अर्जदार यांना **जन्मनोंद** आदेश देणे बाबतचे प्रकरणात कोणाचे आक्षेप/हरकती घ्यावयाचा असेल तर त्यांनी दिनांक २०/०२/२०२६ पर्यंत लेखी स्वरुपात या कायालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत सादर कराव्यात. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/हरकती अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**स्वा.**
**तालुका दंडाधिकारी**
**उमरखेड**

# प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलला जागतिक स्तरावरील मानाचा पुरस्कार

जनमाध्यम प्रतिनिधी




महागाव - प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलला वर्ल्ड लीडर्स समिट अँड अवॉर्ड्स 2026 मध्ये "होलिस्टिक अकॅडमिक एक्सलन्ससाठी उत्कृष्ट शाळा" हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आणि सर्वांगीण विकासावर दिलेल्या भराचा गौरव झाला आहे.

हा सन्मान पद्मविभूषण डॉ. करण सिंह यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्यांच्या मार्गदर्शनपर आशीर्वादामुळे शाळेच्या कुटुंबियांना विशेष प्रेरणा मिळाली असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूलने केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर विद्यार्थ्यांचा बौद्धिक, नैतिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास साधण्यावर सातत्याने भर दिला आहे. नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, अनुभवी शिक्षकवर्ग आणि शिस्तबद्ध शालेय वातावरण यामुळे शाळेने अल्पावधीतच शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या गौरवास्पद यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, विद्यार्थी व पालकांनी आनंद व्यक्त केला असून, भविष्यातही शाळा अशीच प्रगती करत नवे शिखर गाठेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# महाकालेश्वर मंदिराच्या स्थापनेसाठी महिलांची कलश यात्रा

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - येथील पालडीवाल लेआउट मध्ये शुक्रवार,दि.६ फेब्रुवारी रोजी, महाकालेश्वर महादेव मंदिरात प्राणप्रतिष्ठा स्थापनेसाठी, गुरुवार, ५ जानेवारी रोजी, महिलांनी कलश यात्रा काढून मंदिराच्या स्थापनेला सुरुवात केली. कलश यात्रा विघ्नहर्ता गणपती मंदिरापासून सुरू झाली.

कलश यात्रेसोबतच, मंदिरात स्थापित होणाऱ्या महाकालेश्वर महादेवाच्या मूर्तीला सजवण्यात आले. बँड संगीतासह, कलश यात्रा ज्ञानेश्वर कॉलनीमार्गे संपूर्ण पालडीवाल लेआउट परिसरातून महाकालेश्वर मंदिरात पोहोचली. मंदिरात होम हवन पूजाची शुरुआत करण्यात आली. कलश यात्रेत सौ.रेखा धूत,सौ.मनिषा विश्वकर्मा, सौ.हेमा विश्वकर्मा, सौ.आरती धूत, सौ.सविता धूत, सौ.संगीता गाडेवार, सौ.शालिनी चिद्दरवार, सौ.सविता विश्वकर्मा, सौ.सारिका चिद्धरवार,सौ. स्वाती चिंतामणी, सौ. सीमा विश्वकर्मा, कु.प्रियांका येरावार, कु.सुनीता येरावार, सौ.हर्षा विश्वकर्मा,सौ.छाया विश्वकर्मा, कु.नेहा विश्वकर्मा, आदी कॅम्पसमधील महिलांनी कलश यात्रेत सहभाग घेतला. यावेळी महाकालेश्वर महादेव मंदिर समितीचे कार्यकारिणी सदस्य नितीन विश्वकर्मा, प्रवीण गादेवार, आनंद धूत, नीलेश चिंतामणी, सुनील सोनी, भालचंद्र पेंशनवार, रामदास दुधे, कैलास काटोळे, ॲड. पवनकुमार जैन, विजय उंचेकर, सुजित हरसुलकर, अतुल धूत, पंकज रुणवाल, अमर चिद्दरवार, संजोग तगडपल्लेवार आदींनी अथक परिश्रम घेतले.

# भावी सरपंच्याकडून मतदारांना अमिषाची खिरापत

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस - फेब्रुवारी महिन्यात सरपंच पदाचा कार्यकाळ संपणार असून अद्याप पर्यंत निवडणूक आयोगाकडून निवडणुकी संदर्भात कोणतीही गाईडलाईन व निवडणुकीची अद्याप तारीख ठरली नसली तरी ग्रामपंचायतीच्या माझी होणाऱ्या सदस्यांना भावी सरपंचाचे डोहाळे लागलेल्या उमेदवारांनी आतापासूनच निवडणूकीची तयारी सुरू केली असून मागेल त्या शेतकऱ्यांना विहीर ही मनरेगाची योजना आपली जहागीर समजून मतदारांना आकर्षित करण्यासाठी रोजगार सेवकांना घेऊन पंचायत समितीच्या गिरट्या घालून खिरापत वाटण्याचा गोरख धंदा पुढच्या महिन्यात माजी होणाऱ्या ग्रामपंचायत सदस्यांनी सुरू केला आहे आहे.

यातून मी किती मोठा नेता असून भावी सरपंच पदी मीच निवडून येण्याचे स्वप्न गावातील नागरिकांना दाखवण्यासाठी फेब्रुवारी महिन्यात माजी होणाऱ्या ग्रामपंचायत सदस्यांचा खटाटोप सुरू आहे. गावातील लोकांच्या कामासाठी तालुक्याला भावी सरपंच तहसील, पंचायत समिती मध्ये चकरा मारताना दिसत असून सध्या तरी अनेक गावांना पाणीटंचाईच्या सामना करावा लागत असून सामान्य नागरिकांची पाण्याची फरफट आजही दूर झालेली दिसत नाही अश्यात लोकशाही बळकट करण्यासाठी मतदारांनी कोणत्याही तात्पुरत्या प्रलोभनाला बळी न पडता, उमेदवाराची पात्रता, त्याचे चारित्र्य आणि गावच्या विकासाचा दृष्टिकोन लक्षात घेऊन मतदारांनी आपला हक्क आणि जबाबदारी पाळणे हेच आवश्यक ठरणार आहे.

# चांदूररेल्वे शहरातील शासकीय कार्यालयांवर लाखो रूपयांचा कर थकीत

## जनतेकडे कर भरण्यासाठी तगादा;शासकीय कार्यालयांना अभय

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

नगरपरिषद कडून ३१ मार्चपर्यंत करांचा भरणा करण्यासाठी नोटीस तर त्यांच्या नावाने थकबाकी वसूल करीता जाहीर मुनादी तर अनेकांवर सक्तीची कारवाई करून कर भरण्यासाठी बाध्य केल्या जाते तर दुसरीकडे शहरात असलेल्या शासकीय कार्यालयांकडे लाखो रुपयांची थकबाकी असून कर वसूल शून्य असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

शहराच्या विकासासाठी मालमत्ता, पाणी पुरवठा कर भरणे आवश्यक असते ही बाब सर्व सामान्य नागरिकांना माहिती असून ते नियमितपणे कर भरतात व नगरपरिषद तर्फे लावण्यात आलेल्या व्याजा पासून दूर राहण्याचे प्रामाणिक प्रयत्न करतात तरी पण नगरपरिषद तर्फे शहरातील नागरिकांना जाहीर मुनादी,नोटीस बजावून मालमत्ता व इतर कर भरण्यासाठी बाध्य करतात तर शासकीय कार्यालयांकडे लाखो रुपये कर असल्यावर साधी नोटीस सुधा बजावली जात नाही तसेच गरीबाचे नळ बिल अगदी अल्प असल्यावर ही नळ कनेक्शन कापण्यासाठी मोहीम राबवली जाते आजच्या प्राप्त माहितीनुसार शहरातील पंचायत समिती २३०८८४,उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती १६१४४९,मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तुतिगृह १४९६५४,मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसूतीगृह १७१०३३,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ ३५९११९,कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती ४१५८४०,भारतीय दूरसंचार विभाग निगम लिमिटेड १५९३८०, पोलीस स्टेशन कार्यालय २९५१४५ रूपयांचे कर थकबाकी आहे तरी नगरपरिषद प्रशासनाकडून कारवाई शून्य असल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून ही थकबाकी कोण वसूल करणार असा प्रश्न उपस्थित होते आहे.

**शासकीय कार्यालयांवर लाखो रूपयांचे कर थकीत**

शहरातील विविध शासकीय कार्यालये ज्या मध्ये पंचायत समिती २,३०,८८४, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग १,६१,४४९, मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तुतिगृह १,४९,६५४, मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसूतीगृह १,७१,०३३,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ ३,५९,११९,कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावती ४,१५,८४०, भारतीय दूरसंचार विभाग निगम लिमिटेड १,५९,३८०, पोलीस स्टेशन कार्यालय २,९५,१४५ असे लाखो रूपयांचे कर थकीत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

**अभय योजनेची अंमलबजावणी करावा- व्यापारी साजिद जानवाणी**

नगरपरिषद नवनिर्वाचित नगरसेवक व नगराध्यक्ष यांनी शहरातील जनतेला दिलासा म्हणून नगरपरिषद मध्ये तत्काळ अभय योजना लागू करावी जेणेकरून मूळ रक्कम व त्यांवर लागणारे चक्रवाढ व्याज पासून सर्वसामान्य नागरीकांना दिला मिळेल तरी लवकरात लवकर ही योजना लागू करावी अशी मागणी शहराती व्यापारी, नागरिक करीत आहे.

**शासकीय कार्यालयाचा कर वसूल करा- नगरसेवक सरदार**

नगरपरिषद शहरातील गरीब व सर्वसामान्य नागरीकाकडून कर वसूल करण्यासाठी टोकाचे पाऊल उचलते तर शासकीय कार्यालयांकडे असलेले लाखो रूपये बर्याच वर्षांपासून थकीत आहे ते वसुलीसाठी नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी पुढे येत नाही तर साधी नोटीस सुधा बजावत नाही ही खेदाची बाब आहे तर दुसरीकडे गरीब २००० ते ५००० रूपये थकबाकी असलेल्या मालमत्ता धारकांना नाहक त्रास दिला जातो हा भेदभाव का? तरी शासकीय विभागावर असलेले कर तातडीने वसुल करावे.

## सुरेश भट यांचा जन्मदिन मराठी गझल दिवस म्हणून शासनाने जाहीर करावा

**अमरावती/का.प्र.**



अमरावती हे गाव सुरेश भट यांचे जन्मगाव आहे. आज जवळपास महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर सक्षमपणे मराठी गझल लिहिली जाणारी नवीन पिढी ही गझलकार सुरेश भट यांनी तयार केली आहे.सुरेश भट यांचा जन्मदिन १५ एप्रिल असून हा दिवस मराठी गझल दिवस म्हणून महाराष्ट्र शासनाने जाहीर करावा,अशी मागणी कवी विष्णु सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्याकडे पत्राव्दारे केली आहे.

ज्याप्रमाणे कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस हा आपल्या महाराष्ट्रात मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.त्याच प्रमाणावर सुरेश भट यांचा जन्म दिवस हा मराठी गझल दिवस म्हणून महाराष्ट्र शासनाने जाहीर करावा.अमरावती येथे ७ व ८ फेब्रुवारी रोजी अखिल भारतीय मराठी गझल साहित्य संमेलन होणार आहे.या संमेलनात हा एक प्रस्ताव आपण मंजूर करून महाराष्ट्र शासनास पाठवावा ही एक साहित्यिक म्हणून व सामाजिक बांधिलकी म्हणून जाहीर विनंती करतो आहे.सुरेश भट यांचे स्मारक व्हावे यासाठी १८ जानेवारी २०२० रोजी लेखी स्वरूपात निवेदन सादर केले होते.आज जवळपास सहा वर्षे पूर्ण झाली आहेत.मुख्यमंत्री महोदय, पालकमंत्री यांना सुद्धा अनेक पत्रे पाठवून सुद्धा शासनाने आजपर्यंत कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतला नाही ही वस्तुस्थिती आहे.कारण सांस्कृतिक क्षेत्रातील कलावंत यांची कोणत्याही प्रकारे दखल घेतली पाहिजे असे त्यांना वाटत नाही हीच खरी वस्तुस्थिती आहे.अमरावती हा जिल्हा लेखक कवी साहित्यिक कलावंत यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.मात्र सुरेश भट यांचे सारखा माणूस जर आजही शासकीय स्तरावर उपेक्षित राहत असेल तर सर्व सामान्य माणूस यांचे बाबतीत न बोललेले बरे!

## राष्ट्रीय प्रवक्तापदी मनोहर मुरकुटे

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**



अखिल भारतीय बारी समाज महासंघाच्या राष्ट्रीय प्रवक्ता पदी अंजनगाव सुर्जी येथील रहिवाशी मनोहर मुरकुटे यांची निवड करण्यात आली असून मनोहर मुरकुटे हे भाजपाचे दोन वेळा शहराध्यक्ष व सध्या स्थितीत दुसऱ्यांदा ते भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष, किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष तसेच सन २००९-१० पासून लोकमत प्रतिनिधी तर एकविरा नागरी सहकारी पतसंस्था अंजनगाव सुर्जीचे संचालक म्हणून काम पाहत आहे.त्यांचे ह्या निवडीमुळे जिल्हातील बारी समाजाच्या संघटनात्मक बांधणीला नवे बळ मिळणार असून समाजाला दिशा देण्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

अखिल भारतोय बारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेशचंद्र घोलप आणि राज्याचे प्रमुख अनिल हिस्सल यांनी मनोहर मुरकुटे यांच्या नेतृत्वगुणांवर आणि सामाजिक कार्यावर विश्वास ठेवत ही निवड केली आहे. समाज बांधवाकडून त्यांचे कौतूक होत आहे.

## तालुक्यातील पांदन रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण करा

### सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनातून इशारा

**अचलपूर/वार्ताहर**



तालुक्यातील अनेक गावांमधील पांदन रस्त्यांची दुरवस्था झाली असून गजाननराव तनपुरे यांच्या शेतापासून ते लाखनवाडी-बेलज रस्त्याला जुळणारा पांदन रस्ता तसेच श्रीकृष्णराव शेकोकार ते विष्णूभाऊ तनपुरे यांच्या शेतापर्यंतचा रस्ता मागील अनेक दिवसांपासून अर्धवट अवस्थेत आहे. सदर रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण न केल्यास अचलपूर तालुका ग्रामीण आंदोलन छेडेल, असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे देण्यात आला.या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

संबंधित पांदन रस्ते शेतकयांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून याच मार्गावरून शेतीमालाची वाहतूक,दुग्ध व्यवसायासाठी दूध वाहतूक, खत-बियाण्यांची ने-आण तसेच दैनंदिन दळणवळण केले जाते.मात्र, रस्त्यांची कामे अर्धवट राहिल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखल, खड्डे व पाणी साचत असून रस्ता पूर्णपणे नादुरुस्त होतो. परिणामी दुचाकी व चारचाकी वाहनांचे नुकसान होत आहे, तसेच अपघातांची शक्यताही वाढली आहे. याचा थेट फटका शेतकरी, विद्यार्थी, महिला व रुग्णांना बसत आहे.विशेषतः विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, आजारी रुग्णांना वेळेवर दवाखान्यात पोहोचवणेही कठीण झाले आहे.अनेक वेळा ग्रामस्थांनी स्वतच्या खचनि तात्पुरती दुरुस्ती करून रस्ता चालण्यायोग्य ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.मात्र हा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले.सदर पांदन रस्त्यांची तात्काळ पाहणी करून अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, रस्ते वाहतुकीस सुरक्षित व सुस्थितीत करण्यात यावेत, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.संबंधित विभागाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर येत्या काळात अचलपूर तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही देण्यात आला. यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष नामदेवराव तनपुरे, सेवादल तालुका अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, राहुल गाठे, विशाल खानझोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पत्रकारितेच्या विद्यार्थांनी अभ्यासले महात्मा गांधीचे जीवन कार्य

### आयआयएमसी सेवाग्रामचा अभ्यासदौरा



**अमरावती/का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थानच्या पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी वर्धा येथील सेवाग्राम ला भेट देऊन राष्ट्रपिता महात्मा गांधींची सेवाग्रामला येण्यामागचा उद्देश्य आणि त्यांचे जीवन कार्याशी संबंधित माहिती जाणून घेतली.

भारतीय जन संचार संस्थानच्या मराठी हिंदी व इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमच्या विद्यार्थ्यांनी वर्धा येथील सेवाग्रामला भेट दिली. या दरम्यान विद्यार्थ्यांनी बापू कुटी, बा कुटी त्यांचे स्वयंपाकघर, गांधीजींचे रुग्णालय, त्यांचे कार्यालय, वापरात असलेले वस्तू, प्रार्थनागृह, सूत कातण्याचे चाक बघून आश्चर्य व्यक्त केला. यासोबतच परिसरातील सुती कापड तयार करणारे हातमाग केंद्राला देखील भेट देऊन माहिती जाणून घेतली. यावेळी सेवाग्राम आश्रमातील कर्मचारी माधुरी यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधींचे व्यक्तिमत्व, कार्य आणि आश्रमातील त्यांच्या कार्याबद्दल ऐतिहासिक माहिती दिली. महात्मा गांधी सेवाग्रामला काही वर्ष निवासाला होते. याठिकाणी त्यावेळचे अनेक राजकीय नेता, उद्योजक, आणि स्वातंत्र चळवळीत सहभागी लोक भेट देऊन महात्मा गांधींशी चर्चा करीत होते. त्यामुळे या स्थळाला ऐतहासिक महत्त्व प्राप्त झाले. या सर्व घटनाक्रमाची माहिती या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांना मिळाली. यावेळी परिसरातील विविध उपक्रमाची माहिती देखील विद्यार्थ्यांनी जाणून घेतली.

या प्रसंगी, पदचिन्ह मासिकाचे संपादक, गांधीवादी विचारवंत डॉ. पंकज सिंग यांनी विद्यार्थ्यांना गांधीजींचे विचार सांगून बापू कुटीचे महत्त्व अधोरेखित केले. सोबतच त्यांचे 'खादी एक विचार' हे पुस्तक देखील भेट म्हणून दिले. अभ्यास भेटीत क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा समवेत डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, प्रा. प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने आणि रोहन तायडे सहभागी होते.

## प्रशासकीय अडचणींमुळे रखडलेला न्याय

# एम.फिल. पात्र प्राध्यापकांच्या नेट/सेट सूटसाठी हालचाल

**अमरावती/का.प्र.**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील अनेक प्राध्यापकांसाठी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला नेट/सेट सूटचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.११ जुलै २००९ पूर्वी एम.फिल. अर्हता प्राप्त केलेले तसेच १४ जून २००६ रोजी किंवा तत्पूर्वी नियुक्त झालेले प्राध्यापक यांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत शासन स्तरावर स्पष्ट तरतुदी अस्तित्वात असतानाही, केवळ प्रशासकीय व तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र प्राध्यापक आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे हा दीर्घकाळ प्रलंबित प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर नूटा संघटनेने पुढाकार घेत या प्रश्नाला गती देण्यासाठी ठोस हालचाल सुरू केली आहे. संघटनेच्या वतीने विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड आणि सहाय्यक कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर यांना निवेदन देण्यात आले.तसेच महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर (पुणे) यांच्याकडे सविस्तर निवेदन मेल द्वारे पाठवण्यात आले आहे. या निवेदनात शासन पत्र क्र.अधिनस्त अनुदानित महाविद्यालयांमधील पात्र प्राध्यापकांची माहिती तात्काळ शासनाकडे सादर करण्याची स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. निवेदनामध्ये पात्रतेचे निकष स्पष्टपणे नमूद करण्यात आले असून त्यामध्ये १ जानेवारी १९९४ ते ११ जुलै २००९ या कालावधीत एम.फिल. पदवी प्राप्त केलेली असणे,१४ जून २००६ रोजी किंवा तत्पूर्वी नियुक्ती झालेली असणे,तसेच यापूर्वी NET/SET सूटबाबत नावानिशी कोणतीही मंजुरी मिळालेली नसणे,

हे निकष पूर्ण करणारे महाराष्ट्रातील १४२१ त्यापैकी १३८ अमरावती विद्यापीठातील प्राध्यापकांना दिलासा मिळालेला आहे. परंतु प्रत्यक्षात पात्र प्राध्यापक असूनही केवळ प्रशासकीय कारणांमुळे १६ पात्र प्राध्यापकांची माहिती यापूर्वी महाविद्यालयांकडून आवश्यक कागदपत्रे वेळेत प्राप्त न झाल्याने शासनाने दिलेल्या विहित मुदतीत सादर करता आली नव्हती. मात्र आता ही सर्व माहिती संपूर्ण कागदपत्रांसह उपलब्ध असून, ती तात्काळ विद्यापीठ स्तरावर स्वीकारून पुढील कार्यवाहीसाठी संचालक, उच्च शिक्षण कार्यालयाशी समन्वय साधावा, अशी ठोस मागणी नूटा संघटनेने केली आहे.ही प्रक्रिया पूर्ण झाल्यास संबंधित पात्र प्राध्यापकांना नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळण्याचा मार्ग मोकळा होईल आणि त्यांच्या सेवाकालातील एक मोठा अन्याय दूर होईल, असा विश्वास नूटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ. प्रशांत विघे यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी डॉ. प्रशांत विघे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात डॉ. गोकुळ बाबाराव काळे, प्रा. नाना बाबाराव कुटेमाटे, डॉ. अरविंद अर्जूनराव तायडे, डॉ. स्मिता मनोहरराव जाधव, डॉ. निशा सखाराम नायगावकर (जोशी), डॉ. रवींद्र जगदेवराव तायडे, डॉ. सनोबर कनकेशन, डॉ. राखी रामकृष्ण इंगळे, डॉ. किरण बाबुराव सांगवे, डॉ. शामला रमेश कटके, डॉ. शुभांगी प्रमोद इंगोले,डॉ. मंजुषा हरिभाऊ धापूडकर, आणि डॉ. अभिजीत केशवराव आवारी यांनी सहभाग नोंदविला. प्रभारी कुलसचिव डॉ. अजय लाड यांनी सहाय्यक कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर यांना पुढील कारवाही करावी असे आदेश दिले.

## संक्षिप्त

### हरभरा पिकासाठी महिला शेतीशाळा



**नांदगाव पेठ-**हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी महिलांना शाश्वत शेती पद्धतींबाबत सक्षम करण्याच्या उद्देशाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) टप्पा दोन अंतर्गत विविध उपक्रम राबविले जात आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून महिलांचे सक्षमीकरण, शेती विकासाच्या मुख्य प्रवाहात त्यांचा सहभाग वाढविणे व उत्पादनवाढ साधणे यासाठी ठोस प्रयत्न सुरू आहेत.अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. पंकज चेडे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली तसेच जीवन कुटेमाटे यांच्या नियोजनानुसार मौजा यावली शहीद येथे रब्बी हंगामातील हरभरा पिकासाठी विशेष प्रात्यक्षिकांसह महिला शेतीशाळेचे वर्ग घेण्यात येत आहेत.शेतीशाळेसाठी होस्ट फार्मर योगिता ढोके, प्रयोगशील शेतकरी महिला सीमा गजानन निंभोरकर, वर्षा भुरे, पूनम बडोने, कृषी ताई प्राची लंगडे तसेच समूह सहाय्यक पायल देशमुख यांचे विशेष सहकार्य लाभले. शेतीशाळेत मोठ्या संख्येने महिला शेतकरी उपस्थित होत्या.

### योजनेच्या लाभार्थ्यांनी ह्यातीची नोंद घेण्याचे आवाहन

**अमरावती-**संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत ह्यातीची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत लाभार्थ्यांनी त्यांचे योजनेबाबतचे मासिक अनुदान ज्या बँक खाते, पोसट ऑफीसमध्ये जमा होते, अशा बँक मॅनेजर अथवा पोस्ट ऑफीसमध्ये पोस्ट मास्टर यांचे समक्ष हजर राहून स्वतः ह्यात असल्याची नोंद घ्यावी, अथवा विहीत नमुन्यात ह्यात असल्याची नोंद घेऊन मॅनेजर, पोस्टमास्टर यांच्या सही, शिक्का घ्यावा. सदर विहीत नमुना बँक, पोस्ट ऑफीस किंवा अमरावती तहसिल कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी केले आहे.

### सहाय्यक कृषी अधिकारी मारोती जाधव सन्मानित



**अमरावती-**शेतकऱ्यांना आधुनिक शेती,तंत्रज्ञानाची माहिती देणे, विविध शासकीय कृषी योजना प्रभावीपणे राबवणे तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी सातत्याने मार्गदर्शन करून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करणे यासाठी कृषी अधिकारी मारोती जाधव प्रजासत्ताक दिनी त्यांना सन्मानित करण्यात आले. सोहळ्याला उपसरपंच अनिकेत खाडे,ग्रामपंचायत सदस्य मिलिंद तायडे, ग्रामविकास अधिकारी अनिता नवले तसेच सागर रोडे, प्रविण आमले, आकाश शेंडे, कुशल देशमुख, सुरज फरतोडे, रोशन कापसे,डी. आर. वानखडे,पवन पाटनकर उपस्थित होते.

### आज विद्यापीठात व्याख्यान

**अमरावती-**भारताचे पहिले कृषीमंत्री आणि शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात केलेल्या 'डी.फील' या जगप्रसिद्ध संशोधन कार्यास शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. शताब्दी वर्षानिमित्त ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वाजता 'धर्माचा वैदिक साहित्यात उगम आणि विकास' या विषयावर श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा याठिकाणी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा डॉ. पंजाबराव देशमुख प्रादेशिक अर्थनियमन केंद्र आणि श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा यांच्या संयुक्त विद्यमाने सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.अध्यक्षस्थान श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख भूषविणार असून प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते उपस्थित राहतील. प्रमुख वक्ते म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य प्राचार्य डॉ. प्रकाश तायडे हे 'धर्माचा वैदिक साहित्यात उगम आणि विकास' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान देतील.यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.व्ही.एम. मेटकर, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर व कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

### संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवास प्रारंभ

**तिवसा-**येथील विद्युत कॉलनी येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सवास प्रारंभ झाला आहे. येथील श्री संत गजानन महाराज सेवा संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा प्रकट महोत्सवाचे आयोजन १ ते ८ फेब्रुवारी पर्यत करण्यात आले आहे. या महोत्सवाचा समारोप ८ फेब्रुवारी रोजी होईल. या महोत्सवामध्ये दररोज सकाळी साडे पाच वाजता काकड आरती, सकाळी ९ ते सकाळी ११ वाजेपर्यंत श्री चे पारायण, सायंकाळी सहा ते सात वाजेपर्यंत हरिपाठ व श्री ची आरती व भजन असे दैनंदिन कार्यक्रम होईल. दररोज दुपारी १ ते ५ वाजेपर्यंत श्रीमद् भागवत कथा सप्ताहाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. यामध्ये भागवतकार हरिभक्त पारायण मनोज महाराज सातंगे (रा. भांबोरा, आळंदीकर)यांचे प्रवचन होईल.शुक्रवार ६ फेब्रुवारी दुपारी एक ते पाच वाजता श्रीमद भागवत कथा होईल.रात्री ८ ते ११ वाजून हभप सागर महाराज नंदुरकर आळंदीकर यांचे भारुडाचा कार्यक्रम होईल.शनिवार ७ फेब्रुवारीला रात्री ८ ते ११ वाजता हभप मनोज महाराज सातंगे यांचे हरिकीर्तनाचा कार्यक्रम होईल. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेपाच वाजता श्री चा अभिषेक,श्री ची आरती होईल. दुपारी बारा ते पाच वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होईल.

# आज ठरणार अमरावतीचा १७ वा महापौर व उपमहापौर

## महापालिका प्रशासनाची तयारी पूर्ण

**अमरावती/का.प्र.**

फेब्रुवारीमध्ये झालेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर, अमरावतीच्या १७ व्या महापौरपदाची निवडणूक शुक्रवार, ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. २२ प्रभागातील ८७ नगरसेवक संयुक्तपणे महापौरपदाचा उमेदवार निवडतील. ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हा दंडाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात होणाऱ्या या बैठकीची तयारी महानगरपालिका प्रशासनाने पूर्ण केली आहे.

महापौरपदासाठी भाजपकडून श्रीचंद तेजवानी, काँग्रेसकडून डॉ. संजय शिरभाते आणि बसपाकडून इस्माईल कासम लालुवाले यांचे अर्ज दाखल झाले आहेत. उपमहापौरपदासाठी काँग्रेसकडून लुबना तनवीर, युवा स्वाभिमान पक्षाकडून सचिन भेंडे आणि बसपाकडून सचिन वैद्य यांचे अर्ज दाखल झाले आहेत.

महापालिका निवडणुकीतील विस्कळीत निकालानंतर, भाजपने राष्ट्रवादी अजित, युवा स्वाभिमान, राष्ट्रवादी (अजित) आणि शिवसेना शिंदे यांच्या महायुती आघाडीकडून महापौरपदाचे उमेदवार म्हणून श्रीचंद तेजवानी यांचे नाव जाहीर केले आहे. त्यांना युवा स्वाभिमान पक्षाचे १५, राष्ट्रीय अजित पक्षाचे ११ आणि शिवसेना घीचे ३ अशा ५ नगरसेवकांचा पाठिंबा आहे. यामध्ये एक समस्या आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजितच्या आमदार सुलभा खोडके यांनी उपमहापौरपदासाठी त्यांना पाठिंबा देण्याचा विचार करत असल्याचे सांगून युवा स्वाभिमान पक्षाची चिंता वाढवली आहे. काँग्रेसही त्यासाठी जोर लावत आहे.

दरम्यान, भाजपच्या महापौरपदाच्या आणि युवा स्वाभिमान पक्षाच्या उपमहापौरपदाच्या उमेदवारांना वॉकओव्हर न मिळाल्याने काँग्रेस आणि बसपानेही आपले उमेदवार उभे केले आहेत. महायुतीच्या काँग्रेसला पाठिंबा देण्यावरून नाराज नगरसेवक कसे असतील हे पाहणे रंजक ठरेल. एकतर पाठिंबा मिळतो किंवा बसपाला फायदा मिळतो. मतदान हात वर करून करावे लागेल ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका सदस्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेनुसार, प्रथम महापौरपदाच्या उमेदवारांची घोषणा केली जाईल. त्यानंतर, उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी १५ मिनिटे दिली जातील. या वेळेनंतर, उपस्थित मगरसेवक हात वर करून मतदान करतील.

### महापौर

| | |
|---|---|
| १ देवीसिंग रामसिंग शेखावत | १० मार्च १९९२ ते २० मार्च १९९३ |
| २ प्रभाकर रामचंद्र सावळाखे | २० मार्च १९९३ ते १९ मार्च १९९४ |
| ३ गोविंद गोपाला अग्रवाल | २० मार्च १९९४ ते २० मार्च १९९५ |
| ४ विद्याताई विजयराव देशपांडे | २० मार्च १९९५ ते ०९ मार्च १९९६ पर्यंत |
| ५ किरण उमेश्वराव महाले | ०९ मार्च १९९६ ते ०९ मार्च १९९७ पर्यंत |
| ६ प्रवीणआप्पा काशीकर | १० मार्च १९९७ ते २० मार्च १९९८ पर्यंत |
| ७ नितिन विजयराव वानखडे | २० मार्च १९९८ ते १९ मार्च १९९९ |
| ८ विलास महादेवराव इंगोले | २० मार्च १९९९ ते ०८ मार्च २००२ पर्यंत |
| ९ दिपाली दिनेश गवळी | ०९ मार्च २००२ ते १८ फेब्रुवारी २००५ पर्यंत |
| १० मिलिंद विनायक चिमोटे | १८ फेब्रुवारी २००५ ते ८ मार्च २००७ पर्यंत |
| ११ अशोक गोपाळराव डोंगरे | २९ मार्च २००७ ते ३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| १२ एड. किशोर शेळके | १ डिसेंबर २००९ ते ०८ मार्च २०१२ पर्यंत |
| १३ वंदना महेंद्र कंगाले | ९ मार्च २०१२ ते ०८ सप्टेंबर २०१४ पर्यंत |
| १४ नंदा चरणजित कौर | ९ सप्टेंबर २०१४ ते ०८ मार्च २०१७ पर्यंत |
| १५ संजय सातप्पा नरवणे | ९ मार्च २०१७ ते २१ सप्टेंबर २०१९ पर्यंत |
| १६ चेतन विजयराव गावंडे | २ सप्टेंबर २०१९ ते ०८ मार्च २०२२ पर्यंत |






### उपमहापौर

| | |
|---|---|
| १ विलास रंगराव महल्ले | १० मार्च १९९२ ते २० मार्च १९९३ |
| २ नानकराव दासमलानी | २० मार्च १९९३ ते १९ मार्च १९९४ |
| ३ गंगाराम वंतुजी बागडे | १९ मार्च १९९४ ते २० मार्च १९९५ |
| ४ डॉ. गणेश खारकर | २० मार्च १९९५ ते १९ मार्च १९९६ पर्यंत |
| ५ मिर्झा नईम बेग | १९ मार्च १९९६ ते ०९ मार्च १९९७ पर्यंत |
| ६ डॉ. राजेंद्र तायडे | १० मार्च १९९७ ते २० मार्च १९९८ पर्यंत |
| ७ प्रमोद देवरावजी पांडे | २० मार्च १९९८ ते १९ मार्च १९९९ |
| ८ दिगंबर मनोहरराव डहाके | २० मार्च १९९९ ते ०८ मार्च २००२ पर्यंत |
| ९ रामकृष्ण विठ्ठलराव सोलंके | ०९ मार्च २००२ ते १८ फेब्रुवारी २००५ पर्यंत |
| १० मेघा अजय हरणे | १८ फेब्रुवारी २००५ ते ८ मार्च २००७ पर्यंत |
| ११ चेतन दशरथ पवार | ०९ मार्च २००७ ते ३० नोव्हेंबर २००९ पर्यंत |
| १२ शेख जाफर शेख जब्बार | ०१ डिसेंबर २००९ ते ०८ मार्च २०१२ पर्यंत |
| १३ नंदकिशोर रंगरावजी वहाडें | ०९ मार्च २०१२ ते ०८ सप्टेंबर २०१४ पर्यंत |
| १४ शेख जफर शेख जब्बार | ०९ सप्टेंबर २०१४ ते ०८ मार्च २०१७ पर्यंत |
| १५ संध्या सदाशिव टिकले | ०९ मार्च २०१७ ते २१ सप्टेंबर २०१९ पर्यंत |
| १६ कुसुम भरत साहू | २२ सप्टेंबर २०१९ ते ०८ मार्च २०२२ पर्यंत |

# निस्वार्थ सेवाभावाचा जिवंत आदर्श

### आरोग्य सेवक रूपेश नगरनाईक



आजचा काळ वेगाचा, स्पर्धेचा आणि स्वकेंद्री विचारांचा झाला आहे. आधुनिक जीवनशैलीत माणूस स्वतःच्या कुटुंब, करिअर आणि व्यक्तिगत प्रगतीत इतका गुंतला आहे की समाजासाठी वेळ देणारी माणसे दुर्मिळ होत चालली आहेत. अशा परिस्थितीत, कोणतीही प्रसिद्धी किंवा अपेक्षा न ठेवता, निस्वार्थपणे समाजासाठी झटणारी व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान ठरते. आरोग्य सेवक रूपेश नगरनाईक हे त्याचेच जिवंत उदाहरण आहेत.

आजची तरुण पिढी मोठी स्वप्ने पाहते, हे योग्यच आहे. मात्र या स्वप्नांच्या प्रवासात सामाजिक भान हरवत चालले आहे. रस्त्यावर अपघात झाल्यास मदतीऐवजी मोबाईल कॅमेरे पुढे येतात; रुग्णालयात गरजू रुग्ण मदतीसाठी तडफडत असतो, पण 'हे माझे काम नाही' या भावनेने अनेकजण दूर जातात. अशा काळात, स्वतःचा वेळ, संपर्क आणि श्रम समाजासाठी देणारा तरुण वेगळा ठरतो.

रूपेश नगरनाईक हे कोणत्याही मोठ्या पदावर नाहीत किंवा प्रसिद्धीच्या झोतातही नाहीत. मात्र त्यांच्या कार्याची व्याप्ती मोठी आहे. दररोज रुग्णांच्या मदतीसाठी धावपळ करणे, गरीब व गरजू रुग्णांना शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळवून देणे, वैद्यकीय उपचारांसाठी लागणारा खर्च विविध ट्रस्ट, दानशूर व्यक्ती व संस्थांच्या माध्यमातून उभारणे हे सर्व कार्य ते सातत्याने आणि निस्वार्थपणे करतात. त्यांच्या या सेवेमुळे शेकडो रुग्णांना दिलासा मिळाला असून, त्यांचे आशीर्वाद हेच त्यांच्या कार्याचे खरे प्रमाणपत्र आहे.

संत गाडगे महाराजांनी सांगितले होते की, 'देव शोधू नकोस मंदिरात, देव आहे गरिबात आणि दु:खितात.' गाडगे महाराजांनी आयुष्यभर समाजसेवेचा वसा जपला. आज त्यांच्या विचारांचे प्रत्यक्ष प्रतिबिंब जर कुठे दिसत असेल, तर ते अशा सेवाभावी व्यक्तींच्या कार्यात दिसते. रुग्ण हा देव मानून, त्याच्या वेदनेला आपली वेदना समजून मदत करणारे रूपेश नगरनाईक हे गाडगे महाराजांच्या विचारांचे आधुनिक रूप म्हणावे लागेल.

आजचा तरुण प्रामुख्याने 'मला काय मिळेल?' या विचारात असतो, तर रूपेश नगरनाईक 'मी समाजाला काय देऊ शकतो?' या विचाराने प्रेरित आहेत. मदत करताना प्रसिद्धीचा मोह न ठेवता, केवळ माणुसकीच्या नात्याने ते काम करतात. हीच बाब त्यांना आजच्या तरुणाईत वेगळे ठरवते. माझा आणि रूपेश नगरनाईक यांचा परिचय श्रावणी बहुउद्देशीय संस्था यांच्या माध्यमातून झाला. संस्थेच्या कार्यात त्यांनी प्रतिनिधित्व स्वीकारून अत्यंत प्रामाणिकपणे जबाबदारी पार पाडली. संस्थेचे कार्य अधिक व्यापक व्हावे, अधिक गरजू लोकांपर्यंत पोहोचावे, यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले असून, संस्थेला एका नव्या उंचीवर नेण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

वकील म्हणून अमरावती, यवतमाळ, नागपूर व मुंबई येथे कार्यरत असताना मला अनेक वेळा रुग्णांच्या मदतीसाठी संपर्क येतो. अशा वेळी मी विश्वासाने एकच नाव सुचवतो रूपेश नगरनाईक. कारण मला खात्री असते की त्या रुग्णाकडे केवळ 'प्रकरण' म्हणून न पाहता, माणूस म्हणून पाहिले जाईल आणि तितक्याच तळमळीने मदत केली जाईल.

आज समाजाला भाषण देणाऱ्या नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून उदाहरण ठेवणाऱ्या तरुणांची गरज आहे. रूपेश नगरनाईक यांसारख्या सेवाभावी तरुणांमुळेच समाजावरचा विश्वास टिकून आहे. अशा व्यक्तींचे कार्य प्रकाशात आणणे हे समाजाचे कर्तव्य आहे.रुग्णसेवा, मानवता आणि निस्वार्थपणा या मूल्यांवर चालणाऱ्या आरोग्य सेवक रूपेश नगरनाईक यांच्या कार्याला मनापासून सलाम.

**– ॲड. धनंजय देशमुख**
श्रावणी बहुउद्देशीय संस्था, अमरावती
मो-९२८४३८२१०२

# पाच सातशे लोकांच्या संमेलनासाठी ७५ कोटी कसे ?

## श्रीपाद जोशी यांनी उपस्थीत केला प्रश्न

**नागपूर-** गेल्या तीन वर्षांपासून शासन त्यांचे कामच नसलेले तथाकथित विश्व मराठी संमेलन आयोजित करत असून यंदा शासनाचे चौथे विश्व मराठी संमेलन नाशिक येथे पुढील महिन्यातच होऊ घातले आहे.गेल्या तीनही संमेलनात अनुक्रमे ७ कोटी,२० कोटी आणि ४० कोटी याहून अधिक खर्चाचे अंदाजपत्रक होते,ज्याचे तपशीलवार हिशेब माहिती अधिकारात मागून देखील अद्याप ते पुरवले गेलेले नाहीत अशी स्थिती आहे.या समेलनाला देखील दहा बारा कोटींवर पैसा लागत नाही.मग शासनाच्या पाच सातशे लोकांच्या संमेलनासाठी ७५ कोटी कसे काय लागतात हे मुख्यमंत्री व अर्थमंत्री या नात्याने तपासावे,तोवर जनतेचा पैसा असा निरर्थक खर्च करण्याच्या उद्योगाला कृपया स्थगिती द्यावी व संबंधित शासन निर्णय निर्गमित केला जाणार नाही, रोखून धरला जाईल असे आदेश देण्यात यावे अशी मागणी मराठीच्या व्यापक हितासाठीचे प्रमुख संयोजक श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी केली आहे.

तुकाराम मुंढे हे मराठी भाषा विभाग सचिव असताना त्यांनी आम्ही केलेल्या पाठपुराव्याच्या पार्श्वभूमीवर हा अव्वाच्या सव्वा खर्च जो कोणत्याही जाहीर निविदा न काढता नियमबाह्य पद्धतीने केला जातो, त्याला आळा घालण्यासाठी निविदा काढण्यास सांगताच व हा अवाढव्य खर्च किमान पातळीवर आणण्याचे सांगताच त्यांची तडकाफडकी रातोरात बदली केली गेली.आता चौथ्या विश्व मराठी संमेलनासाठी ७५ कोटी रुपये एवढी अवाढव्य तरतूद केली जात असल्याचे ऐकिवात असून तसा शासन निर्णय कोणत्याही क्षणी निघू शकतो असेही कळते. आम्ही गेली ५५ वर्ष साहित्य, संस्कृती,संमेलने या संबंधात काम करतो व या संमेलन आयोजनातील तज्ज्ञ मंडळी आहोत.एवढा अवाढव्य खर्च तीन दिवसांच्या अशा संमेलनाला लागत नाही,याच्या अर्धा देखील लागत नाही.आमच्या या अनुभवाचा राज्याला लाभ करून द्यावा अशी अपेक्षा आहे.

प्रचंड संख्येने लोक ज्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला दरवर्षी येतात ते संमेलन किमान आवश्यक खर्च करून केले तर त्याला देखील दहा बारा कोटींवर पैसा लागत नाही.त्याला मात्र शासन केवळ दोन कोटी निधी देते.मग शासनाच्या पाच सातशे लोकांच्या संमेलनासाठी ७५ कोटी कसे काय लागतात हे आपणच मुख्यमंत्री व अर्थमंत्री या नात्याने देखील तपासावे,तोवर जनतेचा पैसा असा निरर्थक खर्च करण्याच्या उद्योगाला कृपया स्थगिती द्यावी व संबंधित शासन निर्णय निर्गमित केला जाणार नाही.

गेल्या तीन संमेलनांच्या खर्चाची, नियमबाह्य,निविदांविना चाललेल्या कामाची तपासणी देखील केली जाईल असे कृपया बघावे.तोवर हे संमेलन होणार नाही असे कृपया संबंधितांना निर्देश द्यावेत अशी विनंती करीत आहोत. मुळात ही संमेलने आयोजित करणे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ, विभागीय साहित्य संस्था, विश्व मराठी परिषद अशा संस्थांची कामे आहेत.शासनाने स्वतः या संस्थांचे स्पर्धक होत ती कामे स्वतः करू नयेत.हे दरवर्षी आपल्या निदर्शनास आणून देत आलो आहोत.मात्र अद्याप त्याकडे गांभीर्याने बघितले गेले नसल्याने ते दरवर्षी लक्षात आणून द्यावे लागते आहे.आमच्या ज्या संस्थांचे हे काम आहे त्यांना हे संमेलन करू द्यावे, त्या संस्था या कामातल्या तज्ज्ञ आहेत, शासकीय अधिकारी, प्रशासन नव्हे. शासनाच्या, जनतेच्या पैशाचा हा निष्कारणाचा कोट्यवधीचा चुराडा कृपया थांबवावा.हा संभाव्य ७५ कोटी एवढा पैसा मराठी भाषा विद्यापीठाकडे वळता करावा, जेणेकरून त्या पैशातून काही पायाभूत महत्त्वाचे काम तिथे उभे राहील, आणि तीन दिवसांच्या व्यासपीठीय उत्सवात तो वाहून जाणार नाही.

# महावितरणला हरित ऊर्जा शिखर परिषदेत मानाचा पुरस्कार

**अमरावती-** केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांशी सुसंगत राहून महावितरणकडून हरित ऊर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. स्वस्त व शाश्वत वीजपुरवठ्यासाठी महावितरणने अपारंपरिक ऊर्जेला प्राधान्य देत वीज खरेदीच्या दीर्घकालीन करारांमध्ये तब्बल ६५ टक्के अपारंपरिक ऊर्जेचा समावेश केला आहे. यासह इतर कामगिरीची दखल घेऊन १४ व्या हरित ऊर्जा शिखर परिषदेत महावितरणला हरित ऊर्जा व ऊर्जा कार्यक्षमता उत्कृष्टता पुरस्काराने गौरविण्यात आले.



नवी दिल्ली येथे बुधवारी इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने आयोजित या शिखर परिषदेचे अध्यक्ष व केंद्रीय ऊर्जा सचिव (सेवानिवृत्त) श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. धनंजय औंढेकर तसेच मोहन मुजूमदार व शुभम चोरमले यांनी हा पुरस्कार स्वीकारला.राज्याच्या वीज क्षेत्रासाठी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांनी रिसोर्स ॲडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. त्यानुसार सन २०३० पर्यंत तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. त्यामुळे नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होईल. तसेच सुमारे ३ लाख ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. पुढील पाच वर्षांमध्ये वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने सर्व वर्गवारीचे वीज दर कमी होत जाणार आहे.या नियोजनाला अनुसरून महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी ऊर्जा परिवर्तनाला मोठा वेग दिला आहे. महावितरणने प्राधान्य दरांवर सर्व ऊर्जा स्त्रोतांमध्ये आतापर्यंत ७२ हजार ९१८ मेगावॅट क्षमतेच्या वीज खरेदीचे दीर्घकालीन करार (पीपीए) केले आहेत. यामध्ये ४७ हजार ३४७ मेगावॅट (६५ टक्के) अपारंपरिक ऊर्जेचा समावेश आहे. ऊर्जा परिवर्तनामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा क्षेत्रात महावितरणने मोठी आघाडी घेतली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी आतापर्यंत ३५२० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. त्यातून ९ लाखांवर शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे. तर देशात सर्वाधिक ८ लाखांवर सौर कृषिपंप कार्यान्वित झाले आहे. यासह प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत आतापर्यंत राज्यात ४ लाख ४३ हजारांवर घरगुती ग्राहकांकडे १७३३ मेगावॅट क्षमतेचे छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले आहे व त्यांचे मासिक वीजबिल देखील शून्यवत झाले आहे.

# भातकुलीत मुख्याधिकारी करीत आहे पदाचा गैरवापर

## अन्यायग्रस्ताचा न्यायासाठी टाहो

**अमरावती/का.प्र.**

भातकुली येथील रहिवासी दिनेश श्यामराव सरोदे यांनी जिल्हा दंडाधिका-यांकडे तक्रार दाखल केली. ज्यात मुख्याधिकारी या पदाचा वापर करून कचरा डेपोसाठी शेतजमिनीतून रस्ता तयार केल्याचा आरोप केला होता. त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मुख्याधिका-यांच्या दादागिरीमुळे त्यांच्या वडिलांचे काही दिवसांपूर्वी निधन झाले. त्यामुळे मुख्याधिका-यांविरुद्ध गुन्हा दाखल करावा अशी मागणी दिनेश सरोदे यांनी लेखी तक्रारीत केली आहे.

भातकुलीच्या तत्कालीन मुख्याअधिकारी यांनी ५ वर्षापूर्वी कोणतीही सूचना व वेळ न देता माझ्या वाहत्या ताब्यात असलेल्या शेतातून बळजबरीने रस्ता तयार केला. सक्तीने रस्ता तयार केल्याने मानसिक धक्का बसला आणि वडीलांचा मृत्यू झाला.दिनेश सरोदे यांच्या लेखी तक्रारीत म्हटले आहे की, भातकुलीच्या तत्कालीन मुख्याधिकारी पाच वर्षापूर्वी कोणतीही सूचना न देता सरोदे यांच्या शेतातून रस्ता तयार केला होता. तक्रारीत आरोप करण्यात आला आहे की,मुख्याधिकारीच्या नावाचा वापर करून राजकीय दबावाचा त्यांच्या शेतातून कचरा डेपोसाठी रस्ता तयार केला. ज्यामुळे सरोदे कुटुंबाला पिकांची लागवड करण्यासाठी रोखले गेले. सरोदे यांच्या मालकीची जमीन आहे.सक्तीने रस्ता तयार केल्यामुळे मानसिक धक्का बसून श्यामराव सरोदे यांचे २१ मार्च २०२१ रोजी निधन झाले. दिनेश सरोदे यांनी २५ ऑगस्ट, ८ ऑक्टोबर आणि ११ डिसेंबर रोजी नगर पंचायतीकडे तक्रारी दाखल केल्या. त्यानंतर प्रशासनाने त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दिनेश सरोदे यांनी १५ डिसेंबर रोजी जिल्हा दंडाधिकारी कार्यालयात तक्रार दाखल केली. सरोदे यांनी सांगितले की,



त्यांनी नगर पंचायतीला सर्व माहिती लेखी स्वरूपात दिली होती. तरीही,माहितीकडे दुर्लक्ष करण्यात आले. सरोदे यांनी शेतातून बेकायदेशीरपणे बांधलेला मार्ग बंद करण्याची विनंती केली आहे.

कागदपत्राकडे दुर्लक्ष सरोदे यांनी सांगितले की, त्यांच्याकडे त्यांच्या शेतीशी संबंधित सर्व कागदपत्रे आहेत. ज्यात खरेदी, फेरफार, सात/बारा, जमीनीच्या नोंदी आणि नगरपंचायत कडे तक्रारीचा समावेश तरीही कचरा डीपो साठी खाजगी शेतातून रस्ता बांधने बेकायदेशीर आहे. राजकीय दबाखाली शेतकरी कुंटूबावर अन्याय करणा-या तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करावी. आणि रस्ता पुन्हा लागवडीसाठी ताब्यात देण्यात यावा. ही विनंती सरोदे कुटुबाने प्रशासनाला दिली.

# मनपा आयुक्तांच्या निर्देशांनुसार घनकचरा व्यवस्थापनावर भर

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिकेच्या मनपा आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या स्पष्ट निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी सुकळी कंपोस्ट डेपो येथे भेट देऊन कचरा प्रक्रिया व्यवस्थापन प्रणालीची सखोल पाहणी केली. सदर पाहणी स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२५ तसेच GFC अंतर्गत प्रक्रिया केंद्राच्या प्रत्यक्ष तपासणीच्या अनुषंगाने करण्यात आली.

या पाहणीदरम्यान शहरातील घनकचरा व्यवस्थापनाची सद्यस्थिती, कचरा संकलनाची कार्यपद्धती, कचरा वाहतूक व्यवस्था, कचऱ्यावर करण्यात येणारी प्रक्रिया तसेच सॅनिटरी लँडफिल फॅसिलिटी (एस्‌फ) व्यवस्थापनाबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांची तांत्रिक स्थिती, स्वच्छता, नियमित देखभाल, वाहनांवरील GPS प्रणाली, तसेच वाहन नोंदवही व दैनंदिन रेकॉर्ड यांची सखोल तपासणी करण्यात आली.तसेच कंपोस्ट डेपोमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण, ओला व सुका कचरा वेगळा करण्याची पद्धत, कंपोस्ट निर्मिती प्रक्रिया, पर्यावरणपूरक उपाययोजना, तसेच प्रक्रिया केंद्रातील स्वच्छता व कामगारांच्या सुरक्षिततेसाठी करण्यात आलेल्या उपायांची पाहणी करण्यात आली. कचरा प्रक्रियेशी संबंधित सर्व नोंदवही, मासिक अहवाल, वजन नोंदी व इतर प्रशासकीय रेकॉर्ड तपासून त्यांची अद्ययावतता व अचूकतेबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांच्या मार्गदर्शनानुसार कंपोस्ट डेपोतील जुन्या मशिनरीच्या देखभाल व दुरुस्ती (मेंटेनन्स) कामांची तसेच प्रस्तावित नवीन मशिनरीच्या इंस्टॉलेशनबाबत सविस्तर पाहणी करण्यात आली. जुन्या मशिनरीचे कार्यक्षम मेंटेनन्स करून त्यांची कार्यक्षमता वाढविणे तसेच नवीन अत्याधुनिक मशिनरीच्या माध्यमातून कचरा प्रक्रिया अधिक सक्षम, जलद व परिणामकारक करण्याबाबत संबंधितांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी कचरा संकलन व वाहतुकीत नियमितता ठेवणे, प्रक्रिया केंद्रातील कार्यपद्धतीत सुधारणा करणे, रेकॉर्ड व्यवस्थापन अद्ययावत ठेवणे तसेच पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने सर्व निकषांचे



काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला. नागरिकांचा सहभाग वाढविणे व शहर स्वच्छतेसाठी जनजागृती उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

सदर सदर पाहणी दरम्यान स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक अमन चौहान, दिनेश निंधाने, कोणार्क कंपनीचे प्रतिनिधी तसेच गंगा ट्रेडिंग कंपनीचे कंत्राटदार उपस्थित होते.

# जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान; जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी महिन्यात घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षा अकोला जिल्ह्यात पूर्णतः कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. कोणत्याही परीक्षा केंद्रावर कॉपी किंवा गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिला.*

## कॉपी प्रकरण आढळल्यास कठोर कारवाईचा इशारा



जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. अरविंद मोहरे, शिक्षणाधिकारी (योजना) संजयकुमार झापे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ. रत्नमाला खडके, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी प्रमोद टेकाडे, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी जितेंद्र प्रधान, विस्तार अधिकारी विनोद मानकर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी मीना म्हणाल्या की, यंदा राज्य शासनाने दहावी व बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना केल्या आहेत.

त्यानुसार प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक राहणार आहे. ज्या केंद्रांवर सीसीटीव्ही व्यवस्था नसेल, तेथे शिक्षकांची अदलाबदल करण्यात येईल. तसेच संबंधित परीक्षा केंद्राची मान्यता रद्द करण्याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल. परीक्षा काळात वीज भारनियमन झाल्यास बॅटरी किंवा इन्व्हर्टरची पर्यायी व्यवस्था ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांवर भरारी पथके, बैठी पथके व व्हिडीओ चित्रीकरणाद्वारे विशेष तपासणी केली जाणार आहे. अनुचित प्रकार आढळल्यास तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात येईल. परीक्षा केंद्रांवर एका बाकावर एकच विद्यार्थी बसविण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

दहावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार असून, २६,३५३ विद्यार्थी व ११८ केंद्रे आहेत. बारावीची परीक्षा २० फेब्रुवारी ते ११ मार्च दरम्यान असून, २६,२८७ विद्यार्थी व ८७ केंद्रे आहेत. परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त पार पाडण्यासाठी अमरावती विभागात विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्तरांवर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. जिल्ह्यात पेपर वितरण केंद्र परिरक्षकांची संख्या ११ असून, संवेदनशील व अतिसंवेदनशील केंद्रांवर दहावीसाठी २१ व बारावीसाठी २२ बैठी पथके तैनात करण्यात आली आहेत.

### परीक्षा केंद्र परिसरात जमावबंदी

परीक्षा काळात सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात येणार आहेत. या कालावधीत झेरॉक्स केंद्रे, फॅक्स, एसटीडी/मोबाईल केंद्रे व ध्वनिक्षेपक बंद राहणार आहेत. मात्र परीक्षार्थी, परीक्षा कामकाजाशी संबंधित अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व पोलीस यांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

### कॉपी आढळल्यास गुन्हा दाखल

कोणताही परीक्षार्थी कॉपी किंवा गैरवर्तन करताना आढळल्यास त्याच्याविरोधात पोलीस गुन्हा दाखल करण्यात येऊ शकतो. संबंधित विषयाचा निकाल रद्द करण्यात येईल, तसेच गंभीर प्रकरणात संपूर्ण परीक्षेचा निकालही रद्द केला जाऊ शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

# काँग्रेसची शिस्त धाब्यावर : निलंबित पदाधिका-यालाच थेट बनविले 'प्रमुख वक्ता'!

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा कारभार आता 'जैसे थे' नव्हे तर 'जसे जमेल तसे' सुरू असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. पक्षशिस्त, आदेश, निलंबन या सगळ्यांना हरताळ फासत काँग्रेसने चक्क निलंबित पदाधिकाऱ्यालाच प्रमुख वक्ता करून पक्षाची नामुष्की केली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पावर भाष्य करण्यासाठी आयोजित कार्यक्रमात काँग्रेसने २०२४ मध्ये पक्षविरोधी कारवाईप्रकरणी सहा वर्षांसाठी निलंबित केलेले प्रशांत गावंडे यांनाच व्यासपीठ दिले. विशेष म्हणजे हेच प्रशांत गावंडे लोकसभा निवडणुकीदरम्यान काँग्रेससाठी डोकेदुखी ठरले होते. तत्कालीन प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांच्या आदेशानुसार १२ जून २०२४ रोजी प्रशांत गावंडे यांना काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार डॉ. अभय पाटील यांच्या विरोधात काम केल्याप्रकरणी सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले होते. मात्र हे निलंबन केवळ कागदावरच राहिले की काय, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

### अकोल्यातील स्वराज भवनातही निलंबिताचा मुक्त संचार!

अकोल्यातील काँग्रेसचे अधिकृत कार्यालय असलेल्या स्वराज भवनात काही आठवड्यांपूर्वी सामाजिक विषयावरील कार्यक्रमातही प्रशांत गावंडे यांना व्यासपीठ देण्यात आले होते. त्या कार्यक्रमाच्या पत्रिकेत अकोला पश्चिमचे आमदार साजिदखान पठाण यांचेही नाव झळकत होते. आपल्याच पक्षाच्या प्रांताध्यक्षांनी निलंबित केलेला नेता जिल्हा कार्यालयात भाषण देतो, ही काँग्रेसची शिस्त का? असा थेट सवाल काँग्रेस कार्यकर्त्यांतून उपस्थित होत आहे.

## पक्षात बेबंदशाहीचा कळस, निलंबन कागदावरच राहिले?



### केतकरांची शिफारस, काँग्रेसची अडचण!

दरम्यान, जेष्ठ पत्रकार व माजी खासदार कुमार केतकर यांनीच प्रशांत गावंडे यांचे नाव वक्ता म्हणून पुढे रेटले असावे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. केतकर यांच्या 'कल्पनाविलासी' भूमिकेमुळे काँग्रेस यापूर्वीही अनेकदा अडचणीत सापडली असून, यावेळीही त्यांनी पक्षाला तोंडघशी पाडल्याची चर्चा आहे.

### निलंबन रद्द झाल्याचा गैरसमज?

दरम्यान, लोकसभा उमेदवार डॉ. अभय पाटील यांनी काँग्रेसचा राजीनामा दिल्यामुळे प्रशांत गावंडे यांचे निलंबन आपोआप रद्द झाले, असा भ्रम काँग्रेसच्या राज्य नेतृत्वाला झाला असेल का, असा सवालही उपस्थित केला जात आहे. एकंदरीत, काँग्रेसमध्ये शिस्त, आदेश आणि नेतृत्वाचा दरारा संपला असून 'काहीही चालते' हीच आता अधिकृत लाईन झाल्याचे हे प्रकरण अधोरेखित करते. काँग्रेसमध्ये कधी काय होईल याचा भरवसा राहिलेला नाही, हेच पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# दिपक दांदळे यांची सैनिक शेतकरी वेलफेयर फाऊंडेशनच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

येथील शिवसेना तालुका प्रमुख दिपकदादा दांदळे यांची सैनिक शेतकरी वेलफेयर फाऊंडेशन (एऐंड) च्या अकोला जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. अकोला येथील रोकडे मंगल कार्यालय, पत्रकार कॉलनी येथे बुधवार (दि. ४ फेब्रुवारी) रोजी पार पडलेल्या वराड विभागीय कार्यक्रमात त्यांना अधिकृत नियुक्तीपत्र देऊन पदभार सोपविण्यात आला.



सैनिक व शेतकरी यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सैनिक शेतकरी वेलफेयर फाऊंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेचे जीवनमान व आर्थिक स्तर उंचावण्याचा संस्थेचा मुख्य उद्देश आहे. संस्थेच्या ध्येयधोरणानुसार आरोग्य सेवा, कृषी, रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण आदी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी तालुका प्रमुख (पुरुष व महिला), विभाग प्रमुख व केंद्र प्रमुख अशा विविध पदांवर नियुक्त्या करून संघटनात्मक बांधणी करण्यात येणार आहे. आक्रमक शैली, ठाम नेतृत्व आणि शिवसेनेच्या बाण्याला शोभणारी धडाडी ही दिपकदादा दांदळे यांची ओळख असून, त्यांच्या नेतृत्वाखाली एऐंडच्या माध्यमातून जिल्ह्यात सामाजिक क्षेत्रात प्रभावी कार्य घडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५७/२०२६ — प्रोसेस नं. १२५६/२०२६

नी.ता. १८/०३/२०२६ — दिनांक : ३०/०१/२०२६

**अर्जदार :** १. प्रवीण प्रकाश बहूरकर रा. गजानन नगर, गल्ली क्र. ६, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला. २. सौ. योगिता गोपाल मदनकर योगिता प्रकाश बहूरकर लग्नाअगोदरचे नाव रा. देवरी, निंभारा, ता. भातुकली, देवरी जि. अमरावती. ३. निलेश प्रकाश बहूरकर रा. गजानन नगर, गल्ली क्र. ६, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. प्रकाश शंकरराव बहूरकर २. करुणा प्रकाश बहूरकर

**पत्ता :-** रा. गजानन नगर, गल्ली क्र. ६, डाबकी रोड, अकोला.ता. जि. अकोला.

या अर्जीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश शंकरराव बहूरकर यांचे दि. ०५/११/२०२५ रोजी व मयत करुणा प्रकाश बहूरकर यांचे दि. ०५/०१/२०२० रोजी राहत्या घरी अकोला येथे निधन झाले आहे.वरील अर्जदार त्यांचे कायदेशीर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयताचे वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होऊन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क-स्तर), अकोला

## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. २५७/२०२५ — जा. क्र. ४७८/२०२६

ने.ता. २७/०२/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला शाखा - मुर्तिजापुर

विरुध्द

**प्रतिवादी :-** शालिनी विनेश गायकवाड व इतर

प्रति,

प्रतिवादी क्र. ३) राहुल भिमराव मेश्राम रा. अष्टविनायक नगर, लहान उमरी, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,१०,९००/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवूनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. ०३ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

(शिक्का)

(ए. डब्ल्यू. इंगळे)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. २५८/२०२५ — जा. क्र. ४७९/२०२६

ने.ता. २७/०२/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला शाखा - मुर्तिजापुर

विरुध्द

**प्रतिवादी :-** विनोद शंकरराव कडू व इतर

प्रति,

प्रतिवादी क्र. २) प्रविण श्रीकृष्ण गावंडे रा. गोयनका नगर, मुर्तिजापुर ता. मुर्तिजापुर जि. अकोला क्र. ३) गजानन मधुकर इंगोले रा. अमृतवाडी, मुर्तिजापुर ता. मुर्तिजापुर जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ६१,७२२/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवूनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. २७ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. ०३ माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

(शिक्का)

(ए. डब्ल्यू. इंगळे)
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

# थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्यासाठी 'शास्ती अभय योजना' लागू करा

## नगरसेवक निलेश देव यांचे महापौरांना निवेदन

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरातील सर्वसामान्य मालमत्ता धारकांना दिलासा मिळावा तसेच महानगरपालिकेची थकीत कर वसुली वाढावी, यासाठी थकीत मालमत्ता करावरील शास्ती (दंड) माफ करणारी 'शास्ती अभय योजना' तातडीने लागू करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे गटनेते तथा नगरसेवक निलेश रामकृष्ण देव यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मंगळवारी (दि. ३) अकोला महानगरपालिकेच्या महापौर शारदा रणजीत खेडकर यांना सविस्तर निवेदन सादर केले.



अकोला शहरात खाजगी कंपनीमार्फत राबविण्यात आलेल्या कंत्राटी कर वसुली पद्धतीमुळे नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील इतर कोणत्याही महानगरपालिकेत नसलेली ही पद्धत अकोल्यात लागू करण्यात आल्याने कर आकारणी प्रक्रियेत अनेक त्रुटी निर्माण झाल्या. चुकीच्या व अव्यवस्थित कर आकारणीमुळे नागरिकांमध्ये गैरसमज, नाराजी व संभ्रमाचे वातावरण असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मागील वर्षी प्रशासकीय काळात दोन वेळा शास्ती अभय योजना राबविण्यात आल्या होत्या. मात्र या योजना ऐन दसरा व दिवाळी या सणांच्या काळात लागू करण्यात आल्याने अनेक नागरिकांना आर्थिक अडचणीमुळे त्याचा लाभ घेता आला नाही. सध्या अनेक मालमत्ता धारक कर भरण्यास तयार असले तरी शास्तीमुळे ते अडचणीत सापडत असल्याचे निलेश देव यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या तरतुदींचा संदर्भ देत, सन २०१७ नंतर मोठ्या प्रमाणावर मालमत्तांचे मूल्यांकन व हस्तांतरण अद्याप प्रलंबित असल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी उपस्थित केला. महानगरपालिकेच्या प्रक्रियात्मक दिरंगाईमुळे अनेक मालमत्ता धारकांना वेळेत नोटिसा मिळालेल्या नसून, अशा परिस्थितीत शास्ती आकारणे अन्यायकारक ठरणार असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रशासकीय काळात सन २०२३ पासून मालमत्ता हस्तांतरण शुल्कात अतिरिक्त १ टक्के वाढ करण्यात आली आहे. ही वसुली खाजगी संस्थेमार्फत होत असल्याने हस्तांतरण प्रक्रियेत मोठा विलंब होत आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांमध्ये हस्तांतरण शुल्क नाममात्र ?१००० निश्चित असताना अकोल्यात टक्केवारी पद्धतीने शुल्क आकारणे नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार टाकणारे असल्याचे देव यांनी सांगितले.शास्ती अभय योजना राबविल्यास नागरिकांना आर्थिक दिलासा मिळेल, थकीत करांची जलद वसुली होईल तसेच महानगरपालिकेच्या महसुलात लक्षणीय वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर, सन २०१७ नंतर मूल्यांकन व हस्तांतरण न झालेल्या मालमत्तांसाठी शास्ती अभय योजना लागू करणे, १ टक्के हस्तांतरण शुल्क तात्काळ रद्द करून शुल्क १००० निश्चित करणे, भविष्यात मूल्यांकन व हस्तांतरण प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारणे, अशा मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून महापौरांनी लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा निलेश देव यांनी व्यक्त केली आहे.

# ग्रामपंचायत कातखेड येथे नवीन ग्रामपंचायत भवनाचे लोकार्पण



■ प्रतिनिधी | कातखेड ■

ग्रामपंचायत कातखेड येथे बुधवारी (ता.४) नवीन ग्रामपंचायत भवनाच्या वास्तूचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. ग्रामपंचायत भवनाच्या इमारतीचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच तथा वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष गोरसिंग राठोड, उपसरपंच प्रतिभाताई खंडारे तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन करून गावाचा कायापालट करण्यासाठी ग्रामपंचायत भवनाची नवीन इमारत हे पहिले पाऊल असल्याचा विश्वास व्यक्त केला. ग्रामपंचायत भवनाच्या लोकार्पण सोहळ्याला अकोला तालुकाध्यक्ष किशोर जामनिक, तेल्हारा तालुकाध्यक्ष अशोक दारोकर, मूर्तिजापूर तालुकाध्यक्ष सुनील सरदार, नगराध्यक्ष शेख नईम, अकोला मनपा माजी गटनेते गजानन गवई, नगरसेवक जफर भाई, अमित तायडे, शुभम इंगळे, माजी नगरसेवक सुनील शिरसाट, शहराध्यक्ष अजहर भाई, अमोल जामनिक, प्रसिद्धी प्रमुख मोहन तायडे, प्रदीप शिरसाट, शुद्धोधन इंगळे, जनार्दन गवई, तुळशीराम चव्हाण, सतीश पवार, भारत निकोशे, सिंहासन जाधव, त्र्यंबक गवई, संतोष कीर्तक, राजदीप वानखडे, सिद्धार्थ गायकवाड, सुभाष गवई, अशोक लोणाग्रे, गणेश म्हैसने, दिगंबर म्हैसने व दादाराव सुरडकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश खंडारे यांनी केले.

> ग्रामपंचायत भवनातून सर्वसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्राधान्य राहणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कातखेड गावाच्या विकासासाठी कटीबद्ध असून यापुढे देखील विकास हाच आमचा अजेंडा राहणार आहे. त्यासाठी गावकऱ्यांनी सुद्धा सहकार्य करावे.
>
> **गोरसिंग राठोड,**
> सरपंच.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ४० वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न

## २१३६ विद्यार्थ्यांना पदवीप्रदान; राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते दीक्षांत भाषण

■ प्रतिनिधी | अकोला ■

*डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा ४० वा दीक्षांत समारंभ आज सकाळी दिमाखात पार पडला. कृषी क्षेत्राच्या सशक्तीकरणासाठी सज्ज होत असलेल्या भावी पिढीला या समारंभात एकूण २१३६ स्नातक, पदव्युत्तर व आचार्य पदवीधारकांना पदवी प्रदान करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती आचार्य देवव्रत यांच्या मान्यतेने झालेल्या या समारंभाला विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.*



या दीक्षांत समारंभाला राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे सन्माननीय अतिथी म्हणून, तर राज्याचे कामगार मंत्री व अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ना. आकाश फुंडकर तसेच राज्याचे वित्त व नियोजन, कृषी मदत व पुनर्वसन, विधी व न्याय व कामगार विभागाचे राज्यमंत्री ना. ॲड. आशिष जयस्वाल विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

आनंद कृषी विद्यापीठ, आनंद (गुजरात) येथील कुलगुरू डॉ. के. बी. कथीरीया यांनी दीक्षांत भाषण केले. कार्यक्रमाचे स्वागतपर भाषण व विद्यापीठाचा वार्षिक अहवाल वाचन कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले. यावेळी विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य, माजी कुलगुरू तसेच राज्यातील विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू मंचावर उपस्थित होते. यंदा पदवीप्राप्त विद्यार्थ्यांमध्ये बी.एस्सी. कृषीचे १९८६, उद्यानविद्येचे १९८, वनविद्येचे ४५, कृषी जैवतंत्रज्ञान ८६, कृषी व्यवसाय व्यवस्थापन ६६, अन्न तंत्रज्ञान ५३, कृषी अभियांत्रिकी ७१ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. पदव्युत्तर स्तरावर ३८३ विद्यार्थ्यांना पदवी, तर ४८ विद्यार्थ्यांना आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली.

यापैकी ४१ आचार्य पदवीधारक, ३१४ पदव्युत्तर पदवीधारक व १७७० पदवीपूर्व विद्यार्थी प्रत्यक्ष दीक्षांत समारंभात सहभागी होऊन पदवी स्वीकारली. उर्वरित ८११ विद्यार्थी संबंधित महाविद्यालयांच्या स्तरावर अप्रत्यक्षरीत्या पदवी स्वीकारणार आहेत. यंदा गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत ३२ सुवर्णपदके, १६ रौप्यपदके, ३४ रोख बक्षिसे तसेच ३ पुस्तक स्वरूपातील पुरस्कार पटकावले. या विद्यार्थ्यांनी इतरांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केल्याचे मत कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी व्यक्त केले.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गांधी-विनोबांच्या पावन भूमीत दारूचा महासागर

## दारूबंदीचा फज्जा; वर्धा येथील गोव्यातील विदेशी दारूचा सुळसुळाट
## पोलीस-उत्पादन शुल्क झोपेत? रामनगरात थेट 'मिनी बार' सुरू

**वर्धा/जनमाध्यम**

अहिंसा, सत्य आणि त्यागाचा संदेश देणाऱ्या महात्मा गांधींच्या पावन भूमीत आणि दान-संयमाचे संस्कार रुजवणाऱ्या विनोबा भावे यांच्या कर्मभूमीत आज चक्क दारूचा महासागर उसळल्याचे भयावह चित्र दिसत आहे. वर्धा जिल्ह्यात कागदोपत्री दारूबंदी असली तरी प्रत्यक्षात मात्र दारू तस्करांनी जिल्ह्याला वेढा घातला आहे. देशी, विदेशी, गावठी दारूची खुलेआम विक्री सुरू असतानाच आता थेट गोवा राज्यातील विदेशी दारू वर्ध्यात सर्रास उपलब्ध होत असल्याने दारूबंदीचा अक्षरशः बोजवारा उडाला आहे.




दारूबंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पोलिस व राज्य उत्पादन शुल्क विभागावर आहे. मात्र प्रत्यक्षात ही यंत्रणा केवळ कागदी घोडे नाचवत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. पोलिसांकडून कधीतरी धडक कारवाई होत असली तरी ती किरकोळ विक्रेत्यांपुरती मर्यादित राहत आहे. दुसरीकडे राज्य उत्पादन शुल्क विभाग अल्प मनुष्यबळाचे रडगाणे गात नाममात्र कारवाईचा सोपस्कार करत असल्याने मोठे तस्कर मोकाट सुटले आहेत.बंदी असूनही विविध ब्रँडची विदेशी दारू वर्ध्यात सहज उपलब्ध होत असल्याने शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. याच पार्श्वभूमीवर काही काळापूर्वी जिल्ह्यातील काही विशिष्ट भाग वगळता उर्वरित परिसरातील दारूबंदी हटविण्याची मागणीही पुढे आली होती. तर दारूबंदी प्रभावी करण्यासाठी पोलिस व उत्पादन शुल्क विभागाचे संयुक्त विशेष पथक स्थापन करण्याचे आश्वासन काही लोकप्रतिनिधींनी दिले होते. मात्र ती आश्वासने हवेतच विरल्याचे सध्याचे चित्र आहे.

दरम्यान, तत्कालीन पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांची वर्ध्यातून बदली होताच शहरातील रामनगर परिसरात दारूविक्रेत्यांचे धाडस वाढल्याचे उघडपणे दिसत आहे. जणू काही बारच सुरू असल्याप्रमाणे दिवसाढवळ्या आणि रात्रीअपरात्री दारूची विक्री होत आहे. यापूर्वी मध्यप्रदेशातील दारू विकणारे हे विक्रेते आता थेट गोव्यातील विविध ब्रँडची विदेशी दारू खुलेआम विकत असल्याने खळबळ उडाली आहे. गोव्यातून दारू वर्ध्यापर्यंत पोहोचतेच कशी, आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक होत असताना यंत्रणांना खबर कशी लागत नाही, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### गोव्यात स्वस्त, वर्ध्यात महाग तस्करांची चांदी

महाराष्ट्राच्या तुलनेत गोवा राज्यात दारूवर कमी कर असल्याने तेथील दारू स्वस्त आहे. याच करफरकाचा फायदा घेत तस्कर गोव्यातील दारू दारूबंदी असलेल्या वर्ध्यात आणून ती चढ्या दराने विकत आहेत. यातून तस्करांची लॉटरी लागली असताना महाराष्ट्र शासनाचा महसूल मात्र गळतीला लागला आहे. तरीही राज्य उत्पादन शुल्क विभागाची भूमिका बघ्याची असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**गावठी, बनावट आणि बाहेरची दारू आरोग्य धोक्यात**

वर्ध्यात आरोग्यावर घातक परिणाम करणाऱ्या गावठी दारूची निर्मिती व विक्री होत असल्याचे अनेक पोलिस कारवाईत पुढे आले आहे.

त्यातच मध्यप्रदेश, गोवा आणि बनावट दारूची भर पडल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. गांधी-विनोबांच्या भूमीत दारूचा पूर थांबवायचा असेल तर किरकोळ विक्रेत्यांवर नव्हे, तर मोठ्या तस्करांवर थेट हात घालण्याची गरज आहे.दारूबंदी जिवंत ठेवायची की इतिहासजमा करायची, हा प्रश्न आता प्रशासनासमोर उभा आहे. अन्यथा वर्ध्यातील दारूबंदी केवळ कागदावरच उरेल, असा इशारा नागरिक देत आहेत.



## प्लास्टिकला 'ना' म्हणत शिंदेंचा वाढदिवस साजरा
# शिवसेनेचा रोखठोक इशारा प्लास्टिक पिशव्यांवर तात्काळ बंदी घाला

**वर्धा/जनमाध्यम**

फुगे, केक आणि हारतुरे नकोष्ठ पर्यावरण रक्षणाचाच संकल्प! शिवसेनेचे खासदार तथा संसदरत्न डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवशी शिवसेनेने थेट प्लास्टिकविरोधात रणशिंग फुंकले. जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या नेतृत्वाखाली शहरात प्लास्टिक निर्मूलन अभियान राबवून नगराध्यक्ष सुधीर पांगुळ व नगरपरिषद प्रशासनाला निवेदन देत प्लास्टिक पिशव्यांवर तात्काळ बंदीची ठाम मागणी करण्यात आली.

शहराच्या मुख्य बाजारपेठेत शिवसैनिकांनी उतरून व्यापारी व नागरिकांना प्रश्न केला, प्लास्टिकमुळे शहर गुदमरते आहे,

तरीही वापर कशासाठी? पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी जनजागृती करत नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिक नको, पर्यावरण हवे हा संदेश देत शिवसेनेने वाढदिवसाला सामाजिक अर्थ दिला.या उपक्रमात शहरप्रमुख शार्दूल वांदिले, विधानसभा तक्रार निवारण समितीचे प्रमुख सुरेश पट्टेवार, उपजिल्हाप्रमुख मिलन गांधी, शहर समन्वयक कन्हैया यादव, हंसराज गाडगे, युधिष्ठिर थोरात, राजेश वंजारी, सुयोग नवघरे, गौरव गोमासे, उपशहरप्रमुख संतोष लांगोरे, मनोज भुतडा, महिला आघाडी शहरप्रमुख मयुरी गांधी, रंजना पट्टेवार, धनश्री थोरात, कविता भुतडा, सिमाताई कोटनाके आदी पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शिंदेंचा वाढदिवस म्हणजे केवळ उत्सव नव्हे, तर पर्यावरणासाठी दिलेला ठोस इशारा दिला आहे. आता तरी प्लास्टिकला पूर्णविराम द्या!

## संक्षिप्त

### जप्त रेतीचा ट्रॅक्टर-ट्रॉलीच चोरट्यांनी पळविला

**वर्धा-**अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करून महसूल विभागाने जप्त केलेला ट्रॅक्टर-ट्रॉलीच चोरट्यांनी पळवून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. तहसील कार्यालयाच्या शेजारील पंचायत समितीच्या आवारातून हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.महाकाळ येथील नदी पात्रातून रेती चोरी करून वाहतूक करणारा एम. एच. ३२ ए. एस. ५१९६ क्रमांकाचा ट्रॅक्टर-ट्रॉली महसूल पथकाने जप्त केला होता. कारवाईदरम्यान चालक पळून गेला होता, मात्र त्याचा मोबाईल घटनास्थळी सापडला. संबंधित ट्रॅक्टर आपला असल्याचा दावा संदीप महाकाळकर याने केला होता. मात्र नंतर हे वाहनच चोरट्यांनी पळवून नेल्याने संशय बळावला असून, तक्रारीवरून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### भरधाव दुचाकीची धडक; पादचारी गंभीर जखमी

**वर्धा-**भरधाव दुचाकीने दिलेल्या जोरदार धडकेत पादचारी किशोर घुमे (रा. आष्टा) गंभीर जखमी झाला. हा अपघात भूगाव रेल्वे स्टेशन ते आष्टा मार्गावर घडला.किशोर घुमे हे पायी जात असताना एम. एच. ३२ यू. ७११० क्रमांकाच्या दुचाकीने त्यांना जोरदार धडक दिली. अपघातानंतर स्थानिकांनी तातडीने मदत करून जखमीला उपचारासाठी दाखल केले. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. या प्रकरणी जखमीच्या तक्रारीवरून दुचाकी चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### शिवीगाळच्या संशयातून सासूवर काठीने हल्ला

**आष्टी-**शिवीगाळ केल्याच्या संशयावरून पत्नीच्या मोठ्या बहिणीवर काठीने मारहाण केल्याची घटना सत्तरपूर येथे घडली. या घटनेत वैजयंतीमाला दहीवाडे (वय ५०) या जखमी झाल्या आहेत.वैजयंतीमाला दहीवाडे या रोजमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. त्यांची लहान बहीण सुगंधी अधव या जवळच राहतात. सुगंधी यांचा पती रघुनाथ अधव हा वैजयंतीमाला यांच्या घरासमोर आला आणि 'तू मला शिवीगाळ केलीस' असा आरोप केला. वाद वाढल्यानंतर त्याने काठीने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. आष्टी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

### अंगणवाडी केंद्र फोडले; टीव्ही लंपास

**खरांगणा (मो.)-**तळेगाव (रघुजी) येथील अंगणवाडी केंद्रातून अज्ञात चोरट्याने सुमारे १० हजार रुपये किमतीचा टीव्ही चोरून नेल्याची घटना समोर आली आहे.अंगणवाडी केंद्रात मदतनीस म्हणून कार्यरत असलेल्या प्रतीक्षा मेश्राम या नेहमीप्रमाणे केंद्रात आल्या असता कुलूप तुटलेले दिसले. आत पाहणी केली असता टीव्ही चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती तातडीने पोलिसांना देण्यात आली. या प्रकरणी खरांगणा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंद केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

### अतिमद्यप्राशनाने मृत्यू


**हिंगणघाट-**अतिमद्यप्राशनामुळे प्रकृती बिघडून नामदेव वैतागे (वय ४७, रा. वाघोली) याचा मृत्यू झाल्याची घटना वेळा येथे घडली. या घटनेची नोंद हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यू म्हणून केली आहे.माहितीनुसार, नामदेव वैतागे यांनी अतिमात्रेत मद्यप्राशन केल्यानंतर त्यांची प्रकृती अचानक खालावली. कुटुंबीयांनी उपचारासाठी नेण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असून पुढील तपास सुरू आहे.



# बनावट सोन्याचा सापळा उघड, १० लाखांची फसवणूक करणारी टोळी जेरबंद

**वर्धा/जनमाध्यम**

खऱ्या सोन्याचा बनाव करून पिवळ्या धातूच्या बनावट माळा विकून तब्बल १० लाख रुपयांची फसवणूक करणाऱ्या आंतरराज्य टोळीला स्थानिक गुन्हे शाखा, वर्धा यांनी अटक केली आहे. गुजरात व महाराष्ट्र राज्यात शोध घेऊन पोलिसांनी आरोपींना नागपूर येथून ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून सुमारे ८ लाख ४४ हजार ८९९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



## स्थानिक गुन्हे शाखेची आंतरराज्य कारवाई

या प्रकरणी पोलीस स्टेशन वर्धा (शहर) येथे अप.क्र. ६१/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.मांडगाव (ता. समुद्रपूर) येथील व्यापारी संजय आंबटकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २० जानेवारी रोजी एक महिला व दोन पुरुष त्यांच्या दुकानात आले. त्यांनी आपल्याकडे सोन्याच्या माळा असल्याचे सांगत तपासणीसाठी काही मणी दिले. प्राथमिक तपासणीत मणी खरे असल्याचे भासल्याने फिर्यादीचा विश्वास बसला.२१ जानेवारी रोजी बजाज चौक, वर्धा येथे ठरलेल्या ठिकाणी आरोपींनी पिवळ्या धातूच्या माळा खऱ्या सोन्याच्या असल्याचे सांगत १० लाख रुपये रोख घेतले व तेथून निघून गेले. त्यानंतर माळांची पुन्हा तपासणी केली असता त्या नकली असल्याचे निष्पन्न झाले. तक्रार प्राप्त होताच स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास सुरू केला. घटनेवेळी काढलेल्या मोबाईल छायाचित्राच्या आधारे मंगल अमर सोलंकी (रा. अहमदाबाद, गुजरात) याची ओळख पटली. पुढील तपासात तो नागपूर येथील मानेवाडा परिसरात वास्तव्यास असल्याची माहिती मिळाली.३ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे छापा टाकून पोलिसांनी मंगल अमर सोलंकी (२८) व राजकुमारी विष्णु पवार (५४, रा. दिल्ली) यांना अटक केली. चौकशीत तिसरा आरोपी बबलू राजेश राठोड (रा. नागपूर) याचाही सहभाग उघड झाला आहे.आरोपींच्या ताब्यातून ७.२१ लाख रुपये रोख, २ किलो वजनाच्या बनावट सोन्याच्या माळा, मोबाईल फोन व दुचाकी असा एकूण ८.४४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींना पुढील तपासासाठी वर्धा शहर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

# स्काऊट-गाईड चळवळीतून शिस्त व स्वावलंबन घडते : मोहन गुजरकर

**वर्धा/जनमाध्यम**

विद्यार्थीदशेपासूनच चांगल्या सवयी, शिस्त, कौशल्य आणि सुसंस्कार रुजविणे ही आजची गरज असून त्या दृष्टीने स्काऊट-गाईड ही आदर्श नागरिक घडवणारी प्रभावी चळवळ आहे. स्काऊट-गाईडच्या शिबिरातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंस्फूर्त शिस्त, स्वावलंबन, नेतृत्वगुण व सामाजिक भान विकसित होते, असे प्रतिपादन रोव्हर स्काऊटचे जिल्हा आयुक्त तथा राज्य समन्वयक कॅप्टन मोहन गुजरकर यांनी केले. ते वर्धा भारत स्काऊट-गाईड जिल्हा कार्यालयातर्फे कान्होलीबारा (शिव टेकडी) येथे २ ते ४ फेब्रुवारी दरम्यान आयोजित तीन दिवसीय शिबिराच्या समारोपप्रसंगी ४ फेब्रुवारी रोजी बोलत होते.



समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन मोहन गुजरकर होते. प्रमुख अतिथी म्हणून सरपंच पल्लवी कुकडे, सीनियर रोव्हर लीडर प्रा. रविंद्र गुजरकर, स्काऊटचे जिल्हा संघटक नितेश झाडे, गाईडच्या जिल्हा संघटक वैशाली घोम, शिबिर प्रमुख व सहाय्यक जिल्हा आयुक्त राजहंस जंगले, स्काऊट शिबिर प्रमुख स्काऊट मास्टर गजेंद्र गिरडकर तसेच गाईड शिबिर प्रमुख पुष्पा नंदनवार उपस्थित होते.तीन दिवसीय शिबिराचे उद्घाटन केसरीमल नगर विद्यालय, सिंदी रेल्वेचे प्राचार्य विलास येखंडे यांच्या हस्ते झाले. शिबिरात जंगल भ्रमंती, जंगल की खोज, बिनभांड्यांचा स्वयंपाक, हस्तकला, पोस्टर मेकिंग, गॅजेट स्पर्धा, प्रथमोपचार, पथसंचलन, गाठींचे प्रकार, शेकोटी व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. जिल्हा प्रशिक्षण आयुक्त किरण जंगले, उपमुख्याध्यापक सुरेंद्र उमाटे, अभिजीत पारगावकर व माजी संघटक प्रकाश डाखोळे यांनी शिबिरार्थ्यांना मार्गदर्शन केले.या शिबिरात सात शाळांतील २५० स्काऊट-गाईड्स सहभागी झाले होते. समारोपप्रसंगी प्रा. रविंद्र गुजरकर यांनी कौशल्यविकासावर,तर नितेश झाडे यांनी योग्य वयात योग्य संस्कार देण्याच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे संचालन शुभांगी डंभारे यांनी केले, तर आभारप्रदर्शन पुष्पा नंदनवार यांनी केले.

### वृद्धाची ३० लाखांनी फसवणूक

**वर्धा-**विश्वासाचा गैरफायदा घेत दोघांनी वृद्धाची तब्बल ३० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार महाकाळ येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी सावंगी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.जानराव धांदे (वय ६७) यांच्या बँक खात्याचे व्यवहार योगेश वंजारी (रा. नालवाडी, गीताई सेल्स) व नंदा टिपले (रा. आलोडी) पाहत होते. दरम्यान, दोघांनी संगनमत करून वेगवेगळ्या व्यवहारांद्वारे मोठी रक्कम परस्पर लाटल्याचा आरोप आहे.

## कर्करोगाशी झुंज देणाऱ्यांसोबत माणुसकीचा हात
# जागतिक कर्करोग दिनी सोशल फोरमचा संवेदनशील उपक्रम; रुग्णांना फळांचे वाटप

**वर्धा/जनमाध्यम**

कर्करोगाशी लढणाऱ्या रुग्णांच्या वेदनांना दिलासा देत माणुसकीचा ओलावा जपण्याचा प्रयत्न वर्धा सोशल फोरमच्या वतीने करण्यात आला.जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून स्व. विभावरी बारहते व स्व. सारला जोतवाणी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सावंगी येथील सिद्धार्थ गुप्ता कॅन्सर हॉस्पिटलमध्ये रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.



कर्करोग ही केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक लढाईही आहे. ही जाणीव ठेवत रुग्णांना आधार देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. रुग्णांच्या चेहऱ्यावर क्षणभर जरी हसू उमटले, तरी हा उपक्रम सफल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाला सोशल फोरमचे अध्यक्ष डॉ. अभ्युदय मेघे, सचिव श्याम परसोडकर, अक्रम पठाण, अविनाश उबाळे, दीपा रायबोले, मोनाली वंजारी, तारा ब्राह्मणकर, वंदना जाबडे यांच्यासह रुग्णालयाचे संचालक डॉ. नितीन भोला उपस्थित होते.जागतिक कर्करोग दिनी केवळ भाषणांपुरते न थांबता प्रत्यक्ष कृतीतून माणुसकी जपणारा हा उपक्रम रुग्णांच्या मनाला आधार देणारा ठरला.

# ४४ कोटींचा घोटाळा उघड
# देशमुख सुतगिरणीवर बँकेचा हातोडा

## सहकाराच्या नावाखाली कर्जबुडवेपणाचा कळस

**वर्धा/जनमाध्यम**

सहकाराच्या पवित्र नावाला काळिमा फासणाऱ्या कर्जबुडव्या व्यवस्थेवर अखेर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा हातोडा कोसळला आहे. सहकार महर्षी स्व. बापूराव देशमुख शेतकरी सहकारी सुतगिरणीवर बँकेने थेट जप्तीची कारवाई करत सुतगिरणीचा संपूर्ण ताबा घेतला. १५ कोटी रुपयांच्या कर्जाचा डोंगर वाढत वाढत तब्बल ४४ कोटी २० लाखांवर जाऊन पोहोचल्याने ही धडक कारवाई करण्यात आली.

सन २०१० मध्ये समीर देशमुख वर्धा जिल्हा सहकारी बँकेचे अध्यक्ष असताना सुतगिरणीच्या नावावर जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून १५ कोटी रुपयांचे कर्ज उचलण्यात आले होते. मात्र त्यानंतर वर्षानुवर्षे कर्जफेडीबाबत बोंब ठोकली गेली. व्याजावर व्याज चढत गेले आणि अखेर बँकेच्या सहनशक्तीचा बांध फुटला.कायद्याच्या चौकटीत पाऊल टाकत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापक तथा अधिकृत अधिकारी संजय कोरडे यांनी कारवाईची सूत्रे हाती घेतली. २२ जानेवारी २०२५ रोजी नोटीस बजावण्यात आली. तरीही कर्जफेड न झाल्याने ३० जानेवारी रोजी बँकेने अधिकृतरित्या सुतगिरणीचा ताबा घेतला. ३१ जानेवारीला ही कारवाई पूर्ण करण्यात आली.

या कारवाईत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या डी-१३ व डी-१४ या भूखंडावरील सुमारे २,०६,३९७ चौरस मीटर क्षेत्र, त्यावरील इमारती, यंत्रसामग्रीसह संपूर्ण मालमत्ता बँकेच्या ताब्यात गेली आहे.शेतकरी कर्जासाठी दारोदारी फिरतो, कागदपत्रांच्या ओझ्याखाली दबतो, पण सहकाराच्या नावाखाली कोट्यवधी रुपये बुडवले जातात, ही बाब संतापजनक नाही तर काय देशमुख सुतगिरणीवरील जप्ती म्हणजे केवळ आर्थिक कारवाई नव्हे, तर सहकार क्षेत्रातील माजलेल्या मस्तीला दिलेला इशाराच आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ७२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

## जाहीर नोटीस
### विद्यमान ११ वे सह दिवाणी (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**Succession No. : 2733/2025** चौ.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार :** १. **श्रीमती रुपाली धिरज गवई,** वय ३० वर्षे, व्यवसाय - नोकरी
२. **युवराज धिरज गवई,** वय १४ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अ.पा.क. अर्जदार क्र.२ तर्फे अर्जदार क्र.१ आई
दोन्ही रा.टाकरखेडा पूर्णा, पो.आसेगाव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. **श्रीमती अन्नपूर्णा दिगांबर गवई,**
वय ५५ वर्षे, व्यवसाय - घरकाम (पेन्शनधारक)
रा.प्रबुध्द नगर, वडाळी कॅम्प,अमरावती
२. **श्रीमती आम्रपाली अक्षय गवई,** वय -वयस्क, धंदा-घरकाम
रा.मिश्राजी यांचे राहते घरी, मोठी उमरी, अकोला, जि.अकोला

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय कायदा वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **धिरज डिगांबर गवई** यांचे निधन दिनांक **११/१०/२०२४** रोजी अमरावती येथे झाले असून वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर उत्तराधिकारी आहेत व इतर कोणीही मय्यतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत वि.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.**२८.०१.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६२/२०२६
**सुनंदा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०२.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सौ.सुनंदा पांडुरंग मडावी (लग्नापुर्वीचे नांव सुनंदा कवडू तुमडाम)
वय ५९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.हनुमान मंदिरासमोर झेंडा चौक, धंतोली नागपूर
२. यशोदाबाई बळीरामजी तुमडाम, वय ७८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
३. देविदास बळीरामजी तुमडाम, वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
२ व ३ रा.समाधान नगर, कॅम्प रोड, अमरावती
४. कैलास बळीरामजी तुमडाम, वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.३ री गल्ली, रामदासपेठ शंकर नगर, नागपूर
५. सौ.कल्पना शंकर मडावी, (लग्नापुर्वीचे नांव कल्पना बळीरामजी तुमडाम)
वय ४९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.७, बाबेल की बाडी, गोविंद नगर सेक्टर-१३, उदयपूर राजस्थान
६. कांताबाई गणपत तुमडाम, वय ६९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
७. गजेंद्र गणपत तुमडाम, वय ४८ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
रा.क्वॉर्टर नं.एफक्यू/९५, हिंगणा रोड, एसआरपीएफ कॅम्प गृप-४, नागपूर
८. प्रवीण गणपत तुमडाम, वय ५० वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
६ व ८ रा.समाधान नगर, कॅम्प रोड, अमरावती
९. मिनाबाई नारायण तुमडाम, वय ६३ वर्षे, व्यवसाय - घरकाम
१०. रुपेश नारायण तुमडाम, वय ४८ वर्षे, व्यवसाय - नोकरी
११. सौ.शितल राकेश मसराम, (लग्नापुर्वीचे नांव शितल नारायण तुमडाम)
वय ४५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
१२. गीतेश नारायण तुमडाम, वय ४३ वर्षे, व्यवसाय - नोकरी
७ ते ९ रा.प्लॉट नं.४०, विरचक कॉलनी, काटोल रोड, नागपूर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **कवडूजी गोविंदाजी तुमडाम** हे दिनांक 12.11.1990 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनंदा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१०५/२०२५
**रेखा जामनेकर -वि- निरंक**
पुढील ता.२०.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rekha Haribhau Jamnekar, Age 65 Yrs. Occu.: Other
2. Sandip Haribhau Jamnekar, Age about 45 Yrs. Occu.: Labour
3. Sunil Haribhau Jamnekar, Age about 38 Yrs., Occu.: Labour
All 1 to 3 R/o Galli No.3, Santoshi Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Haribhau Mahadevrao Jamnekar हे दिनांक 17.08.2019 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rekha Haribhau Jamnekar + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rekha Haribhau Jamnekar + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५५/२०२६
**स्मिता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१६.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** १. स्मिता सुधीर शोभने, वय ६२ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.१३, कृष्णाई जगदाळे लेआऊट, रविकिरण कॉलनी जवळ, अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुधाकर दत्तात्रय अमिन व सुनिता सुधाकर अमिन** हे अनुकमे दिनांक 26.11.2025 व दिनांक 09.12.2021 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **स्मिता सुधीर शोभने विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **स्मिता सुधीर शोभने विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १५१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ अर्ज १२८/२०२६
**तारा डहाके + २ वि.निरंक**
पुढील ता.०४.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt. Tara Madhukar Dahake
Age about 69 Yrs. Occu.: Household work
2. Sudhir Madhukar Dahake, Age about 49 Yrs. Occu.: Business
Both R/o. Near Nirmal Market, Chhangani Nagar, Amravati
3. Jayshree Shashikant Kedare, Age about 45 Yrs. Occu.: Household work
R/o. Shantaji Nagar, Telipura, Barshitakali,
Tq. Barshitakali, Dist. Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Madhukar Kashnath Dahake** हे दिनांक १३.१२.२०१५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Smt. Tara Madhukar Dahake+2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Tara Madhukar Dahake + 2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८७९/२०२५
**सोनल -वि- निरंक**
पुढील ता. १०.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sonal Subhashrao Funde @ Smt.Sonal Sagar Darade
Age 34 Yrs. Occu.: Housewife
R/o C/o Subhashrao Funde Udapurkar Layout Ambika Nagar, Amravati
2. Shivadnya Sagar Darade, Age 05Yrs. Occu.: Education
Appli.No.2 being minor through legal guardian mother i.e.Appli.No.1
R/o Shri Jai Amba Garden City Mogra Building V.M.V.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सागर रामनाथ दराडे** हे दिनांक 22.10.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सोनल व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सोनल व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३०/२०२६
**श्री.राजु अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०९.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Raju S/o Jumdomal Basantwani, Age 70 Yrs. Occu.: Business
**Aadhar No.**581699005437
2. Sajandas S/o Jumdomal Basantwani, Age 68 Yrs. Occu.: Business
**Aadhar No.**336626475117
3. Ashokkumar S/o Jumdomal Basantwani, Age 63 Yrs. Occu.: Business
R/o Krushna Nagar, Amravati. **Aadhar No.**685151118971
4. Shankarlal S/o Jumdomal Basantwani, Age 60 Yrs. Occu.: Business
**Aadhar No.**709292689567
5. Suresh S/o Jumdomal Basantwani, Age 58 Yrs. Occu.: Business
**Aadhar No.**565520662445
Appli.No. 1,2,4 & 5 All R/o Sahakar Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शिलाबाई जुमडोमल बसंतवानी** हे दिनांक 30.09.2010 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. व **मयत जुमडोमल कल्याणदास बवंतवानी** हे दि.**२२.०४.२०२१** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **राजू अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **राजू अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०२६/२०२५
**श्रीमती रविना अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.१६.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Ravina Vaibhav Dongare,
Age 26 Yrs. Occu.: Household
2. Vaishali Yashwant Dongare,
Age 58 Yrs. Occu.: Household
Both R/o Ambedkar College Road, Uttam Nagar,
Amravati, Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **वैभव यशवंत डोंगरे** हे दिनांक 01.02.2024 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रविना अधिक एक विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रविना अधिक एक विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

## जाहीर नोटीस
### अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१ यांचे न्यायालय

एम.ए.सी.पी. क्र.९९/२०२४ ने.ता.१३.०२.२०२६

**पिटीशनर :** कल्पना प्रमोदराव अंबरते व ईतर

-- विरुध्द --

**रिस्पॉंडट :** **सुखदेव हरचंद राम व ईतर**

**बनाम :** 1. Akshay Sureshrao Chaudhari
R/o Priyanka Colony, Amravati-444601

APPLICATION U/.SEC.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION

ज्याअर्थी वरील पिटीशनर **कल्पना प्रमोदराव अंबरते** यांनी वि.जिल्हा व सत्र न्यायालय-०६, अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार **अक्षय सुरेशराव चौधरी** यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक **१३.०२.२०२६** रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-०१, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /**२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

अमरावती
दिनांक

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक (न्या.वि.)**
जिल्हा व सत्र न्यायालय
अमरावती

---

## ग्राम पंचायत कार्यालय, बेलोरा
### निविदा सुचना क्र. ४

ग्रामपंचायत कार्यालय, बेलोरा, पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे मार्फत खालील कामाकरीता मोहरबंद **बी-१** प्रपत्रामध्ये जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचे वर्गातील नोंदणीकृत कॉन्ट्रॅक्ट दाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा सरपंच/सचिव ग्रामपंचायत कार्यालय, बेलोरा पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती यांच्याकडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव व खर्च | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फी | बकाया रक्कम १ टक्का | वर्ष | योजनेचे नांव | कोऱ्या निविदा मिळण्याचा दिनांक | भरलेली निविदा स्विकृत करण्याचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक | पंजीकृत कंत्राटदाराची वर्ग वर्गीकरण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सार्वजनिक शौचालय बांधकाम फार्मर प्रोड्युसर कंपनी, बेलोरा | ३,००,००० | २०० | ३,००० | २०२५-२०२६ | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण | ०६.०२.२६ ते १३.०२.२०२६ | ०६.०२.२६ ते १३.०२.२०२६ | ग्रा.पं. मासिक सभेत | वर्ग ७ व त्यावरील |

**टिप** १)निविदा शर्ती व अटी ग्रामपंचायत कार्यालय बेलोरा पंचायत समिती चांदूर बाजार जि.अमरावती यांच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) निविदा या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत.
३) निविदा ह्या स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांनी राखून ठेवले आहेत.
४) कंत्राटदारास १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.
५) निविदा कमी दराची मंजूर झाल्यास कंत्राटदारास सिक्युरिटी डिपॉझिट डिमांडरी जमात ठेवावे लागेल.
६) नियमानुसार सर्व प्रशासकीय कपाती तसेच रॉयल्टी वजा करुन उर्वरित देयकाचे शोधन करण्यात येईल.

**सरपंच,**
**ग्रामपंचायत, बेलोरा**

**ग्रा.वि.अधिकारी**
**ग्रामपंचायत, बेलोरा**

---

## दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, यांचे न्यायालयातील

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.०४/२०२६ ने.ता.२६.०२.२०२६

**अर्जदार :** १. लाभेष अजाबराव राऊत
२. अतुल अजाबराव राऊत
दोन्ही रा.ग्रामीण रुग्णालयाजवळ नांदगाव खंडे.ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. ज्योत्स्ना रविंद्र लव्हाळे
रा.अंजनगांव सुर्जी, ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत अजाबराव भगवानजी राऊत** यांचा मृत्यू दि.१२.०८.१९९६ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. मयताची पत्नी नामे **कुसूम अजाबराव राऊत** यांचा मृत्यू दि.०९.१२.२०२५ रोजी नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार १ व २ ही मुले असून अर्जदार नं.३ ही मुलगी आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,
नांदगाव खंडेश्वर

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२८/२०२६
**तारा डहाके अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०४.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Tara Madhukar Dahake, Age 69 Yrs. Occu.: Household
2. Sudhir Madhukar Dahake, Age 49 Yrs. Occu.: Business
Both R/o Near Nirmal Market, Chhangani Nagar, Amravati.
3. Jayshree Shashikat Kedare, Age 45 Yrs. Occu.: Household work
R/o Shantaji Nagar, Telipura, Barshitakali, Tq.Barshitakali, Dist. Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Madhukar Kashinath Dahake हे दिनांक 13.12.2015 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Tara Madhukar Dahake + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Tara Madhukar Dahake + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२८९७/२०२५
**श्रीमती कुमुदिनी अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kumudini Prakash Sapkale, Age 59 Yrs. Occu.: Other
R/o 53-A Prem Nagar, Jalgaon
2. Mahendra Nath Bhagat, Age 59 Yrs. Occu.: Other
R/o Kalyan Nagar, Amravati.
3. Shailendra Nath Bhagat, Age 56 Yrs. Occu.: Labour
R/o Tapovan Road Yogiraj Nagar Camp, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सिता उर्फ शेवंता नाथ भगत** हे दिनांक 07.12.2015 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. व मयत **नाथ कृष्णाजी भगत** हे १०.१०.२०१६ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **कुमुदिनी** + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **कुमुदिनी** + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

प्रोसेस नं.३०२/२०२६
दिवाणी न्यायालय व स्तर, दर्यापूर
दि.३१.०१.२०२६

## जाहीर नोटीस
### वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी.अर्ज क्र./४८/२०२६ दिनांक २७.०२.२०२६

**अर्जदार -** १. आदित्य अशोक मोहता, वय ४० वर्षे, धंदा - व्यवसाय व शेती
रा.तेलीपुरा, बाभळी, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती
२. स्नेहा सचिन बिसानी, वय ३५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.घर नं.६१, ३ री लेन, वेल्लाल्ला स्ट्रिट, पुरसालवलकम, व्हीटीसी फ्लॉवर्स रोड, पो.फ्लॉवर्स रोड, ता.जि.चेन्नई (तामिलनाडू)
३. अशोक जयकृष्ण मोहता, वय ६७ वर्षे, धंदा - व्यवसाय व शेती
रा.मालवाडी पुरा, बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **ज्योती अशोक मोहता** या दिनांक **२२.११.२०२५** रोजी मरण पावल्या आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे (VIII) १८२७ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.३१.०१.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, यांचे न्यायालयातील

किरकोळ (आर.एम.जे.सी.) क्र.३४/२०२६ ने.ता.०७.०३.२०२६

**अर्जदार :** १. कुसूम दामोधर ठाकरे
२. गजानन दामोधर ठाकरे
दोन्ही रा.हरणी, पो.मंगरुळ चव्हाळा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. रविंद्र दामोदरराव ठाकरे
रा.प्लॉट नं.२, श्री स्वामी समर्थ टाऊनशिप, अमरावती जि.अमरावती
४. देविदास दामोधर ठाकरे,
रा.श्रीधर नगर, साईनगर, अमरावती, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी **मयत दामोधर बापुराव ठाकरे** यांचा मृत्यू दि.**१४.०६.२०२१** रोजी हरणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे अर्जदार १ ही पत्नी व अर्जदार नं. २ ते ४ ही मुले आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय ,
नांदगाव खंडेश्वर

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०८/२०२६
**श्रीमती सुवर्णा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२७.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Suvarna Suresh Thakare, Age 66 Yrs. Occu.: Household
2. Parikshit Sureshrao Thakare, Age 43 Yrs. Occu.: Service
Both R/o Near Nirmal Market, Chhangani Nagar, Amravati.
3. Akshay Sureshrao Thakare,
Age 41 Yrs. Occu.: Medical Practitioner
All R/o House No.31/A, Swagatam Colony, Gopal Nagar, Badnera Road, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुरेश सहदेवराव ठाकरे** हे दिनांक 19.08.2024 रोजी **अमरावती** ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **सुवर्णा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुवर्णा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३६/२०२६
**शोभना -वि- निरंक**
पुढील ता.०२.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shobhana Suresh Damle
Age 52 Yrs. Occu.: Household
R/o Behind Commissioner Colony, Vrundavan Colony, Camp, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शकुंतला चंद्रमसिंग दामोधरे** हे दिनांक 07.12.2018 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शोभना विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शोभना विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२१.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
### वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५८/२०२६
**बबीता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१३.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Babita Gajanan Bhise, Age 48 Yrs. Occu.: Other
2. Pallavi Gajanan Bhise, Age 25 Yrs. Occu.: Education
3. Gaurav Gajanan Bhise, Age 20 Yrs. Occu.: Education
4. Abhishek Gajanan Ghise, Age 15 Yrs. Occu.: Education
All R/o Near Laharibaba Mandir Laxmi Nagar, P.O.VMV, Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गजानन रामेश्वर भिसे** हे दिनांक 16.11.2025 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **बबिता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **बबिता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ‘तिरंगा क्रिकेट क्लब’चा विजय

**नांदगाव पेठ-** माहुली जहागीर येथील सुपर किंग क्रिकेट क्लबच्या वतीने इंडियन नॅशनल शाळेजवळील मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या प्लास्टिक बॉल क्रिकेटच्या खुल्या सामन्यांत नांदगाव पेठ येथील तिरंगा क्रिकेट क्लबने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत अजिंक्यपदावर आपले नाव कोरले.अटीतटीच्या व उत्कंठावर्धक सामन्यांनी भरलेल्या या स्पर्धेत तिरंगा क्रिकेट क्लबने प्रत्येक फेरीत दमदार कामगिरी करत प्रतिस्पर्धी संघांना नमवले. अंतिम सामन्यातील त्यांच्या शिस्तबद्ध गोलंदाजी व आक्रमक फलंदाजीने प्रेक्षकांची मने जिंकली. या विजयानंतर तिरंगा क्रिकेट क्लबला ५१ हजार रुपये रोख रक्कमेचे प्रथम पारितोषिक मिळाले.विजयी संघाचा सत्कार स्व.हिराबाई गुल्हाने चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष विवेक गुल्हाने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी खेळाडूंना पुष्पगुच्छ व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.या स्पर्धेमुळे परिसरातील नवोदित खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळाली असून ग्रामीण भागातील क्रिकेटला चालना मिळत असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. आयोजनाबद्दल सुपर किंग क्रिकेट क्लबचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.




### बंडोपंत भुयार यांना महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड

**अमरावती-** भुयार एज्युकेअरचे संचालक बंडोपंत भुयार यांना महाराष्ट्र बिजनेस आयकॉन अवॉर्ड२०२५ हा राज्यस्तरीय पुरस्कार मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री प्रार्थना बेहेरे यांच्या हस्ते सोमा वाईन व्हिलेज, नाशिक येथे एका दिमागदार सोहळ्यामध्ये सपत्नीक प्रदान करण्यात आला. भुयार गेल्या ३२ वर्षापासून शैक्षणिक तसेच सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी आज पर्यंत भुयार एज्युकेअरच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केलेले आहे. तसेच केवळ व्यवसाय म्हणून नव्हे तर विद्यार्थ्यांना चार भिंतीच्या पलीकडचे शिस्त, संस्कार व व्यक्तिमत्व विकासाचे धडे ही ते सातत्याने देत आलेले आहे. या पुरस्काराकरिता त्यांच्यावर समाजाच्या सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

### योजनेच्या लाभार्थ्यांनी ह्यातीची नोंद घेण्याचे आवाहन

**अमरावती-** संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ निराधार अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांनी ३१ मार्चपर्यंत ह्यातीची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.दरवर्षी १ जानेवारी ते ३१ मार्च या कालावधीत लाभार्थ्यांनी त्यांचे योजनेबाबतचे मासिक अनुदान ज्या बँक खाते, पोसट ऑफीसमध्ये जमा होते, अशा बँक मॅनेजर अथवा पोस्ट ऑफीसमध्ये पोस्ट मास्टर यांचे समक्ष हजर राहून स्वतः ह्यात असल्याची नोंद घ्यावी, अथवा विहीत नमुन्यात ह्यात असल्याची नोंद घेऊन मॅनेजर, पोस्टमास्टर यांच्या सही, शिक्का घ्यावा. सदर विहीत नमुना बँक, पोस्ट ऑफीस किंवा अमरावती तहसिल कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या तहसिलदार डॉ. प्रियंका मिसाळ यांनी केले आहे.

# अचलपूर शहरातील बस स्थानकाचा कायापालट

## बस स्थानक पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर, इमारत, संरक्षण भिंत आणि सौंदर्यीकरणाचे काम येत्या ३ महिन्यात होणार पूर्ण



**अचलपूर/ वार्ताहर**

गेल्या ३५ वर्षानंतर अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी मंजूर झालेल्या साडे चार कोटीचा निधीतून बस स्थानकाला नवसंजीवनी मिळाली आहे. या बंद बस स्थानकाचा चेहरा मोहरा बदललेला आहे.यामुळे बस स्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर असून येत्या ३ महिन्यात भव्य दिव्य इमारत,संरक्षण भिंत, डिझेल पंप,सौंदर्यीकरणाचे काम पूर्ण होणार आहे.

यामुळे अचलपूर शहरातील प्रवाशी वर्गासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.आता प्रवाश्यांना आर्थिक भुर्दंड सहन परतवाडा आगारात जावे लागणार नाही.यासाठी दैनिक जनमाध्यम मध्ये या बस स्थानकाच्या दुरावस्थेबाबत अनेक वृत्त प्रकाशित झाले.अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनि आवाज ही उठविला.

यानंतर निधी मंजूर होऊन गेल्या वर्षी २०२५ मध्ये ६ महिने उलटूनही कामाला प्रारंभ होत नसल्याने वृत्ताची मालिका दैनिक जनमाध्यम मध्ये प्रकाशित झाली होती.

आणि बस स्थानक पुनर्बांधणीचे काम प्रगतीपथावर ७० टक्के काम पूर्ण झाले आहे.यामुळे प्रवाशी वर्गात आनंदाचे वातावरण आहे. अचलपूर मतदार संघाचे आ. प्रवीण तायडे यांनी सुद्धा हा मुद्दा रेटून धरला.

अखेर जुलै गेल्या वर्षी महिन्यापासून अचलपूर शहरातील बस स्थानकाची जुनी इमारत पाडून भव्य दिव्य इमारत उभारली जात आहे.यामुळे येत्या ३ महिन्यात या बस स्थानकाचे पुनर्बांधणीचे काम पूर्ण होणार आहे. पण पुन्हा हा बस स्थानक बंद पडू नये ? यासाठी ठोस उपाययोजना आगार प्रमुखांना राबव्यावा लागणार आहे.या बस स्थानकामुळे प्रवाशी वर्गाला आर्थिक भुर्दंड सहन करून अचलपूर शहरातून ऑटो, दुचाकी, चारचाकी वाहनांने परतवाडा बस आगारात जावे लागणार नाही.

### पुनर्बांधणीमुळे जुने वैभव - आ.तायडे

पुनर्बांधणीमुळे अचलपूर बस स्थानकाला जुने वैभव येणार आहे.परतवाडा आगारातून सर्व बसेस फेऱ्या व्हाया अचलपूर बस स्थानक येथून केली जाणार आहे.अचलपूर शहरातील प्रवाश्यांसाठी सुविधा व सुरक्षा उपलब्ध करण्यावर भर असून प्रवाशी वर्गाने सुद्धा अचलपूर शहरातील बस स्थानक येथून सुरू होणाऱ्या बस फेऱ्याचा लाभ घेण्याचे आवाहन आ.प्रवीण तायडे यांनी केले आहे.

अचलपूर शहरातील बस स्थानकात भौतिक सुविधा उपलब्ध होऊन बस फेऱ्यांचा संख्या वाढवून प्रवाश्यांना सुविधा उपलब्ध करण्याकडे भर दिला जाणार आहे .

**-बच्चू कडू,**
माजी आमदार,अचलपूर मतदार संघ.

अचलपूर शहरातील बस स्थानक पुनर्बांधणीचे काम ७० टक्के पूर्ण झाले आहे. येत्या ३ महिन्यात काम पूर्ण होणार आहे.

**-निलेश बेलसरे,**
विभागीय नियंत्रक ,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ.

बंद अवस्थेत असलेल्या बस स्थानकाच्या दुरावस्थेबाबत अचलपूर युवा संघर्ष समितीचे सदस्यांनी अनेक वेळी आवाज उठवला आहे.आणि बस स्थानक परिसरात आता भव्य दिव्य इमारत उभी राहत आहे. यामुळे हा बस स्थानक पुन्हा बंद होऊ नये याची काळजी मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी व या बस स्थानकामुळे प्रवाशी वर्गाला सुद्धा मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे.

**-सागर पुरोहित,** अचलपूर

# तालुक्यातील पांदन रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण करा

## सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन

**अचलपूर/ वार्ताहर**



तालुक्यातील अनेक गावांमधील पांदन रस्त्यांची दुरवस्था झाली असून गजानन तनपुरे यांच्या शेतापासून ते लाखनवाडी-बेलज रस्त्याला जुळणारा पांदन रस्ता तसेच श्रीकृष्ण शेकोकार ते विष्णूभाऊ तनपुरे यांच्या शेतापर्यंतचा रस्ता मागील अनेक दिवसांपासून अर्धवट अवस्थेत आहे. सदर रस्त्यांची कामे तात्काळ पूर्ण न केल्यास अचलपूर तालुका ग्रामीण आंदोलन छेडेल, असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदनाद्वारे देण्यात आला.

या संदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अचलपूर यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित पांदन रस्ते शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असून याच मार्गावरून शेतीमालाची वाहतूक, दुग्ध व्यवसायासाठी दूध वाहतूक,खत-बियाण्यांची ने-आण तसेच दैनंदिन दळणवळण केले जाते.मात्र, रस्त्यांची कामे अर्धवट राहिल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात चिखल, खड्डे व पाणी साचत असून रस्ता पूर्णपणे नादुरुस्त होतो. परिणामी दुचाकी व चारचाकी वाहनांचे नुकसान होत आहे, तसेच अपघातांची शक्यताही वाढली आहे. याचा थेट फटका शेतकरी, विद्यार्थी, महिला व रुग्णांना बसत आहे.तरी सदर पांदन रस्त्यांची तात्काळ पाहणी करून अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, रस्ते वाहतुकीस सुरक्षित व सुस्थितीत करण्यात यावेत, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.जर संबंधित विभागाने या मागण्यांकडे दुर्लक्ष केले,तर येत्या काळात अचलपूर तालुक्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा स्पष्ट इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष नामदेव तनपुरे,सेवादल तालुका अध्यक्ष सचिदानंद बेलसरे, राहुल गाठे, विशाल खानझोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चवथ्या दिवशी रंगले अटीतटीचे सामने



**अमरावती-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय येथे सुरू असलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेच्या चवथ्या दिवशी अटीतटीचे सामने रंगले. गुरूकुल कांग्री विद्यापीठ, हरिद्वार विरुद्ध संजीवनी विद्यापीठ,अहिल्यानगर यांच्यात झालेल्या सामन्यात गुरूकुल विद्यापीठाने बाजी मारली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर विरुद्ध माधव विद्यापीठ, राजस्थान यांच्यात झालेल्या सामन्यात माधव विद्यापीठने सामना जिंकला. एल.पी.यु. विद्यापीठ विरुद्ध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात एल.पी.यु. विद्यापीठाने बाजी मारली. जयपूर विद्यापीठ विरुद्ध कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात जळगांव विद्यापीठाने सामना जिंकला.

# प्रगटदिन सोहळा शिव महापुराण कथा

**कुऱ्हा/ वार्ताहर**

तिवसा तालुक्यातील वऱ्हा येथील गजानन महाराज संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रगटदिन सोहळा व शिव महापुराण कथा आणि सामूहीक गजानन महाराज विजय ग्रंथ पारायण सप्ताह दि ३१ जाने. ते ८ फेब्रु. २०२६ पर्यंत आयोजित केला आहे.

या प्रगटदिन सोहळ्या निमीत्त दैनंदिन कार्यक्रम श्री' चा अभिषेक व ति थस्थापना, सामूहीक पारायण, शिवपुराण कथा, हरिपाठ, आरती, महिला भजनी मंडळ वऱ्हा, किर्तन, असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

तसेच ७ फेब्रुवारी २०२६ ला शिव पुराण कथा कथावाचक ह.भ.प.निवृत्ती उर्फ प्रदीप श्यामसुंदर महाराज डाखोरे, यांचे अमृत वाणीतून सुरु आहे. तसेच सायं. ५ वा. पालवी सोहळा गणेश महिला भजनी मंडळ शिरजगांव,भगवंत बाबा महिला भजनी मंडळ वऱ्हा, वारकरी संप्रदायक पालखी सोहळा धोत्रा माणिकग्राम, गावातील सर्व महिला व पुरुष भजनी मंडळ वऱ्हा यांच्या सहभाग राहील. ८ फेब्रुवारी २०२६ लाभ स. ७ वा.होमपुजा, सकाळी ११ ते दुपारी १ वा. काल्याचे किर्तन हभप. प्रदीप महाराज डाखोरे (आळंदीकर) दुपारी २ वा.रविदादा मानव यांचे व्याख्यान सायं. ५ वा. ते ९ वा. भव्य महाप्रसाद, होईल.

तरी सर्व भाविक भक्तांना वरील सर्व कार्यक्रमांचा तसेच काल्याचे किर्तन, व्याख्यान भव्य महाप्रसादाचा लाभ घ्यावा. असे आयोजक गजानन महाराज उत्सव समिती, वऱ्हा, आणि बाल दुर्गोत्सव मंडळ वऱ्हा आणि गावातील सर्व गावकऱ्यांसह सर्व जनतेने केले आहेत. सहकार्याने होईल.

# शिवाजी महाविद्यालयात गुणवत्तेचा उत्सव

## पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या सहा गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव

**अमरावती/ क़ा.प्र.**



विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि कलाविष्काराचा जल्लोष एकाच मंचावर अनुभवायला मिळाला, तो श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात. ‘कलाविष्कार-२०२६’ या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन समारंभात पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या विद्यापीठ गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या सहा गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात ‘कलाविष्कार-२०२६’ या वार्षिक स्नेहसंमेलनाचा उत्साहात शुभारंभ झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हर्षवर्धन देशमुख होते, तर उद्घाटन राकेश ओल्ला, पोलीस आयुक्त, अमरावती यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून जयवंत चावरे, श्रुतिका गावडे, ॲड. जयवंत भैयासाहेब पाटील, दिलीपबाबु इंगोले, हेमंत काळमेघे उपस्थित होते. तसेच प्राचार्य डॉ. केशवराव रा. गावंडे, प्रा. सुभाष बनसोड, सुरेश देशमुख, एकनाथराव बंड, नरेश बिरे,ॲड. राजकुमार निरनाळे व सुरेशराव सोलिव यांची विशेष उपस्थिती होती.एम.ए.जे.एम.सी. परीक्षेत मयुरी गणपत बारी हिने प्रथम, तेजस्विनी राजेंद्र बदुले हिने द्वितीय तर प्रतीक्षा रवींद्र फरकाडे हिने तृतीय क्रमांक पटकावला. बी.ए. जे.एम.सी. परीक्षेत आरेफा सब्बीर हुसेन हिने प्रथम, निशिगंधा यश चौधरी हिने द्वितीय तर अश्विनी अनिल दामले हिने तृतीय क्रमांक मिळविला.या यशाबद्दल मयुरी बारी, तेजस्विनी बदुले,प्रतीक्षा फरकाडे,आरेफा हुसेन, निशिगंधा चौधरी व अश्विनी दामले या सहाही गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या यशाबद्दल प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, जनसंवाद विभागप्रमुख डॉ. कुमार बोबडे प्राचार्य डॉ.अंबादास कुलट,जनसंवाद विभागप्रमुख डॉ.कुमार बोबडे, प्रा.गजानन गडेकर, प्रा.प्रातिक करंडे, प्रा.रुपेश फसाटे, प्रा.मनीष भंकाळे, प्रा.सर्वेश मराठे, प्रा.नकुल धरमकर, प्रा.शिवकुमार साबळे, प्रा.मनीषा देशमुख, राधेश्याम पिंजरकर यांच्यासह विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन



**चांदुर रेल्वे -** कारला येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन तसेच नव्याने उभारण्यात आलेल्या संगणक कक्षाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला गावातील मान्यवर, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रमोद कुमरे, उपसरपंच शैलेशभाऊ गिरासे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामदास राठोड, उपाध्यक्ष किरण डेहनकर, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.यानंतर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीत, नृत्य, नाट्यछटा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.यावेळी मान्यवरांच्या हस्ते संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. हा संगणक कक्ष केंद्र शासनाकडून मिळाला असून यात दहा संगणकाचा समावेश आहे. तसेच याच कार्यक्रमात सेवानिवृत्त झालेले ग्रामसेवक कोल्हे भाऊसाहेब आणि बदली झालेल्या ग्रामसेवक ढोक यांचा सुद्धा ग्रामपंचायतीच्या वतीने सत्कार करण्यात आला.पालक व ग्रामस्थांनी शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार मानून स्नेहसंमेलनाची सांगता करण्यात आली.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून चिया सिड उत्पादन,अन्नप्रक्रिया,मत्स्य व्यवसायाची पाहणी

## उत्पादनाच्या ब्रँडींगवर लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना

**अमरावती/ का.प्र**



जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज भातकुली तालुक्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी चिया सिड उत्पादन, अन्नप्रक्रिया उद्योग आणि मत्स्य व्यवसाय प्रकल्पांना भेटी देऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्प उभारणीपासून ते होणाऱ्या फायद्याची माहिती घेतली.

येरेकर यांनी रामा, ता. भातकुली येथे प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत अमोल पाठक यांनी उभारलेल्या दुग्धजन्य पदार्थ प्रक्रिया उद्योगाला भेट दिली. यावेळी त्यांनी प्रकल्प निर्मिती, उत्पादन क्षमता, विस्तार, प्रकल्पापासून होणारे फायदे याबाबत माहिती घेतली. खवा, पनीर या व्यतिरिक्त दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करावी, तसेच उद्योगाचा विस्तार करावा, उद्योगाला संस्थात्मक स्वरूप देऊन ब्रँडींगवर लक्ष देण्याची सूचना केली. तसेच शेतकऱ्यांना महाविस्तार - एआय मोबाईल ॲप्लीकेशनचा सक्रीय वापर करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले, त्यानंतर टाकरखेडा, शंभु येथे आत्मा अंतर्गत ४४ एकरमध्ये चिया सिडचे प्रात्यक्षिक राबविण्यात येत आहे. यातील योगेश देशमुख यांच्या दोन एकरवरील चिया सिड लागवडीची येरेकर यांनी पाहणी केली. सदर उत्पादनापासून शेतकऱ्यांना होणारे फायदे याबाबत त्यांनी माहिती घेतली. चिया सिड लागवडीबद्दल जिल्हाधिकारी यांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. प्रत्यक्ष उत्पादनानंतर झालेल्या लाभाची माहिती देण्याचे यावेळी त्यांनी सांगितले. तसेच कृषी मॅपर ॲपमध्ये पीक प्रात्यक्षिक तपशील माहिती ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.तसेच नांदगाव पेठ एमआयडीसीतील सावर्डी येथील ऑस्टेक प्रायव्हेट लिमिटेड या मत्स्य व्यवसाय प्रकल्पाची पाहणी केली.या दौऱ्यात उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, दादासाहेब दराडे, तहसीलदार विजय लोखंडे, अक्षय मंडवे, तालुका कृषी अधिकारी उत्कर्षा भोसले, प्रशांत गुल्हाने आदी उपस्थित होते.

### एमडी प्रकरण : पोलीसांच्या सहभागाचा तपास होणार

# अमरावतीला अंमली पदार्थ मुक्त करण्याचा पालकमंत्र्यांचा संकल्प

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात दहा कोटी रुपयांचा एमडी सापडणं ही अत्यंत गंभीर बाब आहे.एमडी प्रकरणात लवकरच पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक यांच्यासोबत स्वतंत्र बैठक घेणार आहे. अमरावती शहर आणि ग्रामीण भागात कुठल्याही प्रकारचा अवैध व्यवसाय चालू दिला जाणार नाही. एमडी प्रकरणाचा तपास सुरू आहे. पुढील काळात अमरावतीला अमली पदार्थ मुक्त करण्याचा आमचा प्रयत्न असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज ☞(पान २ वर)




## युतीधर्मानुसार महापौर-उपमहापौर निवडणूकः

अमरावती महापालिकेमध्ये भाजपा, युवा स्वाभिमान आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट हे युतीधर्म पाळणार आहेत. स्वतः अजित पवार यांनी आमदार संजय खोडके यांच्यासह आमच्यासोबत चर्चा करून सांगितलं होतं. त्या फॉर्मूल्या प्रमाणेच अमरावती महापालिकेत महापौर आणि उपमहापौर निवडले जाणार आहेत. महापालिका निवडणुकीच्या संदर्भात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निर्देश दिले होते. राष्ट्रवादी ☞(पान २ वर)

# 'कॉपीमुक्त' अभियानावर भर, दक्षता समितीची स्थापना

### १० वी साठी २८५३१ तर १२ वी साठी ३९९३४ विद्यार्थी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात आगामी १० वी आणि १२ वीच्या बोर्ड परीक्षा अत्यंत शिस्तबद्ध, पारदर्शक आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. सन २०२५-२६ शैक्षणिक वर्षातील १२ वीची परीक्षा १० फेब्रुवारीपासून तर १० वीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून सुरू होत आहे. परीक्षेच्या काळात कॉपीचे प्रकार रोखण्यासाठी आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष दक्षता समितीची स्थापना करण्यात आली असून तिची



पहिली बैठक संपन्न झाली आहे.

यावर्षी अमरावती जिल्ह्यातून १० वीसाठी १८७ केंद्रांवर २८ हजार ५३१ विद्यार्थी, तर १२ वीसाठी १३७ केंद्रांवर ३९ हजार ९३४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. जिल्हयातील एकूण केंद्रांपैकी ८५ टक्के केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर राहणार आहे. विशेषतः जिल्ह्यातील ३४ उपद्रवी आणि ४३ संवेदनक्षम केंद्रांवर प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले असून, तिथे केंद्रप्रमुख आणि पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्याचे आदेश राज्य मंडळाने दिले आहेत. यासंदर्भात जिल्हाधिकारी येरेकर यांनी विविध विभागांना सूचना दिल्या आहेत. परीक्षा ☞(पान २ वर)

# जिमवरून परतणाऱ्या तरुणीचे अपहरण करून अत्याचाराचा प्रयत्न

**अमरावती/प्रतिनिधीः-**

गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका २६ वर्षीय तरुणीचे जिमवरून घरी परतत असताना अपहरण करून तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी किशोर शिवने याच्याविरुद्ध (दि.५) विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी बुधवारी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास कॉटन मार्केट परिसरातील जिममधून व्यायाम करून घरी परतत होती. दरम्यान, आरोपी किशोर शिवने (वय ३०) हा त्याच्या काळ्या रंगाच्या किया कारमधून (क्रमांक एमएच २७/२८१२) तिथे ☞(पान २ वर)

### पीडितेचा सततचा पाठलाग-



तक्रारीनुसार, आरोपी किशोर शिवने हा पीडित तरुणीच्या परिचयाचा होता. गेल्या अनेक दिवसांपासून तो तिचा पाठलाग करून तिला त्रास देत होता. पीडितेने त्याला वारंवार दुर्लक्षित केले आणि कोणताही प्रतिसाद दिला नाही, मात्र आरोपीची छेडछाड थांबली नाही. आरोपीने कोणाकडून तरी पीडितेचा मोबाईल क्रमांक मिळवला होता. त्यावरून तो तिला सतत फोन करून मानसिक त्रास देत होता.

# रेल्वे पोलीस ठरले देवदूत

### मॉडल स्टेशनवर प्रसंगावधानामुळे वाचला प्राध्यापकाचा जीव






**अमरावती/प्रतिनिधीः-** मॉडल रेल्वे स्टेशनवर रेल्वे पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे प्रवासी प्राध्यापकाचा थोडक्यात जीव वाचल्याची घटना बुधवारी सायंकाळी समोर आली आहे. दत्तात्रेय माधवराव रत्नपारखे (वय ५०,नवाथे प्लॉट,स्वस्तिक नगर) असे थोडक्यात बचावलेल्या प्राध्यापकाचे नाव आहे. माहितीनुसार प्राध्यापक दत्तात्रय रत्नपारखे बुधवारी सायंकाळी अमरावती-जबलपूर एक्सप्रेसने वर्धा जाण्यासाठी मॉडल रेल्वे स्टेशनवर आले होते. ते आले तेव्हा ट्रेन प्लॅटफॉर्म वरून निघत होती. रत्नपारखे घाईगडबडीमध्ये ट्रेन पकडण्याचा प्रयत्न☞(पान २ वर)

# मोर्शी पोलीसांची शेतशिवारातील जुगार अडयावर धाड!

### ५ लाखाचा मुद्देमाल जप्त!

**मोर्शी/प्रतिनिधीः-**

जुगार भरवून लाखो रुपयाची माया जमा करण्याचा गोरखधंदा सुरू असतांना मोर्शी पोलीसांनी कारवाई केली. ठाणेदार राहुल आठवले यांनी त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना पोलीस स्टेशन हद्दीत अवैध धंदे करणाऱ्या ईसमांविरूध्द कार्यवाही करणेबाबत निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने दि. ४ फेब्रुवारी रोजी मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून ग्राम अंबाडा इरूर



शेतशिवार ता.मोर्शी येथे जुगार अड्यावर ५२ पत्त्याचा खेळ सुरू असतांना धाड टाकुन आरोपीस रंगेहात पकडून त्यांच्या ताब्यातुन नगदी ८७०० रूपये,५ मोबाईल किं.अं. ६१,००० रू.ताशेचा घटनास्थळावरून ६ मोटरसायकल कि.अं.४ लाख दहा हजार रुपये, व ५२ ताश पत्ते फारीसह असा एकुण ४,७९,९५० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक विशाल ☞(पान २ वर)

# ५७ हजार शेतकऱ्यांच्या खिशात आता 'महाविस्तार एआय'

**अमरावती/प्रतिनिधीः-**

आधुनिक तंत्रज्ञानाची सांगड घालत शेतकऱ्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी जिल्हा कृषी विभागाने मोठे पाऊल उचलले आहे. विभागाचे 'महाविस्तार ॲप' सध्या जिल्ह्यातील ५७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांसाठी एक डिजिटल सोबती ठरत असून, याद्वारे शेतीविषयक सल्ल्यापासून ते बाजारभावापर्यंतची सर्व माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे.

'महाविस्तार ॲप' कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असून, पारंपारिक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान यातील अंतर कमी करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी यात चॅटबॉटची सुविधा आहे. विशेष म्हणजे, पूर्वीची १० प्रश्नांची मर्यादा आता वाढवून २० प्रश्न करण्यात आली आहे. शेतकरी ☞(पान २ वर)

# चांदूर रेल्वे पोलीसांकडून अवैध जनावरे वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** दिनांक०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळच्या सुमारास नियमित गस्तीदरम्यान चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या पथकाने जनावरांची अवैधरित्या कतलीसाठी ने-आण करणाऱ्या दोन संशयितांना मूळ ६ जनावरांसह ताब्यात घेतले आहे. गजानन रामराव राठोड (वय ४९ वर्षे, रा. धानोरा मोगल, ता. चांदूर रेल्वे) आणि गोपाल आत्माराम वानखडे (वय ४२ वर्षे, रा. कंजरा, ता. नांदगाव खंडेश्वर) असे ताब्यात घेतलेल्यो आरोपींची☞(पान २ वर)

# कविता वानखडे हत्याकांडाचा आरोपी गजाआड

**अमरावती/प्रतिनिधीः-**

फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या राहुल नगर परिसरात गेल्या चार महिन्यापूर्वी झालेल्या कविता नागेश पिल्लारे वानखडे (वय ४५) हत्याकांडात शेवटी पोलिसांनी आरोपी सुभाष अजाबराव वानखडे याला गुजरात वरून ताब्यात घेतले आहे. गेल्या चार महिन्यापासून आरोपी पोलिसांना चकवा देत होता, शेवटी पोलिसांनी त्याला पकडले.

माहितीनुसार २५ सप्टेंबर २०२५ रोजी कविता पिल्लारे यांचा मृतदेह त्यांच्या भाड्याच्या घरात आढळला होता. तीन महिन्यापूर्वीच त्या घरात राहायला आल्या होत्या. त्यांच्या शरीरावर काही जखमा दिसल्या होत्या आणि कपडेही फाटले होते. कविता धामणगाव रेल्वे तालुक्यातील तळेगाव दशासर येथील निवासी होती ती पतीला सोडून आरोपी सुभाष वानखडे (नेरपिंगळाई, मोर्शी) याच्या सोबत राहुल नगर मध्ये तीन महिन्यापूर्वी भाड्याने राहायला आली होती. ते दोघे लिव्ह इन मध्ये राहत होते. या प्रकरणात पोलिसांनी कविताचे पती नागेश पिल्लारे यांच्या तक्रारीवरून विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला होता. आरोपी गेल्या चार☞(पान २ वर)



### -चार महिन्यापासून होता फरार

# आरोग्य शिबिरात २२६ पत्रकारांनी घेतला सुविधांचा लाभ

### पालकमंत्री बावनकुळे यांच्या पुढाकाराने उपक्रम

**अमरावती/प्रतिनिधीः-**

धावपळीच्या जीवनशैलीत पत्रकारांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. ही बाब लक्षात घेऊन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे अमरावतीतील पत्रकार, प्रसारमाध्यम कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी आज एका विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये



२२६ पत्रकारांनी आरोग्य सुविधांचा लाभ घेतला.

पत्रकारिता हे अत्यंत आव्हानात्मक क्षेत्र आहे. सततची धावपळ, कामाच्या अनिश्चित वेळा आणि मानसिक ताण यामुळे पत्रकारांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. ही गरज ओळखून पालकमंत्र्यांच्या जनसंपर्क कार्यालयामार्फत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ☞(पान २ वर)

# आझाद हिंद मंडळाचे ज्येष्ठ सदस्य प्रकाश संगेकर यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** आझाद हिंद मंडळाचे आधारस्तंभ आणि ज्येष्ठ सदस्य प्रकाश संगेकर यांचे आज दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने परिसरात आणि मित्रपरिवारात मोठी पोकळी निर्माण झाली



आहे.प्रकाशभाऊ हे त्यांच्या सामाजिक कार्यासाठी आणि आझाद हिंद मंडळातील सक्रिय सहभागासाठी ओळखले जात होते. ते क्लबचे सदस्य ॲड. विजय संगेकर यांचे काका होत. त्यांच्यावर अंत्यसंस्कार (दि.६) रोजी सकाळी १० वाजता करण्यात येईल.

# अ.भा.आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत अमरावती विद्यापीठ अव्वल

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या यजमानपदाखाली आयोजित 'अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल (पुरुष) स्पर्धेत अमरावती विद्यापीठाने प्रथम क्रमांक मिळविला. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला सुवर्ण पदक, माधव विद्यापीठ, पिंडवारा, राजस्थानने रजत पदक, कालिकत विद्यापीठाने कांस्य पदक व महाराजा सुरजामल ब्रिज विद्यापीठ, भरतपूरने ब्रांझ पदक पटकाविले. यावेळी ट्रॉफी व पदके




देवून चमूंना सन्मानित करण्यात आले. पुरुष स्पर्धेचा समारोपीय समारंभ उत्साहात पार पडला. स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सहभागी खेळाडूंचे कौतूक करत त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, उपाध्यक्ष ॲड. गजानन पुंडकर, उपाध्यक्ष केशवराव मेतकर, सचिव डॉ. व्ही.जी. ठाकरे, महाराष्ट्र सॉफ्ट बॉल असोसिएशनचे सहसचिव सुरजसिंह येवतीकर, प्राचार्य डॉ. जी.व्ही. कोरपे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत, डॉ. रुपाली इंगोले आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले ☞(पान २ वर)

# वाळू वाहतूक बंदमुळे ५०० कुटुंबांवर संकट

### सर्वज्ञ इंजिनीयर असो. पदाधिका-यांनी घेतली पालकमंत्र्यांची भेट



**अमरावती/प्रतिनिधीः-**

वाळू वाहतूक बंद झाल्यामुळे ५०० कुटुंबांवर संकट ओढवले आहे. यावर तात्काळ उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी सर्वज्ञ इंजिनियर असोसिएशनच्या वतीने आज गुरुवार ५ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की रेतीचे अभावी बरेच रोजगार बंद पडले आहे. अमरावती जिल्ह्यातील जवळपास १२० ते १३० वाहनबंद पडले असून ५०० कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. हे सर्व ☞(पान २ वर)

# स्वच्छ सर्वेक्षण २०२५ च्या अनुषंगाने बडनेरा झोनमध्ये अतिरिक्त आयुक्तांची पाहणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्वच्छ भारत अभियानांतर्गत राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ सर्वेक्षण २०२५ च्या पार्श्वभूमीवर अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार आज दि. ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी झोन क्रमांक ४ बडनेरा अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक २२ नवी वस्ती परिसरात पाहणी केली. या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी महानगरपालिकेच्या तसेच कंत्राटदारामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या स्वच्छता कामगारांची हजेरी तपासणी केली. स्वच्छता कर्मचारी वेळेवर उपस्थित राहून आपले कर्तव्य पार पाडत आहेत की नाही, ☞(पान २ वर)